सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ०८ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २२४ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शिवाजी पार्कवरील सभेला परवानगी नाकारल्यास संघर्ष होईल : उध्दव ठाकरेंचा इशारा

निवडणूक वचननामा जाहीर

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई,दि.७ ऑक्टोबर : शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या १७ नोहेंबरला स्मृतिदिनी दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो शिवसैनिक शिवाजी पार्कवर स्मृतिस्थळावर अभिवादन करण्यासाठी येतील. आम्ही यादिवशी सभेची परवानगी मागितली आहे, प्रशासनाने नाकारल्यास संघर्षाची ठिणगी उडू शकते, असा इशारा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी दिला. ठाकरे गटाच्यावतीने विधानसभा निवडणुकीसाठी मातोश्रीवर वचननामा प्रकाशित करण्यात आला. त्यावेळी ते पत्रकारांची बोलत होते

ते म्हणाले,'महाविकास आघाडी च्या दहा नोव्हेंबरला संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध होत आहे त्या दिवशी मी कदाचित प्रचार निमित्त मुंबईबाहेर असेल त्यामुळे काहीही अफवा पसरवली जाऊ नये ,हे आत्ताच स्पष्ट करत आहे .मी जर मुंबईत असलो तर नक्की उपस्थित राहीन.आमची १७ नोव्हेंबर शिवाजी पार्कला सभा आहे. मतदानाच्या आधीची शेवटच्या रविवारची संध्याकाळ आहे. त्यामुळे आम्ही परवानगी मागितली आहे.

१७ नोव्हेंबरला बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतीदिन आहे. याहीवर्षी लाखो शिवसैनिक तिथे अभिवादनासाठी येतील. त्यामुळे निवडणूक आयोग आणि पोलिसांना विनंती आहे की त्यांनी आडमुठेपणा करु नये, अन्यथा संघर्षाची ठिणगी पडेल.

माहिम मतदारसंघात उद्धव ठाकरेंनी अद्याप प्रचार केलेला नाही. त्याबाबत विचारणा केली असता ते म्हणाले,'माहीम मतदारसंघात प्रचार घेण्याची मला आवश्यकता वाटत नाही. हा शिवसेनेचा मतदारसंघ आहे. आता १७ नोव्हेबरला शिवाजी पार्कवर सभा होणार आहे. प्रचारासाठी वेळ कमी उरला असल्याने रोज ४-५ सभा घेतल्या तरी सर्व मतदारसंघ पूर्ण होऊ शकत नाही.

## मविआ सरकार मोदी व भाजपासारखी फसवणूक करणार नाही : पवन खेरा

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.७ ऑक्टोबर : महाविकास आघाडीचे सरकार पाडून सत्तेत आलेल्या असंवैधानिक शिंदे फडणवीस सरकारने अडीच वर्षात महाराष्ट्राची लूट केली आहे. भाजपा सरकारचे भ्रष्टाचाराचे विक्रम पाहता गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डलाही लाज वाटेल. टक्केवारी व कमीशनखोरी करुन खिसे भरण्याचे काम या सरकारने केले आहे. , अशी टीका अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया व पब्लिसिटी विभागाचे चेअरमन पवन खेरा यांनी केली.

पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, शिंदे भाजपा सरकारने पुणे रिंग रोड, समृद्धी महामार्ग, जलयुक्त शिवार, रुग्णवाहिका खरेदी, धारावी पुनर्वसन प्रकल्प, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करुन जनतेचा पैसा लुटला आहे. या सरकारच्या भ्रष्टाचाराची यादी फार मोठी आहे. महाराष्ट्रात येणारे वेदांता फॉक्सकॉन, टाटा एअरबस, बल्क ड्रग्ज प्रकल्प यासारखे तब्बल १० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक असललेले प्रकल्प गुजरात व इतर राज्यात जाऊ दिले. काँग्रेसने निवडणुकीत जी आश्वासने दिली त्याची अंमलबजावणीही केलेली आहे. कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेशात ज्या गॅरंटी जाहीर केल्या होत्या त्याची अंमलबजवाणी सुरु आहे. युपीए सरकारने ७१ हजार कोटी रुपयांची शेतकरी कर्जमाफी केली होती, त्यामुळे महाराष्ट्रासाठी जाहीर केलेल्या ५ गॅरंटी लागू करण्यात कोणतीही अडचण येणार नाही असे खेरा यांनी स्पष्ट केले.

काँग्रेस पक्षाने कर्नाटक, तेलंगणात दिलेल्या गॅरंटींची अंमलबजावणी केली नाही अशा खोट्या जाहिराती भाजपाने वर्तमानपत्रातून दिल्या आहेत. काँग्रेस विरोधात जाणीवपूर्वक अपप्रचार करुन जनतेची दिशाभूल केल्यामुळे निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करणार असल्याचेही खेरा यांनी सांगितले.

यावेळी प्रचार समितीचे अध्यक्ष खा. चंद्रकांत हंडोरे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, महाराष्ट्राचे मीडिया प्रभारी सुरेंद्र राजपूत, मुंबई काँग्रेसच्या मीडिया प्रभारी चयनिका युनियाल, मुंबई काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते युवराज मोहिते, सचिन सावंत, नासीर हुसेन, आकाश जाधव आदी उपस्थित होते.

## घरातून 'फेसबुक लाईव्ह' करणाऱ्या उद्धव ठाकरेंकडून 'मातोश्री'तूनच वचननामा प्रकाशित : चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

तभा वृत्तसेवा / विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.७ नोव्हेंबर:

उद्धव ठाकरेंची घरात बसून कारभार करायची सवय सुटलेली नाही. शिवसेना प्रमुख बाळासाहेबांच्या डोळ्यासमोर महाराष्ट्राचं हित तर उद्धव ठाकरेंच्या समोर फक्त कुटुंब असते, अशी टीका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरे यांच्यावर केला आहे ठाकरे गटाकडून आज वचननाम्याचे प्रकाशन झाले त्याबाबत स्वर वरून प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी त्यांचा चांगला समाचार घेतला. त्यात म्हटले आहे की,अडीच वर्षे घरात बसून फेसबुक लाईव्ह करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आज 'मातोश्री'त बसून उबाठा गटाचा वचननामा प्रकाशित केला.

अडीच वर्षे फक्त 'माझं कुटुंब माझी जबाबदारी' म्हणत स्वतःच्या कुटुंबापुरतं राजकारण केले. आताही घरात बसून कारभार करायची सवय सुटली नाही.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आतापर्यंत प्रत्येक वचननामा शिवसेना भवनात प्रकाशित केला. कारण त्यांच्या डोळ्यासमोर महाराष्ट्राचं हित होतं. पण सच्चा शिवसैनिकांना वाऱ्यावर सोडल्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या डोळ्यासमोर फक्त आणि फक्त कुटुंबचं आहे.

उद्धवजी नेता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो. असेही त्यांनी नमूद केले आहे.

## दहशतवादाविरुद्ध देशात मजबूत इकोसिस्टम : अमित शाह

नवी दिल्ली : मोदी सरकारने गेल्या १० वर्षांत दहशतवादाविरोधात पावले उचलली असून त्यामुळे दहशतवादाशी लढण्यासाठी एक मजबूत परिसंस्था निर्माण झाली आहे. २०१४ पासून दहशतवादी घटनांमध्ये ७०% घट झाली आहे. म्हणजे दहशतवाद्यांचे वय घटले आहे. त्यांचे आयुष्य आता वर्षानुवर्षे कमी झाले आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींचा दहशतवादाविरुद्ध झिरो टॉलरन्सचा नारा केवळ भारतानेच नव्हे तर संपूर्ण जगाने स्वीकारला आहे. राज्यांवर होणाऱ्या हल्ल्यांचा सामना पोलिसांना करावा लागणार आहे.मात्र, माहिती देण्यापासून ते कारवाईपर्यंत सर्वच केंद्रीय यंत्रणा सहकार्य करतील.असे अमित शहा म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी दोन दिवसीय दहशतवाद विरोधी परिषद-२०२४ चे उद्घाटन केले. यावेळी ते बोलत होते.अमित शाह पुढे म्हणाले की, या परिषदेमुळे भारतातील सुरक्षा पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय वाढेल. दिल्लीत सुरू असलेल्या राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) या परिषदेत गेल्या काही वर्षांत दहशतवादाविरोधातील कारवाईत आलेल्या अडचणींवर चर्चा होणार आहे. या परिषदेत राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, विशेष सुरक्षा संस्था, फॉरेन्सिक आणि तांत्रिक तज्ञ सहभागी होणार आहेत. दहशतवादविरोधी परिषद-२०२४ मध्ये दहशतवादाविरोधात मजबूत रणनीती बनविण्यावर चर्चा होणार आहे. परिषदेत आपल्या भाषणादरम्यान अमित शाह म्हणाले की, भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत.

## अमित शाह यांची आज कोल्हापूर, सांगलीत सभा

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.७ ऑक्टोबर: केंद्रीय गृहमंत्री व भाजपाचे हेवीवेट नेते अमित शाह महाराष्ट्र दौऱ्यावर असून उद्या शुक्रवारी त्यांच्या कोल्हापूर सांगली सातारा या ठिकाणी प्रचार सभा होणार आहेत .शाह यांचे गुरुवारी रात्री आगमन झाले असून ते कोल्हापुरात मुक्कामाला आहेत. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात रंगत वाढू लागली असून सत्तारूढ महायुतीने पुन्हा बहुमताने सत्तेत येण्यासाठी कंबर कसली आहे. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी ,केंद्रीय गृहमंत्री अमित यांच्यासह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व अन्य केंद्रीय नेत्यांच्या सभांचा धडाका लावला आहे. अमित शाह यांचे रात्री कोल्हापूर आगमन होत आहे. शुक्रवारी त्यांच्या कोल्हापूर दक्षिणमध्ये भाजपाचे उमेदवार अमल महाडिक यांच्या प्रचारासाठी सभा होणार आहे .




## राजकारणाचे बाजारीकरण रोखा: खा. अशोक चव्हाण



नांदेड - राजकारणाच्या बाजारीकरणामुळे विकास कामात खूप मोठ्या प्रमाणात अडचणी येत असून राजकारणाचे बाजारीकरण रोखण्याची आवश्यकता असल्याचे मत खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले.भोकर येथील गणराज मंगल कार्यालयात आयोजित कुलेकडगी समाज मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी कुलेकडगी समाजाचे जिल्हाध्यक्ष माधवराव राचेवाड, माधव अमृतवाड रामदास गाडे, अविनाश अमृतवाड, डॉ. गजानन गाडे शिवा तोटावाड, रामराव कोनूले, सुरेश बोंगलवाड यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना खासदार अशोक चव्हाण म्हणाले की, कुलेकडगगी समाजाची ताकद महत्त्वाची आहे. त्यामुळे समाजाने दायित्व स्वीकारून महायुतीला साथ देण्याची गरज आहे. ज्याप्रमाणे श्रीराम एकवचनी होते त्याप्रमाणेच मी देखील शब्द पाळणारा माणूस आहे. कमळाला मत म्हणजे विकासाला मत ही भावना निर्माण करून आपल्याला राज्यात महायुतीचे सरकार आणायचे आहे हे मनात ठेवून लोकसभा उमेदवार डॉ.संतुक हंबर्डे व श्रीजया चव्हाण यांना साथ द्यावी असे आवाहन खासदार अशोक चव्हाण यांनी केले. या मेळाव्याचे सूत्रसंचालन ॲड. सुनील पाटील यांनी, प्रास्ताविक रामदास गाडे तर आभार सुंकलोड यांनी मानले.









सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठवाड्यातील दुष्काळ नाहीसा होणारः देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा**
**किनवट/माहूर,दि. ०७ नोव्हेंबर**

मराठवाड्याला पाणी दुष्काळातून मुक्त करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून नदीजोड प्रकल्प हाती घेतला आहे. गोदावरी नदीत ५४ टी.एम. सी. पाणी मिळणार असल्याने मराठवाड्यातील दुष्काळ नाहीसा होणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. किनवट - माहूर विधानसभा मतदारसंघात भाजपा युती उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भाजपा महायुतीचे सरकार जुलै २०२२ रोजी स्थापन होऊन अडीच वर्षे झाली. या काळात येथील लोकप्रतिनिधींनी विकास कामासाठी जेवढा निधी मागितला तेवढा निधी आम्ही दिला. यामुळे आज कोट्यवधी रुपयांची कामे किनवटमध्ये पूर्ण झाली तर काही कामे प्रगतीपथावर आहेत. या निवडणुकीतही त्यांच्या पाठीशी राहिलात तर प्रलंबित सर्व प्रश्न मार्गी लागतील.

या मतदारसंघातील अनेक वर्षापासून प्रलंबीत उच्च पातळीच्या बंधाऱ्यांना मंजु- री देवून आर्थिक तरतूद केली. त्यामुळे मतदारसंघातील जमीन मोठ्या प्रमाणात सिंचनाखाली येऊन सुजलाम् सुफलाम - होणार आहे. मराठवाड्याला पाणी दुष्काळातून मुक्त करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून नदीजोड प्रकल्प हाती घेतला आहे. गोदावरी नदीत ५४ टी.एम. सी. पाणी मिळणार असल्याने मराठवाड्यातील दुष्काळ नाहीसा होणार आहे. या कामासाठी मोठा निधी लागणार असला. तरी आमच्या पाठीशी पंतप्रधान त्यांनी आम्हाला सांगितले कितीही निधी लागू द्या, निधी पुरवठा केला जाईल चिंता करू नका परंतु विकास कामे थांबवू नका. या कामाचे टेंडरही काढले व काम सुरुही झाले. राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीचे काम सुरु आहे.



त्यातून २५ लाख रोजगार निर्मिती होईल, अशी अपेक्षा आहे. महिला केंद्रीत अनेक योजना सुरु केल्या आहेत. लेक लाडकी, लाडकी वहीण, महामंडळाच्या बसमध्ये अर्धे तिकीट, लखपती योजना या योजनांसह अनेक महिलांसाठी योजना सुरु केल्या असून त्याचा लाभ मोठ्या प्रमाणात भगिनी घेत आहेत, याचा आनंद वाटतो, असेही ते शेवटी म्हणाले. यावेळी व्यासपीठावर माजी खासदार महात्मे, आदिलाबादचे आमदार पायल शंकर, एन. मधुकरराव, मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, प्रवीण पाटील चिखलीकर, संध्याताई राठोड, अशोक राव सूर्यवंशी पाटील, धरमसिंग राठोड, श्याम भारती महाराज, प्रा. किशन मिरासे, प्रकाश टारपे, वैजनाथ करपुडे पाटील, विनोद भरणे, इशा खान, राजेंद्र केशवे, सुनील पाटील, काशिनाथ शिंदे, भगवान हुर्दुके, बालाजी आलेवार, कांतराव घोडेकर, स्वागत आयनेनीवार, दिनकर चाडावर, दीपक नेमानीवार, बाबुराव केंद्रे, अमोल ढगे, आनंद मच्छेवार, विवेक केंद्रे, बालाजी भिसे, श्रीनिवास नेमानीवार आदींची उपस्थिती होती. सभेचे सूत्रसंचालन अशोक नेमानीवार यांनी केले. यावेळी मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

**लोकसभा निवडणुकीत त्यांच्या चिमटा प्रकल्पा संदर्भातील भाषणामुळे महायुती उमेदवाराला फटका बसला होता त्यामुळे फडणविस यांनी आज भाषण करतांना चिमटा प्रकल्प संदर्भात बोलतांना विशेष खबरदारी बाळगत लोकसभा निवडणुकी नंतर चिमटा प्रकल्पा संदर्भात केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीची माहिती दिली तर या प्रकल्पामुळे बाधित होणारी ९५ गावे यातुन वगळण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले केली.**

# राज्यस्तरीय शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेचे शानदार उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ नोव्हेंबर**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परीषद, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत राज्यस्तरीय शालेय १४ वर्षांतील मुले- मुली बेसबॉल क्रीडा स्पर्धा पीपल्स महाविद्यालय मैदान, नांदेड येथे ६ जानेवारी ते ८ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान पार पडणार आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन सचिव नांदेड एज्युकेशन सोसायटीचे श्रीमती शामल पत्की, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांच्या हस्ते आज झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाअध्यक्ष सी.ए.डॉ प्रवीण पाटील यांनी भूषविले. यावेळी प्रमुख उपस्थिती पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.एम.जाधव, प्रमुख पाहुणे एस एम पटेल, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त जे.ई.गुपिले, सुरज सोनकांबळे, नृसिंह आठवले, महाराष्ट्र राज्य बेसबॉल संघटनेचे तांत्रिक समितीचे गोकुळ तांदळे, कोल्हापूरचे सचिव राजेंद्र बनसोडे, ज्ञानेश काळे, क्रीडाअधिकारी संजय बेतीवार, क्रीडा मार्गदर्शक प्रकाश होनवडजकर, बालाजी शिरसीकर, क्रीडा अधिकारी राहुल श्रीरामवार, विपुल दापके, हौशी बेसबॉल जिल्हा संघटना नांदेडचे सचिव आनंदा कांबळे, निवड समिती सदस्य प्रदीप पाटील, वैष्णवी कासार, छ.संभाजीनगरचे सचिव तथा पंच प्रमुख गणेश बेटूदे, पीपल्स महाविद्यालयाचे प्राध्यापक विलास वडजे हे उपस्थीत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुकेश बिराजदार यांनी तर आभार प्रदर्शन क्रीडा मार्गदर्शक बालाजी शिरसीकर यांनी केले. आज झालेल्या सामन्यासाठी संतोष आवचार, आकाश साबणे, सोमनाथ सपकाळ, विशाल कदम, बालाजी गाडेकर, राहुल खुडे, गौस शेख यांनी पंच म्हणून तर गुणलेखक म्हणून सायमा बागवान, अमृता शेळके इत्यादींनी भूमिका निभावली.

स्पर्धा पार पाडण्यासाठी क्रीडा कार्यालयातील संतोष कणकावार वरिष्ठ लिपिक, दत्तकुमार धुतडे, संजय चव्हाण, आनंद जोंधळे, मोहन पवार, सुभाष धोंगडे, विद्यानंद भालेराव, सोनबा ओव्हाळे, यश कांबळे, शेखअक्रम,चंदू गव्हाणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील कर्मचारी, जिल्हा संघटना आदी परिश्रम घेत आहेत.

आज झालेल्या सामन्यांचा निकाल पुढीलप्रमाणे आहे.

मुले विभाग - १) कोल्हापूर वि. वी छ. संभाजीनगर (१५-०) होम रन, २) लातूर वि. वीनागपूर (७-१) होम रन, ३) पुणे वि. वी मुंबई (१०-४) होमरन४) अमरावती वि. वीनाशिक (१७-१) होमरन तर मुली विभाग - १) मुंबई वि. वी नाशिक (७-५) होमरन, २) अमरावती वि. वी लातूर (१६-३) होमरन, ३) नागपूर वि. वी छ. संभाजीनगर (१३-५) होमरन, ४) पुणे वि. वी कोल्हापूर (१५-०) होमरनया स्पर्धा पिपल्स कॉलेज, नांदेड येथे आयोजीत करण्यात आले असून, यास्पर्धेचा जास्तीत जास्त खेळाडू, क्रीडा प्रेमी, रसीकांनी आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### श्री १०८ श्री स्वामी गंभीरबन गुरु प्रसादबन महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाप्रसाद

**नांदेड**-नायगाव तालुक्यातील कोलंबी येथील श्री दत्त संस्थानचे गुरु मोक्षवासी श्री १०८ श्री स्वामी गंभीरबन गुरु प्रसादबन महंत महाराज यांच्या १४ व्या पुण्यतिथीनिमित्त दि. ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी



दहा वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.नायगाव तालुक्यातील कोलंबी येथील श्री दत्त संस्थानचे गुरु मोक्षवासी श्री १०८ श्री स्वामी गंभीरबन गुरु प्रसादबन महंत महाराज यांची १४ वी पुण्यतिथी दि. ८ नोव्हेंबर २०२४ रोजी आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. ८ रोजी सकाळी १० वाजता समाधी पूजा व अभिषेक करण्यात येणार आहे. तरी सर्व भक्त मंडळांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री १०८ श्री महंत यदुबन गुरु गंभीरबन महारज विश्वस्थ मंडळ आणि समस्त गावकरी मंडळींनी केले आहे.

### मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद

**नांदेड**-लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या दिवशी बुधवार, २० नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश मार्केट अँड फेअर ॲक्ट १८६२ चे कलम ५ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी निर्गमीत केले आहेत. लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी नांदेड जिल्ह्यातील ८३-किनवट, ८४-हदगाव, ८५-भोकर, ८६-नांदेड उत्तर, ८७-नांदेड दक्षिण, ८८-लोहा, ८९-नायगाव, ९०-देगलूर व ९१ मुखेड या नऊ विधानसभा मतदार संघात बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मतदान व मतमोजणी दिनांकास जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्यास आदेशित केले आहे. बुधवार २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार भरणाऱ्या गावांची ठिकाणाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. तालुका हदगाव-मनाठा, किनवट-माळ बोरगाव, मांडवी, माहूर-मौ.दहेगाव, अर्धापूर-कामठा, धर्माबाद-निरंक, नायगाव-सोमठाणा, देगलूर-शहापूर, मरखेल, बिलोली-सगरोळी, मुखेड-जाहुर, दापका गु. , सावरगाव पिर, नांदेड- मौ. वाडी अंतर्गत छत्रपती चौक ते डी मार्टपर्यत , मौ. तरोडा बु. व खु (तरोडा नाका), मुदखेड-निरंक, भोकर-निरंक, हिमायतनगर-हिमायतनगर शहर, उमरी-निरंक, लोहा-सोनखेड, उमरा, कंधार-मौ. बारुळ या ठिकाणची आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार २१ नोव्हेंबर २०२४ रोजी भरविण्यात यावेत. तसेच मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी परिसरात आठवडी बाजार भरत असल्यास याच आदेशान्वये ते बंद करण्यात येत असून हे आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी भरविण्यात यावेत असे आदेश निर्गमित केले आहे.

### एका वर्षात आरोग्य व्यवस्थेत झालेल्या बद्दलचा रिपोर्ट कार्ड सादरीकरण

नांदेड मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये २४ तासात २४ बालकांचा मृत्यू झाला होता. या घटने नंतर एका वर्षात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत झालेल्या बद्दलचा रिपोर्ट कार्ड सादरीकरण या कार्यक्रमात जन आरोग्य अभियान, महाराष्ट्र प्रतिनिधी करणार आहे. या बरोबर राज्यस्तरीय आरोग्य रिपोर्ट कार्डचे सादरीकरण करणार आहोत. याद्वारे सध्याच्या महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य क्षेत्रातील कामगिरीचे मूल्यांकन केले जाणार आहे.तसेच आगामी विधानसभा निवडणूक २०२४ चा जनतेचा आरोग्य जाहीरनामा देखील मांडला जाणार आहे. ज्या आधारे सर्व राजकीय पक्षांनी व अपक्ष उमेदवारनी आरोग्य क्षेत्राविषयी आपली भूमिका जाहीर करावी अशी आमची अपेक्षा आहे.

# आदमपूर परिसरातील हरभरा पिकांची उगवण जोमदार

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. ०७ नोव्हेंबर**

खरीप हंगामातील सोयाबीन,मूग,उडीद पिकांची उत्पादन क्षमता अतिवृष्टी आणि नैसर्गिक कारणांनी यंदा अत्यल्प झाली असल्याने बळीराजाचा पुरता अपेक्षाभंग झाला. आदमपूर गाव परिसरातील आडत व्यापाऱ्यांनी सोयाबीनला माऊच असल्याचे कारण देत भाव पाडून सोयाबीन मागितल्याने शेतकऱ्यांनी आपले अत्यल्प सोयाबीन वाळवून घरातच ठेवणे पसंत केले आहे. पेरणी केलेला हरभरा पीक शिवारात लुसलुशीत बहरल्याने बळीराजा सुखावला आहे.

शेतकरीवर्गांस आता रब्बी हंगामातील हरभरा, करडी पिकावर आर्थिक अपेक्षा अवलंबून आहेत.पोषक वातावरणाने यंदा हिवाळी सुरूवात झाल्याने गेल्या पंधरा वीस दिवसांपूर्वीच

**शेतकरी प्रभन्ना होटलप्पापाटील यांच्या शेतातील जोमदार आलेला हरभरा पीक**



पेरलेला हरभरा, करडी,ज्वारी पीक अगदी वाऱ्यासंगे डोलत आहे. बाजारात खत आणि बियाणे, पेरणी यंत्र खर्च, कचरा वेचणी मजूर आदि गोष्टी महागल्याने शेतकरीवर्गांस त्याचाही सामना करावा लागतोच आहे.ट्रॅक्टर यंत्राने बहुतांशी शेतकऱ्यांनी रब्बी पेरणी उरकल्याने उष्ण व दमट वातावरण लाभल्याने रब्बी पीकांची उगवण क्षमता जोमदार झाली असल्याचे चित्र सद्यस्थितीत समाधानकारक असे आहे. काही माळाकडील व नदीकडील शेत शिवारात हरणांचा आणि रानडुकरांचा वावरही असून रानडुकरांनी ताशीच्या ताशी हरभऱ्यात उकरल्याचेही चित्र दृष्टीस पडले आहे.शेतकरीवर्गांस रात्रीला पिकाची राखण करावी लागत आहे. मुतन्याळ, मिनकी, बडूर, आदमपूर, केसराळी, थडी हिप्परगा, खतगांव आदि भागातील काही शेतकऱ्यांनी तंबाखू पिकाची लागवड केली आहे.दरम्यान ऐन दिवाळीत हलकासा पाऊस कोसळला आणि आता दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण तयार झाल्या कारणाने हरभरा, बहरलेल्या तूर पिकावर अळीचा प्रादुर्भाव निर्माण होऊ शकतो, असे जाणकार शेतकरी बोलून दाखवत होते.

# प्रकाश मोगले यांच्या 'दिशा' कथासंग्रहावर एक दिवसीय चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ नोव्हेंबर**

मैत्री पब्लिकेशन आणि लोकायत विचारमंच यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाश मोगले यांच्या 'दिशा' कथासंग्रहावर एक दिवशीय चर्चासत्र रविवार, दि.१० नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता नरहर कुरूंदकर सभागृह, पीपल्स कॉलेज, नांदेड येथे आयोजित केले आहे.

या चर्चासत्रात डॉ.जी.के.ऐनापुरे, डॉ. वासुदेव मुलाटे, मोहिनी कारंडे, डॉ. उमेश बगाडे, श्रीधर चैतन्या आदी अभ्यासक सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रामप्रसाद तौर राहणार असून डॉ. आदिनाथ इंगोले आणि डॉ. कमलाकर चव्हाण चर्चक म्हणून असतील. चर्चा सत्रानंतर लगेचच आई क्रियशन निर्मित व डॉ. विलासराज भद्रे दिग्दर्शित 'दिशा'




या एकांकीकेचे सादरीकरण होईल. 'दिशा' या मूळ कथेचे नाट्यरूपांतर डॉ. आदिनाथ इंगोले यांनी केले आहे. तरी रसिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बल्क एसएमएस व्हाईस, एसएमएस विनापरवानगी जारी केल्यास कारवाई करणारः जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक २०२४ व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता सुरु आहे. आचारसंहिता कालावधीत उमेदवारांकडून मतदाराना मतदान करण्याबाबत विना परवानगी बल्क एसएमएस देण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या उमेदवारांना प्रचारासाठी बल्क एसएमएस पाठवायचे आहेत, त्यांनी माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीची परवानगी घेवूनच एसएमएस पाठविण्याची कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष अभिजीत राऊत यांनी केले आहे.

निवडणूक आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे बल्क एसएमएस, ई-पेपर, व्हीडीओ, ऑडीओ, रेडीओ चॅनेलवरील कोणत्याही जाहिरातीला परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी शिवाय इलेक्ट्रॉनिक्स फॉरमॅटवरील कोणतीही जाहिरात दिल्यास कारवाई केली जाईल. बल्क एसएमएस बाबत उमेदवारांच्या सर्व प्रतिनिधी समवेत उद्या दुपारी १ वाजता माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीच्यावतीने बैठक आयोजित केली आहे. तरी बल्क एसएमएस, व्हाईस सेवा पुरविणाऱ्या मेसेज एजन्सीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनातील माध्यम कक्षात बैठकीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांनी केले आहे.

**रेडिओ संदेश बल्क एसएमएस बंदीः** निवडणूक दिनांकाच्या ४८ तासाच्या शांतता काळामध्ये आकाशवाणी व खाजगी चॅनलवरील निवडणूक विषयीच्या बाबीचे प्रसारण बंद करण्याचे निर्देशही जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. तसेच मोबाईल वरील बल्क एसएमएस सेवाही या काळात बंद ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. ४८ तास आधी मोबाईलवर अशा प्रकारे आदेश आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी एसएमएस सेवा देणाऱ्या एजन्सीची असेल, यांची सर्वानी नोंद घ्यावी असेही आवाहन करण्यात आले आहे.

# गावठी कट्टा व जिवंत काडतूससह अल्पवयीन मुलास अटक;सोनखेड पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. ०७ नोव्हेंबर**

दि ६-११-२०२४ रोजी नांदेड ते उस्माननगर रोडवर ढाकनी शिवारात एक जण गावठी कट्टा बाळगत असल्याची माहिती सोनखेड पोलिसांना मिळाल्यावर सोनखेड पोलीस स्टेशनचे चे सपोनि पांडुरंग माने व बिट जमादार वामन नागरगोजे यांनी तात्काळ ढाकनी येथे जाऊन एका सतरा वर्ष्याच्या मुलाची झडती घेतली असता त्याच्या जवळ एक गावठी कट्टा व एक जिवंत काडतूस किंमत एकूण ४०,४०० रु विनपारवाना बाळगलेला मिळून आल्याने संघरत्न



उर्फ डोरेमोन पिता माधव वाघमारे वय १७ वर्षे दहा महिने राहणार शाहूनगर वाघाळा नांदेड यास सपोनि पांडुरंग माने यांच्या फिर्यादी वरून व माननीय जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे शस्त्र बंदी आदेशाचे उल्लंघन केले वगैरे फिर्याद वरून भारतीय हत्यार कायदा, कलम १३५ नमूद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला व पुढील तपास पोहेका नागरगोजे करीत आहेत.

# मुक्रमाबाद येथे दिव्यांग बांधवांची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. ०५ नोव्हेंबर**



मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील रुक्मिणी मंगल कार्यालयात दि. ४ सोमवार रोजी मुक्रमाबाद सर्कल मधील दिव्यांग बांधवाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत चर्चा करुन मुखेड- कंधार विधानसभेचे परिवर्तन महाशक्ती आघाडीचे उमेदवार राहुल नावंदे यांना जाहिर पाठिंबा दिला.यावेळी प्रहार जणशक्ती पक्षाचे नांदेड जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव देशमुख, प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष हुंडेकर साहेब, प्रहार दिव्यांग क्रांती संघटना महिला आघाडीचे मुखेड तालुका अध्यक्ष राजेश्रीताई गवलवाड, स्वराज्य संघटनेचे नांदेड जिल्हाउपाध्यक्ष श्रीकांत सुवर्णकार, मस्तान शेख, प्रहारचे मुखेड विधानसभा अध्यक्ष बालाजी राठोड, प्रहार युवा आघाडीचे तालुका अध्यक्ष हणमंत मुगवणे, आदिची उपस्थिती होती, या बैठकीत संवाद साधताना परिवर्तन महाशक्ती आघाडीचे उमेदवार राहुल नावंदे पुढे बोलताना म्हणाले की खऱ्या अर्थाने दिव्यांग बांधवांचे प्रश्न मार्गी लावून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मला विधानसभेत पाठवा असे अवाहन केले. आहे मी तिसऱ्या अघाडीचा उमेदवार म्हणून ही निवडणूक पुर्ण ताकदीशी लढवणार असून पैशांचा होणारा पाऊस बघता यावेळी सर्वसामान्य जणता हे प्रामाणिक व्यक्ती सोबत राहतील पैसा असणाऱ्या सोबत नाही असेही ते म्हणाले यांप्रसंगी आयोजित बैठकीत मुक्रमाबाद विभागातील दिव्यांग बांधव व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ३ लाख ३८ रुपयांचा मुद्देमाल जप्त

## नांदेड जिल्हयाच्या दलाकडून १६ धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ नोव्हेंबर**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आचारसंहितेमध्ये अवैध मद्य जप्त करण्याची धडक कारवाई नांदेड जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे. ६ नोव्हेंबर रोजी विभागाने १६ ठिकाणी धाडी टाकून एकूण ३ लाख ३८ हजार ९८० रुपयांच्या मुद्देमालाची दारू जप्त केल्याची माहिती नांदेडचे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक गणेश पाटील यांनी दिली आहे.

६ नोव्हेंबर रोजी झालेल्या कारवाईमध्ये विविध ठिकाणी एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. हस्तगत करण्यात आलेल्या जानमालामध्ये एकूण १६ गुन्हे, वारस १६, अटक आरोपी १६, रसायन ४५० लि. देशी मद्य ९४.२० लि., जप्तवाहन संख्या ०३ जप्त असे एकूण सर्व मुद्येमाल ३ लाख ३८ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रिया मुक्त व निर्भयपणे पार पाडावी यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागास दक्ष राहण्याचे व आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी आदेश दिले आहेत. त्यानंतर जिल्ह्यामध्ये विभागामार्फत धाडी टाकण्याचे सत्र सुरू आहे. निवडणूक काळामध्ये यामध्ये अधिक वाढ करण्यात आली असून अवैध दारू विक्रीवर विभागाची काटेकोर नजर आहे. मद्याचा गैरवापर निवडणूक काळात होत असल्यास या संदर्भात विभागाला नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ९९९९ व व्हॉटसप क्र. ८४२२००११३३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# मुदखेड येथे कुंभार समाज कार्यकर्ता मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०७ नोव्हेंबर**

स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य शाखा मुदखेडच्या वतीने कुंभार समाज कार्यकर्ता मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कुंभार समाज कार्यकर्ता मेळाव्याचे उद्घाटक माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ओबीसी भाजपा प्रदेश अध्यक्ष संजय गाते हे होते. कुंभार समाज कार्यकर्ता मेळावा कार्यक्रम स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था प्रदेशाध्यक्ष विजय देवडे लहानकर, व प्रदेश सचिव शिवाजी पांगरेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली रनछोदास मंगल कार्यालय येथे स्वाभिमानी कुंभार समाज शाखा मुदखेडच्या वतीने



आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाप्रसंगी नांदेड जिल्हा अध्यक्ष विभुते लक्ष्मणराव काटकळंबेकर, रमेश देगावकर, केरोजी आचार्य, माधवराव पदमपेंटे, बाबू चिलवंतकर, मुदखेड तालुका अध्यक्ष विठ्ठल आचार्य, शिवाजी निमगावकर, अर्धापूर तालुकाध्यक्ष परडे, यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळाव्याचे औचित्य साधून नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती संजय गाते यांच्या हस्ते करण्यात आली. कार्यकर्ता मेळावा प्रसंगी स्वाभिमानी कुंभार समाज शाखा मुदखेड व सर्व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते ओबीसी भाजपा प्रदेश अध्यक्ष संजय गाते यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष संजय सोनटक्के, जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, संघटक बाळासाहेब देशमुख बारडकर,तालुका माजी संचालक बालाजी तेलंगे, नागेलिकर, धनराज शिरोळे, माधव कदम, पंडित तेलंगे, पप्पू तेलंगे, यांच्यासह असंख्य कुंभार समाज बांधवांची उपस्थिती होती.

Format C-1

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

Name of Political Party: Independent
Name of the Election: Maharashtra Legislative Assembly 2024
Name of State/UT: Maharashtra
(1) Name of the Constituency: 85-Bhokar
Name of the candidate: Jakir Sagir Shaikh

| Sr.No. | | Criminal antecedents | |
|---|---|---|---|
| 1. | a. | Nature of Offence | 1. FIR No. [illegible] punishable u/s [illegible] of IPC with Sec. 67 of IT Act Registered with PS [illegible] 2. FIR No. [illegible] punishable u/s [illegible] of IPC with Sec. 67 of IT Act Registered with PS [illegible] |
| | b. | Case No. | 1. S.C.C. No. [illegible] 2. R.C.C. No. [illegible] |
| | c. | Name of Court | 1. Hon'ble J.M.F.C. Nanded 2. Hon'ble C.J.M. Nanded |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | 1. No 2. No |
| | e. | Date of Conviction, if any | NIL |
| | f. | Details of Punishment undergone, if any | NIL |
| | g. | Any other information required to be given | Both the cases are still under consideration before Hon'ble Court. |
| 2. | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate Jakir Sagir Shaikh is a Social Worker and running member of NP Ardhapur, he had registered various crimes against corruption and saved the huge money of Government due to this work he has been awarded as Maharashtra Bhushan Award |
| 3. | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | Candidate Jakir Sagir Shaikh is contesting this election as independent candidate |

(2) Name of the Constituency: 85-Bhokar
Name of the Candidate: JAKIR SAGIR SHAIKH ........ and so on
* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency

Date: 08/11/2024
Place: Bhokar

Jakir Sagir Shaikh
R/o Barkatpura, Ardhapur, Nanded.

# स्कोडा ऑटो इंडियाकडून नवीन एसयूव्ही कायलॅकचे अनावरण

मुंबई, ७ नोव्हेंबर २०२४ : स्कोडा ऑटो इंडियाने पहिल्यांदाच भारत व जगासाठी बहुप्रतिक्षित एसयूव्ही 'कायलॅक'चे अनावरण केले आहे. कायलॅक भारतात स्कोडा ऑटोसाठी न्यू एराची सुरूवात करत आहे, जेथे ब्रँड नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यासोबत नवीन ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहे. कंपनीने यंदा फेब्रुवारीमध्ये या एसयूव्हीच्या घोषणेसह भारतात अधिक विस्तार करण्याच्या आपल्या महत्त्वाकांक्षांना अधिक दृढ केले. यंदा ऑक्टोबरमध्ये स्कोडा ऑटो इंडियाने कायलॅकच्या कमॉफ्लेज प्री-प्रॉडक्शन व्हर्जनच्या ड्रायव्हिंग चाचण्या केल्या. एक महिन्यानंतर कायलॅकचे वर्ल्ड प्रीमियर करण्यात आले आहे, तसेच बुकिंग्जना २ डिसेंबर २०२४ पासून सुरूवात होईल.

स्कोडा ऑटोचे मुख्य कार्यकारी अधिकारी क्लॉस झेलमर म्हणाले, ''स्कोडा कायलॅक आमची पहिली सब-४-मीटर एसयूव्ही आहे, जी आमच्या ब्रँडसाठी नवीन एण्ट्री पॉइण्ट म्हणून भारतात आणि भारतीयांसाठी डिझाइन करण्यात आली आहे. भारत आमच्या आंतरराष्ट्रीयीकरण योजनांसाठी प्रमुख असण्यासोबत जगातील तिसरी सर्वात मोठी कार बाजारपेठ आहे आणि एसयूव्हींचे नवीन वेईकल विक्रीमध्ये जवळपास ५० टक्के योगदान आहे. या लोकप्रिय व झपाट्याने विकसित होणाऱ्या विभागामध्ये सर्वोत्तम एसयूव्हींचा शोध घेत असलेल्या नवीन ग्राहकांनी कायलॅकचे मनापासून स्वागत करावे, अशी आमची इच्छा आहे. आकर्षकतेमध्ये अधिक भर करत कायलॅक भारतात नवीन व्हिज्युअल आकर्षकतेसह आमच्या मॉडर्न सॉलिड डिझाइन शैलीचे पदार्पण करत आहे. या वेईकलमध्ये व्हेरिएण्टस्, रंग, वैशिष्ट्यांची व्यापक निवड आणि २५ हून अधिक ॲक्टिव्ह व पॅसिव्ह सुरक्षितता तंत्रज्ञानांचे प्रमाणित पॅकेज आहे. ७,८९,००० रूपयांच्या स्पर्धात्मक सुरूवातीच्या किमतीसह कायलॅक भारतातील सर्वात उपलब्धहोण्याजोगे स्कोडा मॉडेल आहे.''

## कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
विभाग : नगर रचना, जा.क्र./न.पा./३०५९/२०२४-२५, दिनांक:- ०६/११/२०२४

## जाहीर प्रगटन

हिंगोली शहरातील सर्व नागरीकांना जाहीररीत्या कळविण्यात येते की, गट क्र. १५६/१, अर्जदार राजेश रामेशलाल जयस्वाल यांनी या कार्यालयात अर्ज करून प्रस्ताब सादर केला आहे की, त्यांचा मिळकत गट, १५६/१ हिंगोली मधील खालील क्षेत्रफळाचा हिस्सा त्यांचे मालकीचे असून ते ३० मीटर व १२ मीटर रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत असल्यामुळे विकास हक्क हस्तांतरण च्या मोबदल्यात हिंगोली नगर परिषदेस रस्त्याचे प्रयोजनासाठी हस्तांतरीत करणेकरीता कळविले आहे.

मालमत्तेचे विवरण

सर्व्हे नं. / न.भु. क्र. : १५६/१

| | |
|---|---|
| एकुण भखंड क्षेत्र : १०३८० चौ.मी., | रस्त्याने बाधीत क्षेत्र : ४२२८. ५७ चौ.मी. |
| पूर्व : स. नं.१३८ | पश्चिम स. नं. १५६ |
| उत्तर: स. नं. १५५ | दक्षिण : स. नं. १५७ |

सदर जमीनी बाबत या कार्यालयाने मंजूर विकास नियंत्रण व प्रोस्ताहन नियमावली नुसार आणि या ३०५८ कार्यालयाचे लेटर ऑफ इंटेट जा. क्र. नुसार विकान हस्तांतरीत परवानगी देण्यास कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा सदर हस्तांतरण व्यवहारास काही आक्षेप, तक्रार इत्यादी असल्यास तसेच मालकी हक्क बाबत न्यायालयीन वाद असल्यास अथवा कोणत्याही बैंकेकडे तारण असल्यास, सदर प्रकरण प्रसिद्ध झाल्या पासुन पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हिंगोली नगर परिषद कार्यालयास कागदीप्रत्र पुरावे सह सादर करावयात. विहित मुदतीत कोणाचा आक्षेप, तक्रार प्राप्त न झाल्यास सदरच्या हस्तांतरण व्यवहारास कोणाचाही आक्षेप नाही असे समजण्यात येऊन सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यावाही करण्यात येईल.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुद्दती नंतर आलेले आक्षेप, तक्रार विचारात घेतले जाणार नाही.

(अरविंद मुंढे)
मुख्याधिकारी
नगर परिषद, हिंगोली

## जाहिर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.मु.नं. २१२/२०२४
पुढील तारीख ०४/११/२०२४.

अर्जदार : १. नवलकोर भ्र. विसनसिंग चुंगडे वय ८२ वर्षे, धदा शेती व घरकाम २. रणजितसिंह पि. बिसनसिंगज चुंगडे (मयत) यांचे वारस ३. शिवनंदा भ्र. रंजीतसिंग चुंगडे वय ४२ वर्षे धदा – शेती व घरकाम ४. विक्रम पि. रंजित पुडा वय १८ वर्षे, धंदा – शेती, ५. कार्तिक पि. रंजित चुंगडे वय १६ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क. सख्खी आई अर्जदार क्र. ३ शिवनंदा भ्र. रणजितसिंह चंगडे सर्व रा. खापरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक.

अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ७ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. के. पी. राजपुत यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, मयत बिसनसिंह रामलाल चुंगडे यांचा मृत्यू दि. ०४/१०/२०१० रोजी मौजे खापरखेड़ा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाला आहे. ते खापरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते. अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी आहे, अर्जदार क्र २ हा मयताचा मुलगा होता. तसेच अर्जदार क्र. ३, ४ व ५ हे मयत मुलाचे वारस आहेत. मयत बिसनसिंह रामलाल चुंगडे यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी, म्हणजे विद्युत कार्यालय, सार्वजनीक बांधकाम उपविभाग कार्यालय, तहसील कार्यालय, नगर परिषद, भूमी अभीलेख कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय तसेच पेन्शन व अन्य ठिकाणी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी त्यांनी विद्यमान न्यायालयात अर्ज केला आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगीं देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २४/१०/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहिर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.मु.नं. २१५/२०२४
पुढील तारीख ०४/११/२०२४.

अर्जदार :– १. नवलकोर भ्र. विसनसिंग चुंगडे वय ८२ वर्षे, धदा शेती व घरकाम २. शिवनंदा भ्र. रंजीतसिंग चुंगडे वय ४२ वर्षे धदा – शेती व घरकाम ३. विक्रम पि. रंजित पुडा वय १८ वर्षे, धंदा – शेती, ४. कार्तिक पि. रंजित चुंगडे वय १६ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क. सख्खी आई अर्जदार क्र. ३ शिवनंदा भ्र. रणजितसिंह चंगडे सर्व रा. खापरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैर अर्जदार – निरंक,

अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ७ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. के. पी. राजपुत यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे, की, मयत रणजितसिंह पि. बिसनसिंह चुंगडे यांचा मृत्यू दि. ११/०६/२०२४ रोजी मोजे खापरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाला आहे. ते खापरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते. अर्जदार क्र १ ही मयताची आई आहे, अर्जदार क्र २ ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र. ३ व ४ हे मयताची मुले आहेत. मयत रणजितसिंह पि. बिसनसिंह चुंगडे यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही बारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी, म्हणजे विद्युत कार्यालय, सार्वजनीक बांधकाम उपविभाग कार्यालय, तहसील कार्यालय, नगर परिषद, भूमी अभीलेख कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय तसेच पेन्शन ब अन्य ठिकाणी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी त्यांनी विद्यमान न्यायालयात अर्ज केला आहे, त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक :– २४/१०/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ५००/२०२४

अर्जदार – १) सिताबाई भ्र शेषराव थोरात वय ७७ वर्षे धंदा घरकाम रा. लखमापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रावसाहेब शेषराव थोरात वय ५२ वर्षे धंदा शेती, रा. लखमापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) नानासाहेब शेषराव थोरात वय ४७ वर्षे धंदा शेती रा. लखमापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) एकनाथ शेषराव थोरात वय ३७ वर्षे धंदा शेती, रा. लखमापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) मुक्ताबाई भ्र. अशोक मदने, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. माका ता. नेवासा जि. अहिल्यानगर (अहमदनगर)

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम. डी. तांबे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.५ ही त्यांची बहिण आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील नामे शेषराव यशवंतराव थोरात हे मौजे अंमळणेर गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते वैद्यकीय उपचारादरम्यान अनुभुले हॉस्पीटल अहमदनगर येथे दिनांक २८/०३/२०२१ रोजी मयत झालेले आहे. मयत शेषराव यशवंतराव धोरात यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ ते ४ हे मुले व अर्जदार क्र.५ ही मुलगी असे कायदेशीर वारसदार असून त्यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणीही कायदेशीर वारसवार नसल्याचे सांगुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ७/११/२०२४ दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.वि.अर्ज क्र. ४८९/२०२४

अर्जदार – १) मिनाबाई शिवाजी बोरकर, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) गणेश शिवाजी बोरकर, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) अलकनंदा बाबु जाधव, वय ३५ वर्षे धंदा घरकाम रा. नेवासा ता. नेवासा जि. अहमदनगर ४) शितल रामभाऊ जाधव, वय २९ वर्षे, धंदा घरकाम रा. आडगाव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक

प्रकरण – हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. के. आर. कऱ्हाळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ ह्या आपसात नात्याने सख्खे बहिण व भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे शिवाजी गंगाधर बोरकर हे मौजे दायगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २३/११/२०२२ रोजी मौजे दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत शिवाजी गंगाधर बोरकर यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत शिवाजी गंगाधर बोरकर यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणपत्र मिळणे कामी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०७/११/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. ४८५/२०२४,

अर्जदार :– १) जुबेदाबी महेमुद शाह, वय ७६ वर्षे धंदा घरकाम रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) अन्सार पि. महेमुद शाह, वय ४९ वर्षे धंदा मजुरी रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) युनुस पि. महेमुद शाह, वय ४७ वर्षे धंदा मजुरी रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) मुख्तार पि. महेमुद शाह, वय ४५ वर्षे धंदा मजुरी रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) जुलेखा भ्र. इम्रान शाह, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम रा. जळगाव रोड, सावंगी, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) फरजाना पि. महेमुद शाह, वय ३२ वर्षे धंदा घरकाम रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : गफार पि. महेमुद शाह, वय ४८ वर्षे धंदा व्यापार रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.वी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ व गैरअर्जदार हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र. ५ व ६ ह्या त्यांच्या वहिणी आहेत तसेच अर्जदार क्र.१ ही त्यासर्वांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ६ आणि गैरअर्जदार यांचे पिता नामे महेमुद पापा शाह हे मौजे हर्सल सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २१/०४/२०२४ रोजी मौजे हर्सल / सावंगी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत महेमुद पापा शाह यांना अर्जदार क्र.१ ते ६ व गैरअर्जदार हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत महेमुद पापा शाह यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०६/११/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. एन. काटकर मॅडम सह–दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ३०८/२०२४
पुढील तारीख : ३०/११/२०२४

अर्जदार : १– माणिक पिता लक्ष्मण निकम, २– संपत पिता लक्ष्मण निकम, ३– श्रीमती वच्छलाबाई उर्फ वच्छाबाई भ्र. दौलत निकम, ४– नंदु पिता दौलत निकम, ५– संजय पिता दौलत निकम, ६– दत्तात्रय उर्फ दत्तू पिता सुदाम निकम, ७ गणेश पिता सुदाम निकम, ८– साखरबाई भ्र. कैलास निकम, ९– अशोक पिता कैलास निकम, १०– गोरख पिता कैलास निकम, ११– ज्ञानेश्वर पिता कैलास निकम, वरील सर्व रा. गव्हाली, ता. कन्नड जि. औरंगाबाद

– विरुध्द –

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर जिल्हा छ. संभाजीनगर

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. (Legal heirship Certificate)

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. कृष्णा जाधव यांच्या मार्फत या न्यायालयात श्री. लक्ष्मण पिता तुकाराम निकम, रा. गव्हाली, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) हे दिनांक १५ जुलै, १९९८ रोजी मौजे गव्हाली, ता. कन्नड येथे मरण पावले, मयत श्री. लक्ष्मण निकम हयांची पत्नी नामे श्रीमती परीगाबाई भ्र. लक्ष्मण निकम ही दिनांक ८.९.२००० रोजी मरण पावली. या दोघांना ५ मुले १ नामे माणिक, २ कै. दौलत, ३ संपत ४ कै. सुदाम आणि ५ कै. कैलास ही झालीत, या पैकी माणिक व संपत ही मुले हयात असून सदर अर्जातील अर्जदार क्रमांक १ व २ म्हणून आहेत, बाकी मुले नामे दौलत, सुदाम व कैलास ही मरण पावली असून अर्जदार क्रमांक ३ ते ११ ही त्यांची वारस आहेत. मयत श्री. लक्ष्मण यांचा मुलगा नामे दौलत हा दिनांक १३ ऑगस्ट १९९३ रोजी मयत श्री. लक्ष्मण हयांचे हयातीतच मरण पावला असून त्यास पत्नी श्रीमती वच्छलाबाई अर्जदार क्रमांक ३ व मुले नामे नंदु अर्जदार क्रमांक ४। आणि संजय अर्जदार क्रमांक ५ वारस आहेत. मयत श्री. लक्ष्मण निकम हयांचा मुलगा नामे सुदाम हा दिनांक १५ डिसेंबर, २०१२ रोजी मौजे गव्हाली ता. कन्नड येथे मरण पावला असून त्याची पत्नी श्रीमती जिजाबाई भ्र. सुदाम निकम ही देखील दिनांक १५ जुलै, २०२३ रोजी मयत झाली. या दोघांना दोन मुले नामे दत्तात्रय पिता सुदाम निकम (अर्जदार क्रमांक ६) आणि गणेश पिता सुदाम निकम (अर्जदार क्रमांक ७) अशी वारस आहेत. श्री. लक्ष्मण निकम हयांचा मुलगा नामे कैलास दिनांक ११.९.२०२० रोजी मौजे गव्हाली ता. कन्नड येथे मरण पावला, मयत कैलास पिता लक्ष्मण निकम हयांस वारस पत्नी नामे, १ श्रीमती साखरबाई अर्जदार क्रं.८ व मुले २– अशोक, ३ गोरख, आणि ४–ज्ञानेश्वर अर्जदार क्रं. ९,१०, व ११ अनुक्रमे आहेत. मयत श्री. लक्ष्मण पिता तुकाराम निकम हयांचे पश्चात त्यांचे नावे मौजे गव्हाली, ता. कत्रड चे शिवारात मिळकत शेत जमीन गट क्रमांक १३ एकूण क्षेत्र २ हे.५२ आर पैकी क्षेत्रफळ १ हे.४० आर आहे. वरील अर्जदार क्रमांक १ ते ११ हयांचे शिवाय मयत श्री. लक्ष्मण निकम हयांना इतर कुणीही वारस नाहीत. त्याने त्याचे हयातीत कोणतेही मृत्यु पत्र अथवा इच्छा पत्र लिहून ठेवलेले नव्हते व नाही, मयत श्री. लक्ष्मण निकम हयांचे नावे असलेली वरील मिळकत अर्जदारांचे नावे राजस्व कागदोपत्री नामांतरीत होवून मिळणेसाठी सदर कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रमांक १ ते ६ आणि ८ ते ११ हयांना वरील मिळकत अर्जदार क्रं.७ गणेश हांचे नावे व हक्कात राजस्व कागदोपत्री नामांतर होणे बाबत काही एक हरकत नाही.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २५.१०.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक २५.१०.२०२४

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहिर प्रगटन

**मा.ए.आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज.क्रं. २९२/२०२४.
पुढील तारीख २०/११/२०२४.

अर्जदार : १. विमलबाई भ्र. रुमदेव चव्हाण, वय ६९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. कैलास पिता रुमदेव चव्हाण, वय ३२ वर्षे, धंदा मजुरी, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. लक्ष्मण पिता रुमदेव चव्हाण, वय ३१ वर्षे, धंदा मजुरी, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. जोशिला भ्र. दत्तात्रय राठोड, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. भारंबा वाडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. सुषमा भ्र. विजय राठोड, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. राजराजेश्वरी मंगल कार्यालय जवळ, पंचाक, जेल रोड, नाशिक ता. व जि. नाशिक,

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज :– बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत रुमदेव पुना चव्हाण रुमदेव पुना चव्हाण यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मुले असून अर्जदार क्र. ४ व ५ ह्या मयत रुमदेव पुना चव्हाण यांच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्र. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत रुमदेव पुना चव्हाण यांचे कायदेशीर वारस असून यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे रुमदेव पुना चव्हाण हे वडनेर तांडा ता. कन्नड येथील रहिवाशी होते. मयत रुमदेव पुना चव्हाण हे दि. २०/०४/२०२२ रोजी वडनेर तांडा येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. आम्ही अर्जदार क्रं. १ ते ५ यांना मयत स्मदेव पुना चव्हाण यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. मयत कमलाबाई भ्र. विनायक राठोड मौजे वडनेर तांडा, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाली आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक ०९/०८/२०२४ रोजी मौजे वडनेर तांडा, ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक/१०/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए.आय.आवटी, मॅडम सह–दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : ३१०/२०२४
पुढील तारीख : ४/१२/२०२४

अर्जदार : १– दत्तात्रय उर्फ दत्तू पिता सुदाम निकम, २– गणेश पिता सुदाम निकम, दोघे रा. गव्हाली, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : १– महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर २– माणिक पिता लक्ष्मण निकम, ३– संपत पिता लक्ष्मण निकम, ४– नंदु पिता दौलत निकम, ५– संजय पिता दौलत निकम, ६– श्रीमती वच्छलाबाई उर्फ वच्छाबाई भ्र. दौलत निकम, वरील सर्व रा. गव्हाली, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. Legal heirship Certificate

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. कृष्णा जाधव यांच्या मार्फत या न्यायालयात श्री. सुदाम पिता लक्ष्मण निकम, रा. गव्हाली, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) हे दिनांक १५ डिसेंबर, २०१२ रोजी मौजे गव्हाली, ता. कन्नड येथे मरण पावले, मयत श्री. सुदाम निकम नंतर पत्नी नामे श्रीमती जिजाबाई भ्र. सुदाम निकम हीचे देखील दिनांक १५.७.२०२३ रोजी निधन झाले असून त्या उभयतांना मुले १– दत्तात्रय, आणि २–गणेश अशी वारस आहेत. मयत श्री. सुदाम निकम यांचे नावे मौजे गव्हाली, ता. कन्नड शिवारातील मिळकत शेत जमीन गट क्रं. ७२ एकूण क्षेत्रफळ ६ हे.८९ आर. पैकी क्षेत्र १ हे. १३ आर पोटखराब ०.०८ आर असे एकूण १ हे.२१ आर सामाईक क्षेत्र असून त्यामध्ये गैरअर्जदार क्रं. २ ते ५ यांचे देखील हिस्से असून अदयाप पावेतो आपसात वाटप झालेले नाही. मयत श्री. सुदाम निकम यांना वरील अर्जदार क्रमांक १ व २ हयांचे शिवाय इतर कुणीही दुसरे कोणीही वारस नाहीत. मयताने कोणतेही मृत्युपत्र अथवा इच्छापत्र लिहून ठेवलेले नव्हते व नाही. मयताचे नावे वर दर्शविलेल्या मिळकती बाबत वारस प्रमाणपत्र (Succession certificate) अथवा कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र (Legal Heir-ship Certificate) मिळणे बाबत या पुर्वी प्रस्तुत अथवा इतर कोणत्याही न्यायालयात सदर अर्जदाराचे वतीने या अर्जा शिवाय कोणताही अर्ज किंवा प्रकरण दाखल केलेले नव्हते व नाही. मयताचे नावे वर दर्शविल्या प्रमाणे असलेल्या मिळकतीचे राजस्व कागदोपत्री अर्जदारांची नावे नामांतर होवून मिळणे संबंधी सदरचे कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज दिलेला आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आक्षेप सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २५.१०.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक – २५.१०.२०२४

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्हि. एन. काटकर मॅडम सह–दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : ३११/२०२४
पुढील तारीख : ३०/११/२०२४

अर्जदार : १– साखरबाई भ्र. कैलास निकम २– अशोक पिता कैलास निकम ३– गोरख पिता कैलास निकम ४– ज्ञानेश्वर पिता कैलास निकम, वरील सर्व रा. गव्हाली, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद

– विरुध्द –

गैरअर्जदार : १– महाराष्ट्र शासन, मार्फत– जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर २– माणिक पिता लक्ष्मण निकम, ३– संपत पिता लक्ष्मण निकम, ४० नंदु पिता दौलत निकम, ५– संजय पिता दौलत निकम, ६– श्रीमती वच्छलाबाई उर्फ वच्छाबाई भ्र. दौलत निकम, वरील सर्व रा. गव्हाली, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. Legal heirship Certificate

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. कृष्णा जाधव यांच्या मार्फत या न्यायालयात श्री. कैलास पिता लक्ष्मण निकम, रा. गव्हाली, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) हे दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजी मौजे गव्हाली, ता. कन्नड येथे मरण पावले, मयत श्री. कैलास निकम नंतर त्यास पत्नी १–साखरबाई, मुले २– अशोक, आणि ३–गोरख, ४– ज्ञानेश्वर अर्जदार १ ते ४ अशी वारस आहेत. मयत श्री. कैलास निकम यांचे नावे मौजे गव्हाली, ता. कन्नड शिवारातील मिळकत शेत जमीन गट क्रं. ७२ एकूण क्षेत्रफळ ६ हे.८९ आर. पैकी क्षेत्र १ हे.१३ आर पोटखराब ०.०८ आर असे एकूण १ हे.२१ आर सामाईक क्षेत्र असून त्यामध्ये गैरअर्जदार क्रं. २ ते ५ यांचे देखील हिस्से असून अदयाप पावेतो आपसात वाटप झालेले नाही. मयत श्री. कैलास निकम यांना वरील अर्जदार क्रमांक १ ते ४ हयांचे शिवाय ईतर दुसरे कोणीही वारस नाहीत. मयताने कोणतेही मृत्युपत्र अथवा इच्छापत्र लिहून ठेवलेले नव्हते व नाही. मयताचे नावे वर दर्शविलेल्या मिळकती बाबत वारस प्रमाणपत्र (Succession certificate) अथवा कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र (Legal Heir-ship Certificate) मिळणे बाचत या पुर्वी प्रस्तुत अथवा ईतर कोणत्याही न्यायालयात सदर अर्जदाराचे वतीने या अर्जा शिवाय कोणताही अर्ज किंवा प्रकरण दाखल केलेले नव्हते व नाही. मयताचे नावे वर दर्शविल्या प्रमाणे असलेल्या मिळकतीचे राजस्व कागदोपत्री अर्जदारांची नावे नामांतर होवून मिळणे संबंधी सदरचे कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज दिलेला आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २५.१०.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक – २५.१०.२०२४

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ, अर्ज.क्रं. २९०/२०२४,
पुढील तारीख १०/१२/२०२४.

अर्जदार : १. बिंदीबाई भ्र. शंकर राठोड, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. कोळवाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. गंगाबाई भ्र. ममराज राठोड, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडनेर तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. मिराबाई भ्र. रावसाहेब राठोड, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. जेहूर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. चागुनाबाई भ्र. विष्णू राठोड, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. हनुमान मंदिर जवळ, सिंचन नगरी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. रुमदेव पुना चव्हाण, (मयत दि.२०/०४/२०२२ चे वारस) ५.१ विमलाबाई 'भ्र. रुमदेव चव्हाण, वय ६९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.२ कैलास पिता रुमदेव चव्हाण, वय ३२ वर्षे, धंदा मजुरी, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.३ लक्ष्मण पिता रुमदेव चव्हाण, वय ३१ वर्षे, धंदा मजुरी, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ५.४ जोशिला भ्र. दत्तात्रय राठोड, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. भारंबा वाडी, ता. कब्रड जि. औरंगाबाद. ५.५ सुषमा भ्र. विजय राठोड, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. राजराजेश्वरी मंगल कार्यालय जवळ, पंचाक्र, जेल रोड, नाशिक ता. व जि. नाशिक.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर.

अर्ज :– बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, आम्ही अर्जदार क्र. १ व ४ हे मयत पुना रामा चव्हाण व मयत कोंडीबाई भ्र. पुना चव्हाण यांच्या विवाहित मुली आहेत व अर्जदार क्र. ५ मयत रुमदेव पुना चव्हाण हा मुलगा होता. मयत पुना रामा चव्हाण व मयत कोंडीबाई भ्र. पुना चव्हाण यांना आम्हा अर्जदार क्र. १ ते ५ हे कायदेशीर वारस होते व आहे. मयत पुना रामा चव्हाण हे दिनांक २५/०८/२०१६ रोजी मौजे वडनेर तांडा ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले असून व मयताची पत्नी कोंडीबाई भ्र. पुना चव्हाण ह्या सुद्धा दि.१३/०८/२००८ रोजी मौजे वडनेर तांडा, ता. कन्नड येथे मयत झालेली आहेत. मयत पुना रामा चव्हाण व मयत कोंडीबाई भ्र. पुना चव्हाण यांना अर्जदार क्र. १ ते ५ अशी एकूण ५ आपल्या होती. त्यापैकी अर्जदार क्र. ५ रुमदेव हा मयत असून त्यांचे ईतर आपत्य हे हयात आहे. मयतांचा मुलगा रुमदेव पुना चव्हाण हा दि. २०/०४/२०२२ रोजी मौजे वडनेर तांडा ता. कन्नड येथे मयत झाला आहे. त्यास अर्जदार क्र. ५.१ ही पत्नी असून अर्जदार क्र. ५.२ व ५.३ मुले असून अर्जदार क्र. ५.४ ते ५.५ अशी विवाहित मुली आहेत. या व्यतिरिक्त मयत रुमदेव पुना चव्हाण यांना इतर कोणीही वारस नाही. आम्हा अर्जदार क्रं. १ ते ५ यांना मयत पुना रामा चव्हाण व मयत कोंडीबाई भ्र. पुना चव्हाण यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. आम्ही अर्जदार क्रं. १ ते ५ हे व त्यांचे मयत वडील नामे पूना रामा चव्हाण व आई सुमनबाई भ्र. रामदास बोर्डे हे मौजे वडनेर तांडा येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०९/०९/२०२४ रोजी मौजे वडनेर ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१०/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# देव-देश-धर्मासाठी...

१५ व्या महाराष्ट्र विधानसभेचे २८८ सदस्य निवडण्यासाठी राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणूक होत आहे. २३ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन निकाल घोषित केले जातील आणि राज्याचा २१ वा मुख्यमंत्री कोण होईल, याचा अंदाज बांधता येईल. सध्या महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी या महायुतीविरुद्ध महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना उबाठा गट आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात मुख्य लढत असली, तरी इतरही छोटे-मोठे आणि अपक्ष उमेदवार मोठ्या संख्येत मैदानात उतरले आहेत. राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मायावतींची बहुजन समाज पार्टी, प्रकाश आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडी, एआय-एमआयएम, समाजवादी पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, बच्चू कडूंची तिसरी आघाडी यांनीही कंबर कसली असून काही मतदारसंघांत त्यांनी सत्ताधारी आणि विरोधकांपुढे आव्हान उभे केले आहे. भाजपाच्या नेतृत्वातील महायुतीने सर्वात आधी उमेदवारांची घोषणा करून विरोधकांवर आघाडी घेतली. भाजपाने तर युती धर्माचे पालन न करणाऱ्या आपल्या तब्बल ४० बंडखोरांना निलंबित करून, कुठल्याही परिस्थितीत पक्षविरोधी कृत्य खपवून घेतले जाणार नाही, असा कठोर संदेशच दिला. निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी आघाडी आणि महायुतीतर्फे प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात असतानाच काल कोल्हापूर येथील जाहीर सभेत महायुतीच्या शिलेदारांनी वचननाम्यातील १० महत्त्वाच्या घोषणांची माहिती देऊन मविआवर आणखी एक आघाडी घेतली. मविआचा जाहीरनामा कधी येणार आणि त्यात काय असणार, याचा पेटारा उघडण्यापूर्वीच मतदारांपुढे महायुती सत्तेवर आल्यास कोणती कामे प्राधान्याने करणार, याबाबतचा निर्धार आल्याने, महायुती सरकारच्या काळातील घोषणांचे पुढे काय होणार, याबाबतचा संभ्रम दूर झाला. विशेषतः महायुती सत्तेत आल्यास लोकप्रियतेच्या शिखरावर असलेली आणि विजयात महत्त्वाची भूमिका बजावण्याची शक्यता असलेली लाडकी बहीण योजना यापुढेही सुरू राहणार असल्याचे तसेच या योजनेतील लाभाच्या रकमेत वाढ करून लाडक्या बहिणींना महिन्याला २१०० रुपये देण्याची घोषणा करून, मुख्यमंत्र्यांनी महिलांना दिवाळीत आणखी एक आनंदाची बातमी दिली. कोल्हापूरच्या प्रचार सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून महायुतीच्या वतीने १० वचने जाहीर करण्यात आली. महायुतीतील भारतीय जनता पक्षाचा वचननामा आणि शिंदे सेनेसह धाकट्या पवारांच्या राष्ट्रवादीचा जाहीरनामा लवकरच प्रसिद्ध होईल. तत्पूर्वीच शिंदेंनी १० वचने दिल्याने मतदारांमधील सरकारबद्दलच्या सहानुभूतीत भर पडली आहे. घोषणेनुसार महिला सुरक्षेसाठी २५ हजार आणि शेतकरी सन्मान निधीतून वर्षाकाठी १५ हजार आणि किमान हमीभावावर २० टक्के अनुदान देण्याची हमीसुद्धा देण्यात आली आहे. प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी कोल्हापुरात महालक्ष्मीच्या साक्षीने केल्याने, त्या वचनापासून सरकार फारकत घेणार नाही, अशी खात्री बाळगायला हरकत नसावी. वृद्ध पेन्शनधारकांना दरमहा २१०० रुपये देण्याचे तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवण्याचे आश्वासनही एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. या साऱ्या घोषणा महायुतीच्या विजयासाठी साह्यभूत ठराव्या. त्यानुसार राज्यात २५ लाख रोजगार निर्मिती आणि १० लाख विद्यार्थ्यांना १० हजारांचे विद्यावेतन दिले जाईल. हा एक प्रकारचा नवयुवकांसाठी दिलासा देणारा निर्णय ठरावा. ४५ हजार गावांत पांदण बांधण्याचे वचनही देण्यात आले आहे. त्यातून बळीराजाच्या दळणवळणाच्या समस्येवर तोडगा निघू शकेल. अंगणवाडी सेविकांना १५ हजार रुपये आणि सुरक्षा कवच दिले जाईल. वीज बिलात ३० टक्के कपात करून सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देण्याचे वचनही मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. सरकार सत्तेत आल्यानंतर १०० दिवसांत २०२९ पर्यंतचे महाराष्ट्राचे व्हिजन सादर करण्याची घोषणाही यावेळी करण्यात आली. एकंदरीत शिंदे सरकारचा गेल्या अडीच वर्षांचा ट्रॅक रेकॉर्ड बघितला तर ते उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या सहकार्याने हा वचननामा सहज पूर्ण करतील, याबाबत राज्यातील जनतेने निर्धास्त राहायला हवे. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात कितीशी विकास कामे झाली, हे राज्यातील जनतेने बघितले आहे. महाविकास आघाडीचा संपूर्ण कार्यकाळ केंद्र सरकारच्या नावे शंख फुंकण्यात गेला. राज्याचे मुख्यमंत्री असलेले उद्धव ठाकरे यांनी तर कोरोना काळात केवळ दोन दिवस मंत्रालयात जाण्याचा विक्रम केला. या सरकारचा हिंदुद्वेष इतका टोकाला गेला की, उद्धव ठाकरे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचेच चिरंजीव आहेत, याबाबत शंका येऊ लागली. राज्यातील जनतेने २०१९ मध्ये भाजपा-शिवसेना युतीला दिलेल्या सुस्पष्ट जनादेशाचा अवमान करून केवळ सत्तेसाठी उद्धव ठाकरे यांनी शरद पवार आणि काँग्रेसशी हातमिळवणी करून राज्याचे मुख्यमंत्रिपद काबीज केले. अडीच वर्षांच्या काळात ठोस कामे न करता त्यांनी अडवणुकीचीच भूमिका घेतली. त्यातून स्थगिती सरकार असा मविआचा सर्वत्र लौकिक झाला. याचा काळात राज्य गुंतवणुकीत पिछाडीवर गेले. आज राज्यातील उद्योग गुजरातमध्ये गेल्याचा आरोप करणाऱ्यांनी खरेच आपल्या जमा खात्यात किती शिल्लक होती, याचा अंदाज घ्यायला हवा. सरकारविरोधात बोलणाऱ्या कंगना राणावत हिच्या घरावर चालवलेला बुलडोझर, पालघर साधू हत्याकांड, पत्रकार अर्णब गोस्वामी यांच्यावर सूडबुद्धीने केलेली कारवाई, अनंत करमुसेला जितेंद्र आव्हाड यांच्या बंगल्यावर झालेली मारहाण, माजी नौदल अधिकाऱ्याला करण्यात आलेली अमानुष धक्काबुक्की, केतकी चितळेविरोधात राज्यभरात गुन्हे दाखल करण्याचे प्रकरण हे सारे मुद्दे राज्यातील जनतेच्या विस्मरणात गेलेले नाहीत. अँटेलिया प्रकरण, पोलिस अधिकाऱ्यामार्फत केली जाणारी १०० कोटींची वसुली याकडे कानाडोळा कसा केला जाऊ शकतो? राहुल गांधींची काँग्रेस तर अजूनही संविधान बचावचीच पिपाणी वाजवण्यात गुंग आहे. ज्या पक्षाने ८० हून अधिक वेळा संविधानात दुरुस्त्या केल्या, त्यांच्या कथनावर आंबेडकरवादी जनता विश्वास तरी कशी ठेवते, हा देखील एक प्रश्नच आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार आणि उबाठाने अद्याप राज्यातील जनतेपुढे जाहीरनामा ठेवलेला नाही. मात्र, काँग्रेस नेते नाना पटोले यांनी मुस्लिम मौलवी आणि उलेमांना दिलेली आश्वासने बरीच गाजत आहेत आणि त्यामुळे सत्तेवर येण्याचे स्वप्न पाहणारे मविआचे सरकार धर्मनिरपेक्ष राहील का, असा प्रश्न फुले, आंबेडकर, शाहू, छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास स्वामी, तुकडोजी महाराज आणि गाडगेबाबांच्या महाराष्ट्राला पडला आहे. एकीकडे महायुती सरकार महाराष्ट्र विकासासाठी जीवाचे रान करीत असताना मविआ मुल्ला-मौलवींच्या खुशीकरणाचे राजकारण करण्यातच व्यस्त आहे. याच खुशामतखोरीमुळे राज्यातील मुस्लिमांनी त्यांना लोकसभा निवडणुकीत एकगठ्ठा मतदान करून अतिशय अभ्यासू, सुशिक्षित, देशाबद्दल तळमळ असणाऱ्या महायुतीच्या उमेदवारांना घरी बसविले. द्वेषाचे राजकारण कसे करायचे, छत्रपतींच्या महाराष्ट्रातील स्वधर्म, स्वराज्य आणि सौहार्दाला नख कसे लावायचे, हिंदूंमधील जाती-जातीत फूट कशी पाडायची याचीच कटकारस्थाने मविआकडून केली जात आहेत. त्यांच्या या भारतद्वेषी राजकारणाला विकासवादी महाराष्ट्राने साफ फेटाळून लावले पाहिजे. मतदारांनी 'बटेंगे तो कटेंगे' या मंत्राचा जप करून मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. एससी, एसटी, ओबीसी, मराठा, जनजाती अशा अठरापगड जातींना विभाजित करून, त्यांना एकमेकांविरुद्ध लढवण्याचे त्यांचे षडयंत्र जागीच ठेचून काढले पाहिजे. आपल्याला सुरक्षित, समृद्ध, सुसंस्कृत महाराष्ट्र घडविणाऱ्या, महिलांबाबत कळकळ असलेल्या, देव-देश-धर्मासाठी तळहातावर प्राण घेऊन लढ्यास सिद्ध होणाऱ्या २८८ शिलेदारांची निवड करायची आहे. एका चुकीच्या बाणाने पानिपतचा लढा आपल्याला गमवावा लागला आणि त्यापुढील अनेक वर्षे आपण आपले स्वातंत्र्य गमावून बसलो. त्याच इतिहासाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी नोटाचा उपयोग न करता योग्य, प्रामाणिक, धडाडी असलेल्या महायुतीच्या उमेदवारांची निवड केली जायला हवी. हरयाणाच्या निवडणुकीनंतर महायुतीचा उत्साह वाढला आहे, तो अखेरपर्यंत कायम ठेवून 'कहो दिलसे, महायुती फिरसे' असे म्हणत ईव्हीएमला सामोरे जायला हवे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# सांस्कृतिक युद्ध

*प्रसंग पहिला...*

''अक्षय, सकाळी पुरणपोळी झाली; आता रात्री काय जेवणार...'' अनिताने मुलाला विचारले.

''आई पिझ्झा ऑर्डर करतो मी... तू बाबाला जरा कनव्हिन्स कर ना..''

''आणि ताईला काय गिफ्ट देणार आहेस तू?'' अनिताची चौकशी.

''अगं आई, कॅडबरीचे फेस्टिव्हल हॅम्पर मागवतो. तू काळजी करू नकोस...''

*प्रसंग दुसरा...*

''अगं निधी, अक्षयला ओवाळतेस ना. सगळे जमलेत आता...'' आबा म्हणाले.

''अहो बाबा, ऑर्डर केलेला केक आधी येऊ दे. ओवाळण्याचं काय एवढं...''

*प्रसंग तिसरा...*

''मग काय काय बघणार तुम्ही गोव्यात?'' मनीषाने निधीला विचारले.

''काय बघणार म्हणजे काय... गोव्यातले बिचेस आणि सेंट फ्रान्सिस चर्च. बास.. आणखीन काय?'' निधीचे उत्तर.

''हात कातरो स्तंभाला नाही का जाणार...?''

''ते काय आहे...?''

*प्रसंग चौथा...*

''तुमचे शिवराम राजगुरू आणि अनंत कान्हेरे यांच्याबद्दल काय मत आहे?'' तुषारने सहजपणे त्या 'साठी' ओलांडलेल्या दाम्पत्याला विचारलं.

''आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाचे नाही. कोण आहेत हे? आम्ही या अशा कोणत्याही भानगडीत पडत नाही...'' त्यांचं उत्तर.

*प्रसंग पाचवा...*

कुठल्याशा क्रिकेट स्पर्धांच्या उद्घाटनाचा कार्यक्रमात सूत्रसंचालन करणारा तरुण 'यू आर इन अ मक्का ऑफ अ क्रिकेट' असा कुठल्या तरी मैदानाचा उल्लेख करताना ऐकला. मी सहजपणे त्याला म्हणालो,

''यू आर इन अ काशी ऑफ अ क्रिकेट'' असं म्हणता आलं असतं.

''दॅट मेक्स नो डिफरन्स सर, मक्का काय आणि काशी काय...'' हे त्याचं उत्तर आलं.

आयआयटी कानपूर आपल्या वार्षिक दिवाळी उत्सवाचे निमंत्रण पत्रिकेत दीपावलीचे नामकरण 'नम्ज ए रोशनी' असे करते तर दिल्लीतील लेडी श्रीराम कॉलेज 'जश्न ए बहार' असे उर्दू भाषांतर करूनच दीपावली उत्सवाचे निमंत्रण देताना दिसते. हे सगळेच आमच्या हिंदू संस्कृतीवरील आक्रमणच होय. दुर्दैवाने हिंदू समाजाला अजूनही या वरवर सहज वाटणाऱ्या, परंतु खोडसाळपणे केल्या जाणाऱ्या गोष्टींमागील कारस्थान लक्षात येत नाही. सामान्य हिंदू या प्रत्येक गोष्टींचा सखोलपणे विचार करीत नाही.

वरील प्रत्येक प्रसंगात हिंदू संस्कृतीवर केले जाणारे आक्रमण स्पष्टपणे जाणवते. अनेकदा हे अतिशय मवाळपणाचा आव आणतं, अनवधानाने घडते आहे, असं दाखवण्याचा प्रयत्न असतो. पण त्याच वेळी सजगपणे हे आक्रमण परतवून लावण्याचा सुस्पष्ट प्रयत्न आणि त्यासाठी लागणारी कणखरता मात्र हिंदू समाजाकडून दाखवली जाताना दिसत नाही. मक्केऐवजी काशी, केकऐवजी ओवाळणे, सेंट फ्रान्सिसऐवजी हात कतरो स्तंभ, जश्न-ए-बहार ऐवजी दीपोत्सव वापरण्याचा आग्रही पवित्रा आज गरजेचा ठरतो आहे आणि हे सगळं हिंदू संस्कृतीविरोधी आहे, याचे भान आमचा समाज विसरला आहे. उच्चशिक्षित लोकांना मक्का आणि काशीमधला फरक कळत नाही आणि समजूनही घ्यायचा नाही, ही दुर्दैवाची स्थिती आहे. कारण सध्याची भारतीय शिक्षण पद्धती ही इंग्रजी राजवटीत मेकॉलेप्रणीत शिक्षण पद्धती आहे. या पद्धतीचे पश्चिमी देशांना आणि युरोपियन संस्कृतीला काय फायदे आहेत, हे मेकॉलेने तेव्हाच स्पष्ट केले होते. अजूनही सजगपणे आपण या विद्ध उपाययोजना करण्यात प्रचंड कुचराई करतो आहोत. आजही मिशनरी किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्येच आपल्या मुलांना प्रवेश मिळावा म्हणून पालक धडपडताना दिसतात. घरोघरी मुलांवर संस्कार करण्याची क्षमता गमावून बसलेले आईवडील आणि (कुटुंबात असलेच तर) हतबल झालेले आजी-आजोबा दिसतात. आज पश्चिमी सांस्कृतिक आक्रमण हे भारतीय समाजजीवनाच्या सर्वच अंगांना उद्ध्वस्त करताना दिसते आहे. या विरोधात बोलणे किंवा लिहिणे हे प्रतिगामी समजण्यात येते. त्यातच या आक्रमणाला आता आधुनिक जाहिरात तंत्राचीदेखील साथ लाभते आहे. ही निर्लज्ज व्यापारी आक्रमकता आमच्या हिंदू जीवनदृष्टीचा, हिंदू रीतीरीवाजाचा, हिंदू खाद्य संस्कृतीचा, हिंदू मूल्यव्यवस्थेचा पिढी-दर-पिढी सातत्याने विध्वंस करताना दिसते आहे. हे सांस्कृतिक आक्रमण कधीकाळी छुपेपणाने होत होते, आज ते प्रच्छन्नपणे घडवून आणले जाताना दिसते आहे.

तिखट, गोड अशा हजारो खाद्यपदार्थांची रेलचेल असलेल्या भारतात 'कुछ मीठा हो जाए' म्हणत कॅडबरीचे चॉकलेट भारतीयांच्या माथी मारले जाते. परवाच स्वामी नारायण मंदिरात मेणबत्त्या निरांजनात ठेवलेले आरतीचे ताट फिरताना पाहिले आणि हसावं की रडावे अशी अवस्था झाली. सुगंधी धूप ही भारतीय पद्धती मागे पडून आता अनेक घरांमध्ये सुगंधी मेणबत्त्या जाळल्या जाताना दिसतात. या घरातील पुढील पिढ्यांना, धूप ही अधिक आरोग्यदायी आणि अस्सल भारतीय पद्धत आहे, हेच कधी कळणार नाही. विविध जाहिरातींच्या माध्यमातून फक्त हिंदू संस्कृतीवर आक्रमण केले जाते आहे. हिंदू समाजाने याचा सजगपणे विचार करणे ही काळाची गरज आहे.

संस्कृती टिकवण्यासाठी ती मनातून जोपासायला हवी आणि मनातून जोपासली जाण्यासाठी त्या संस्कृतीचा अभिमान वाटला पाहिजे. अभिमान वाटण्यासाठी प्रत्येक आधीच्या पिढीने पुढच्या पिढीवर तसे संस्कार केले पाहिजेत. प्रथा-परंपरांमागील वैज्ञानिकता, तर्कशुद्ध विचार पिढी-दर-पिढी संक्रमित व्हायला हवे. यासाठी आपल्या संस्कृतीचा, प्रथा-परंपराचा, उपासना पद्धतीचा समयोचित अभ्यास करणारा एक वर्ग त्या समाजाने जोपासला पाहिजे. टीका, वादविवाद या चालूच ठेवताना विद्वान आणि अभ्यासू लोकांचा मान राखण्याची वृत्ती समाज नेतृत्वाने जोपासली पाहिजे. एखाद्या विशिष्ट विचारधारेलाच उचलून धरण्याची वृत्ती राजकीय नेतृत्वाने सोडून दिली पाहिजे. या देशात नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतरच निखळ अभ्यासू वृत्तीचा आणि कार्याचा सन्मान होत असल्याचे दिसून येते. त्याआधी फक्त आणि फक्त डावे विचार, हिंदू विरोधी विचारसरणी आणि काँग्रेस पक्षाशी असलेली निष्ठा हे निकष लावूनच कोणतेही सन्मान, पुरस्कार दिले जात होते, असेच म्हणावे लागते. या मागे एक सुनियोजित कारस्थान होते. जी माणसे हिंदू संस्कृती, हिंदू धर्म, हिंदू श्रद्धा, हिंदू परंपरा उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करतील, त्यांचा सन्मान करून त्यांना विविध क्षेत्रांत उच्च पदांवर बसवण्यात येत असे. या संपूर्ण कारस्थानाचा उद्देश हिंदू संस्कृती उद्ध्वस्त करण्याचाच होता.

संस्कृतींमधील देवाणघेवाण ही एक नैसर्गिक क्रिया असते. इतर संस्कृतींमधील चांगल्या गोष्टी आत्मसात करून, आपल्या सामाजिक आवश्यकतेनुसार त्यात परिवर्तन घडवून आपल्या संस्कृतीत त्याला योग्य स्थान देणे ही नैसर्गिक आणि वेळ घेणारी बाब असते. पण आपल्या संस्कृतीतील अनेक गोष्टी विविध प्रकारे दुसऱ्या संस्कृतीत घुसडणे किंवा लादणे हा सांस्कृतिक साम्राज्यवाद होय. आज पाश्चात्त्य आणि मध्यपूर्वेतील संस्कृती आमच्यावर लादली जाताना दिसते. त्यामुळे या सांस्कृतिक युद्धात हिंदू समाजाने, हिंदू नेतृत्वाने अधिक कणखर भूमिका घेणे आवश्यक आहे.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# वचननामा

वचने ही पाळण्यासाठी दिली जातात. एखाद्याने वचन दिले की, ते पूर्ण करण्यासाठी मग जीवाची बाजी लावली जाते, हे इतिहासाने अनेकदा सिद्ध केले आहे. म्हणूनच वचनाला तितकेच महत्त्व आहे. मात्र काय गंमत आहे ना! सत्तेत येण्यासाठी राजकीय पक्ष सर्रासपणे वचननाम्यातून खोटे बोलू लागले आहेत. सत्तेत येण्यासाठी कोण काय करतील, किती खोटे बोलतील याचा आपण अंदाजही बांधू शकत नाही. पूर्वी राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्याकडे विश्वासाने बघितले जात होते. तो केवळ जाहीरनामा नसून जनतेला दिलेला वचननामा आहे, हे तितक्याच विश्वासाने सांगितले जात होते. सत्तेत आल्यानंतर त्या त्या राजकीय पक्षांकडून लोकांना दिलेली वचने पाळली जात होती. एखादी गोष्ट निवडणुकीदरम्यान आपल्या पक्षाने वचननाम्यात लिहिली असेल तर ती सत्तेत आल्यानंतर आपल्याला पूर्ण करायची आहे, याची भीती राजकीय पक्षांना होती. मात्र, आता राजकीय पक्षांचे चित्र फार विचित्र झाले आहे. त्यांची परिस्थिती पार बदलून गेली आहे. सत्तेत आल्यानंतर आपण जनतेला काय वचने दिली होती, ती कधी पूर्ण करणार आहोत, ती पूर्ण करण्यासारखी आहेत का, याचे भान सत्तेत आल्यानंतर राजकीय पक्षांना नसते. कुठल्या पक्षाच्या वचननाम्यावर विश्वास ठेवायचा? कारण वचननाम्यातील वचने हल्ली पाळलीच जात नाही. निवडणुकांपूर्वी 'घोषणांचा पाऊस' पाडणाऱ्यांना सत्तेत आल्यानंतर विसर पडतो आणि मग सर्वत्र दिसतो तो दुष्काळ. नंतर राजकीय पक्षांना केवळ धुंदी चढते ती सत्तेची! सत्तेच येण्यासाठी जवळपास सर्वच राजकीय पक्ष जी वचने पाळता येत नाही, ज्या गोष्टी करणे शक्य नाही, ज्या गोष्टींमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण पडणार आहे अशा गोष्टी वचनानाम्यात सर्रासपणे नमूद करीत असतात. काही राजकीय पक्ष जनतेशी बांधिलकी जोपासत आपल्या वचननाम्यातील काही गोष्टी तरी पाळण्याचा प्रयत्न करतात. त्यातल्या त्यात भारतीय जनता पक्षाने वचननाम्यातील काही गोष्टी पाळण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, साधारणतः वचननाम्यातील वचने पाळली जात नाहीत, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. विधानसभेच्या निवडणूक निमित्ताने सध्या राजकीय पक्ष आपापल्या पक्षाचा जाहीरनामा जनतेपुढे मांडू लागले आहेत. जाहीरनामा कसला घोषणांचा पुरता पाऊस आहे. सत्तेत आल्यास मुलांना मोफत शिक्षण देऊ, असे सांगून उद्धव ठाकरेंनी आपल्या पक्षाच्या वचननाम्यात पाच महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. यामध्ये महागाईमुळे जनता त्रस्त असून डाळी, खाद्यतेल यासह पाच जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवणार, महिला पोलिसांची भरती, स्वतंत्र पोलिस ठाणे उभारणार, शेतमालाला हमी भाव देऊ, प्रत्येक जिल्ह्यात तसेच सुरतमध्येही छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभारू यासह अनेक घोषणांचा पाऊस त्यांनी आपल्या वचननाम्यातून पाडला आहे. अडीच वर्षांपूर्वी उबाठाचे नेते उद्धव ठाकरेच मुख्यमंत्री होते. त्यावेळी तर ते घरात बसून होते. त्यांना मंत्रिमंडळात काय चालले आहे, हे देखील माहिती होत नव्हते. आता परत सत्तेत आल्यास अमुक करू, तमुक करू म्हणून सत्तेसाठी त्यांची केविलवाणी धडपड सुरू आहे. महाविकास आघाडीने अडीच वर्षांत महाराष्ट्राच्या विकासाचा खोडा घातला. मोठमोठे आश्वासने देऊन सत्तेत आलेल्या महाविकास आघाडीचा रचलेला पाया अडीच वर्षांतच कोसळला. त्यानंतर सत्तेत आलेल्या महायुतीनेही लोकांना निराश केले. यावेळी महायुतीनेही घोषणांचा पाऊस पाडला आहे. लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला १५०० वरून २१०० रुपये देणार, महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांना पोलिस दलास समावेश करणार, शेतकऱ्यांना कर्ज माफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १२ हजारांवरून १५ हजार रुपये देणार, प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देणार, अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५ हजार रुपये देणार, सरकार स्थापनेनंतर व्हिजन महाराष्ट्र-२०२९ चा आराखडा १०० दिवसांच्या आत जाहीर करणार यासह कितीतरी आश्वासने महायुतीने जनतेला दिली आहेत. महाविकास आघाडीला खाली खेचून महायुती सत्तेत आल्यानंतर या वचननाम्यातील काही गोष्टी महायुतीने केल्या आहेतही; मात्र इतर वचनांचे काय? सत्तेत आल्यानंतर १०० दिवसांच्या आत महाराष्ट्राचे व्हिजन सांगणारा आराखडा तयार करणाऱ्या सरकारला हे आधीदेखील करता येऊ शकले असते. मात्र, सत्तेत आल्यानंतर या वचनांकडे पाठ फिरविली जाते. वचनांचा हा कागद राजकीय पक्ष पायदळी तुडवून केवळ स्वार्थाच्या दिशेने आपली वाटचाल सुरू ठेवतात. जनतेला दिलेली वचने, घोषणांचा पाऊस सत्तेत आल्यानंतर त्यांना दिसत नाही. त्यांच्या डोळ्यावर पट्टी असते ती मग्रुरीची, बेपर्वा, बेलगाम वृत्तीची. त्यामुळे वचननाम्यातील वचने तशीच राहतात कोरडी, शुष्क आणि पाषाण बनून. वचननाम्यातील वचने यावेळी तरी सत्तेत आल्यानंतर सत्ताधाऱ्यांना पाळण्याची ईश्वर सुबुद्धी देवो, इतकेच आपण म्हणू शकतो.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# जनगणना आणि लोकसभा मतदारसंघांची फेररचना

२०२९ मध्ये होणारी लोकसभा निवडणूक ही अनेक अर्थांनी आगळीवेगळी आणि देशाच्या राजकारणाचा चेहरामोहरा बदलणारी ठरणार आहे. २०२४ मध्ये झालेली लोकसभा निवडणूक ५४३ जागांसाठी झाली होती. पण २०२९ मध्ये होणारी लोकसभा निवडणूक ५४३ जागांसाठी होणार नाही, तर त्यापेक्षा जास्त जागांसाठी होणार आहे. या जास्त जागा किती राहतील, हे आताच सांगता येणार नसले, तरी वाढलेल्या जागा या किमान १० ते २० टक्क्यांपर्यंत असू शकतात. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीचे ठरणारे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ती 'एक देश एक निवडणूक' या धोरणानुसार होण्याची शक्यता आहे. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या निवडणुकीत महिलांसाठी लोकसभेतील एकूण सदस्यसंख्येच्या एकतृतीयांश जागा राखीव राहू शकतात. त्यामुळे या निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागणे स्वाभाविक म्हणावे लागेल.

लोकसभा वा विधानसभेच्या मतदारसंघाची फेररचना ही सामान्यपणे जनगणनेवर अवलंबून असते. २०११ नंतर देशात आतापर्यंत जनगणना झालेली नाही. जनगणना दर १० वर्षांनी करायची असते. २०२१ मध्ये कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे जनगणना होऊ शकली नाही. सरकारने पुढील वर्षी म्हणजे २०२५ मध्ये जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. या जनगणनेच्या आधारावर लोकसभा मतदारसंघाची फेररचना होऊ शकते. याआधी अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना २००२ मध्ये मतदारसंघांची फेररचना झाली होती. त्यावेळी २०२६ पर्यंत मतदारसंघांची फेररचना करता येणार नसल्याचा कायदाही करण्यात आला होता. २०२५ ला जनगणना सुरू झाली तर ती वर्षभर चालू शकते. २०२६ पर्यंत जनगणनेची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मतदारसंघांच्या फेररचनेचा मार्ग प्रशस्त होऊ शकतो. त्यामुळे केंद्र सरकारने पुढील वर्षी जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. विरोधी पक्षांसोबत रालोआतील काही पक्षांनीही जातीय जनगणनेचीही मागणी केली आहे. जनगणनेसोबत जातीय जनगणना होईल की नाही, ते आताच सांगता येणार नाही. मात्र, जनगणना होईल, हे निश्चित आहे. जनगणना आयुक्त आणि रजिस्ट्रार जनरल यांचा कार्यकाळही सरकारने ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढवला आहे, याचे हेच कारण आहे. याआधी देशात चार वेळा लोकसभा मतदारसंघांची फेररचना झाली होती. १९५२, १९६३, १९७३ आणि २००२ अशा ४ वेळा मतदारसंघांची फेररचना करण्यात आली होती. लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेच्या जागा वाढत असतात. उत्तर भारतात लोकसंख्या वाढीचा वेग दक्षिण भारताच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे जनगणनेत उत्तर भारताची



लोकसंख्या दक्षिण भारताच्या तुलनेत जास्त राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे उत्तर भारतातील लोकसभेच्या जेवढ्या जागा वाढतील, त्या तुलनेत दक्षिण भारतातील लोकसभेच्या जागा वाढण्याची शक्यता नाही.त्यामुळेच आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू तसेच तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी चिंता व्यक्त केली; एवढेच नाही तर दक्षिण भारतातील लोकांनी अधिक अपत्ये जन्माला घालण्याची सूचनाही केली आहे. त्यामुळे जागावाढीचे एखादे सूत्र तयार करावे लागणार आहे. उत्तर भारतातील लोकसभेच्या जागा जेवढ्या वाढतील, त्या प्रमाणात दक्षिण भारतातीलही लोकसभेच्या जागा वाढवाव्या लागणार आहेत.

सुरुवातीला १० लाख लोकसंख्येमागे एक खासदार असे प्रमाण ठरवण्यात आले होते. मात्र, नंतर हे प्रमाण कायम राहिले नाही. देशातील काही लोकसभा मतदारसंघ हे दोन तीन लाखांचे तर काही मतदारसंघ हे २० लाखांचे झाले आहे. यात कुठेतरी समानता आणण्याची गरज आहे. त्यामुळे उत्तर भारतातील मतदारसंघ २० लाखांचा असेल तर दक्षिण भारतातील मतदारसंघ १० लाखांपर्यंतचाच करावा लागेल. त्याशिवाय हे असंतुलन दूर होणार नाही. लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची फेररचना केली तर दक्षिण भारतातील पाच राज्यांत लोकसभेच्या जागा जेवढ्या वाढतील, त्याच्या दुप्पट जागा उत्तर भारतातील आठ राज्यांतून वाढू शकतात. दक्षिण भारतातील राज्यांत जागांची संख्या दीडपटीने वाढू शकते, तर उत्तर भारतातील राज्यात दुपटीने. १९७१ मध्ये जनगणना झाली, तेव्हा देशाची लोकसंख्या ५४ कोटी होती. आज ५३ वर्षांनंतर भारताची लोकसंख्या जवळपास तीनपट झालेली आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारताने नुकतेच चीनलाही मागे टाकले आहे. त्यावेळी १० लाख लोकसंख्यमागे एक खासदार याप्रमाणात ५४३ खासदार निर्धारित करण्यात आले होते. २०११ मध्ये जनगणना झाली तेव्हा देशाची लोकसंख्या १२१ कोटी झाली होती. त्या जनगणनेला आधार मानून लोकसभा मतदारसंघांची फेररचना केली तर १२०० मतदारसंघ देशात तयार होतील. आपल्या नवीन संसद भवनाची क्षमताही लोकसभेच्या १२०० खासदारांना सामावून घेण्याची नाही. त्यामुळे हे व्यवहार्य नाही. देशात पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळेला लोकसभा मतदारसंघाची संख्या ४८९ होती. १९७१ च्या जनगणनेच्या आधारे १९७६ मध्ये मतदारसंघांची फेररचना झाली तेव्हा ही संख्या ५२२ झाली. नंतर ती ५४३ वर पोहोचली. २००१ च्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची फेररचना झाली तेव्हा या संख्येत कोणताही बदल करण्यात आला नाही. विशेष म्हणजे २०२६ पर्यंत मतदारसंघांची फेररचना न करण्याचा म्हणजे लोकसभा मतदारसंघांची संख्या २०२६ पर्यंत आहे, तेवढीच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे यावेळी होणाऱ्या मतदारसंघांतील फेररचनेत लोकसभा मतदारसंघांची संख्या वाढणार, ही दगडावरची रेघ आहे. मतदारसंघांच्या फेररचनेसाठी जो परिसीमन आयोग स्थापन केला जातो, त्याच्या अहवालाला कोणत्याच न्यायालयात आव्हान देता येत नाही. फक्त लोकसभा आणि राज्य विधानसभेत या आयोगाचा अहवाल मांडावा लागतो. नवीन संसद भवनात लोकसभेतील आसन क्षमता ८८८ आहे. म्हणजे जुन्या संसद भवनातील लोकसभेच्या सदस्य संख्येच्या जवळपास दीडपट जास्त ही संख्या आहे. नवीन संसद भवनाचे आयुष्य किमान १०० वर्षांचे पकडले तरी जवळपास ३५० सदस्यांची भर त्यात पडू शकते. त्यामुळे पुढील वर्षी होणारी जनगणना आणि त्या आधारावर होणाऱ्या लोकसभा मतदारसंघांच्या फेररचनेकडे सगळ्यांचे लक्ष राहणार आहे. २०२९ ची लोकसभा निवडणूक देशाच्या राजकारणाचा अनेक अर्थाने चेहरामोहरा बदलवणारी ठरणार आहे, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### बंडखोरांनी ग्रासली विधानसभा निवडणूक!

कधी नव्हे एवढे बंडखोर येत्या विधानसभा निवडणुकीमध्ये उभे ठाकले आहेत. महाराष्ट्राच्या निवडणुकांमध्ये बंडखोरी हा काही नवा भाग नाही. तेव्हाची आणि आताची बंडखोरी यात मूलभूत तत्त्वहीनता दिसून येते. पक्षाचे संघटन वाढविण्याची धुरा ज्यांच्या खांद्यावर होती त्यांच्यासकट साऱ्यांनाच आमदारकीचे डोहाळे लागले. आज कोण कोणत्या पक्षात आहे, हे स्पष्ट झाले आहे. त्याला कारणेही तशीच आहेत. ज्यांनी पक्ष स्थापन केला यांच्याशी प्रतारणा करून वेगळी चूल मांडणे, स्वहितार्थ पक्ष बदलविणे, एका पक्षात निवडून आल्यानंतर सत्तेच्या लालसेपायी रातोरात पक्षांतर करणे आदी अनिष्ठ बाबी राजकीय पक्षांच्या प्रमुखांकडून, पक्षश्रेष्ठींकडून आणि धुरिणांकडून घडल्यामुळे कार्यकर्त्यांवरचा धाक कमी झाला. निवडणुकीत एखाददुसरा बंडखोर निवडून येईलही, नुकसान मात्र पक्षाच्या उमेदवाराचे होईल. मग पुन्हा तेच. याच निवडून आलेल्या बंडखोराचे स्वागत राजकीय पक्ष करतील आणि हे वर्तुळ पूर्ण होईल. त्यामुळे आता पक्षश्रेष्ठींनी राजकारणातील नीतिमत्ता, जनमत आदी मूल्ये कायम ठेवणे गरजेचे झाले आहे. तरच आगामी निवडणुकांमध्ये बंडखोरीचे ग्रहण कमी होईल, कार्यकर्त्यांवर वचक निर्माण होईल आणि राजकारण्यांवरचा विश्वास दृढ होईल.

**डॉ. प्रशांत खुळे**/९८२२४६५९७२

●● ●●

### उठा, हिंदूंनो उठा...!

येत्या रविवारी आपल्या जिल्ह्यातील लोकसभा खासदार, राज्यसभा खासदार ते त्यांच्या घरी भेटतील. हिंदू, जैन, बौद्ध, ख्रिश्चन आपण सर्वांनी खासदार साहेबांची भेट घ्यावी. हिंदूंनो, आपण कोणत्याही पक्षाचे असा किंवा खासदार कोणत्याही पक्षाचा असू द्या. आपल्या वडील किंवा आजोबांनी कष्टाने कमाविलेली इस्टेट जर आपल्याला सुरक्षित ठेवावयाची असेल तर हिंदू, बौद्ध, जैन, ख्रिश्चन खासदारांनी या विधेयकला समर्थन देणे अत्यंत जरूरीचे आहे. आपण आज जागृत झालो नाही तर पुढील काळात संभवणारा धोका फार भयानक राहील. जे काम तलवारीच्या भरवशावर औरंगजेबाला जमले नाही ते काम विना खडग विना ढाल या दोघांनी भारताचा इस्लामिक कंट्री करण्याचा अजेंडा राबविला व या धोरणाला बऱ्यापैकी यश मिळताना दिसत आहे. वक्फ बोर्ड विधेयक दुरुस्ती झाली नाही तर आपले घर, दुकान, इंडस्ट्री, हॉस्पिटल, शाळा, बँकांच्या इमारती, ग्रामपंचायत, नगरपरिषद इमारत, एवढेच नाही तर नॅशनल हायवे, समृद्धी हायवे, जिल्हाधिकारी कार्यालय, मंत्रालय या संपूर्ण इस्टेटीवर वक्फ बोर्ड दावा करू शकतो. अशा प्रकारची घटना १९५४ साली बदलल्या गेली. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहिली तेव्हा वक्फ बोर्डाची व्यवस्था आपल्या घटनेत नव्हती. १९५४ च्या घटना दुरुस्तीत वक्फ बोर्डाच्या विरुद्ध आपल्याला कोर्टात न्याय मागण्याचा अधिकार नाही. अभी नही तो कभी नही. निवडणुका येतील-जातील, पण आपण आज जागे झालो नाही तर उद्या आपल्याला आपला देश सोडून निर्वासित होऊन कुठेतरी विदेशात जावे लागेल किंवा इस्लाम कबूल करावा लागेल. हे षडयंत्र काँग्रेसचे आहे. चला उठा, या रविवारी खासदारांची भेट घेऊ या.

**डॉ. जयंत ओक**/९७६४६४८३८३

●● ●●

### वयोवृद्ध शरद पवारांनी विश्रांती घ्यावी

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीनंतर वयोमानानुसार वयोवृद्ध शरद पवारांनी राजकारणापासून मुक्त होऊन विश्रांती घ्यावी. आपण मुख्यमंत्रि, रक्षामंत्री, कृषिमंत्री अशी अनेक पदे आपल्या कर्तृत्वाने भूषविली आहेत व राजकारणामधून समाजसेवा केली आहे. निरनिराळी पक्षे फोडण्यास आपण आपले राजकारणपटुत्व सिद्ध केले आहे. वयोमानानुसार विश्रांती घेण्याची व आराम करण्याची वेळ आली आहे. पंतप्रधान पद भूषविण्याची आपली मनीषा अतृप्त राहिली आहे. जोपर्यंत मोदी आहे तोपर्यंत हे शक्य वाटत नाही. तरी आपण आपल्या बुद्धीचा व वयोमानाचा कौल घेऊन राजकारणापासून मुक्त व्हावे व तरुण पिढीला पुढे येण्याची



संधी द्यावी. ज्या पक्षाशी आपली जवळीक आहे त्या पक्षाच्या धुरंधर तरुणांच्या शेजारी बसून राजकारणाची रणनीती ठरविणे मतदारांना विचित्र अवघडल्यासारखे वाटते. आपण महाभारतातील भीष्माचार्यांचा रोल निभवावा व सल्ला देण्याचेच काम करावे. त्यांनी फक्त सल्ला घेण्यास आपल्याकडे यावे व देशाच्या भल्यासाठी, विकासासाठी योग्य सल्ला द्यावा. आपल्या नातेवाईकांपैकी तरुण वा तरुणीला पक्षाची धुरा सांभाळण्यास प्रोत्साहन द्यावे व पक्षाची प्रतिमा स्वच्छ व निर्मळ करावी; जेणेकरून आपल्यावर घराणेशाहीचा दोष लागणार नाही. तरुण पिढीचे राजकारणातील कर्तृत्व व कौतुक डोळे भरून पाहण्यात आनंद मानावा. आता आपल्या शरीराला जास्त परिश्रम व दगदग झेपणार नाही.

**म. ल. भावे**/७६२०६२९७२८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ ९ नोव्हेंबर रोजी शरद पवारांची तोफ परळीत धडाडणार - जीवनराव देशमुख

## परळीचा श्वास मोकळा करण्यासाठी राजेसाहेब देशमुख यांना निवडून द्या - बहादूरभाई

परळी प्रतिनिधी. परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, शिवसेना उबाटा प्रणित महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांची परळीत जाहीर सभा होत असून शरद पवारांची तोफ पुन्हा एकदा लोकसभेनंतर पहिल्यांदा परळीत धडाडणार आहे.परळी ते काय बोलतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांची ९ नोव्हेंबर रोजी परळी शहरातील मोंढा मैदान येथे दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी जाहीर सभा होणार आहे. या सभेविषयी महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष जीवनराव देशमुख तसेच कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

यावेळी बोलताना कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर बाई म्हणाले की परळीचा श्वास मोकळा करण्यासाठी परळीतील जनतेने राजसाहेब देशमुख यांना प्रचंड मताने निवडून द्यावे. तर जीवनराव देशमुख यांनी परळी येथील शरद पवार यांच्या सभेत पंचवीस हजार पेक्षा जास्त कार्यकर्ते उपस्थित राहतील. तसेच शरद पवार यांच्या महाराष्ट्रात सुमारे ५६ प्रचार सभा होणार असल्याचेही ते म्हणाले. काही दिवसापूर्वी महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक सिमेंट मुळे सहा हजार लोकांना रोजगार मिळणार आहे असे म्हटले होते. हे धादांत खोटे असून परळीतील अल्ट्राटेक सिमेंट चा विस्तार होत आहे त्यामुळे त्यांचे उत्पादन वाढणार आहे.नवीन रोजगाराच्या संधी त्यातून निर्माण होणार नाहीत.

घाटनांदुर येथे प्रचार सभेत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी बोलताना परळी विधानसभा मतदारसंघात कोणत्याही प्रकारचा रोजगार तरुणांना उपलब्ध नाही. साखर कारखाना सुतगिरणी आदी उद्योग बंद पडल्यामुळे हाताला काम नाही. त्यामुळे त्यांचे लग्न जमत नाहीत .आमचे सरकार आल्यास परळी विधानसभा मतदारसंघात रोजगाराच्या संधी निर्माण करून त्यामुळे मुलांचे लग्न जमण्यास मदत होईल असे म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्याचा विपर्यास करून भाजप प्रणित माध्यमाने चुकीचे बातम्या प्रसारित केल्या असे हे देशमुख म्हणाले.

या पत्रकार परिषदेला नरेश हालगे , रणजित देशमुख,गफारशा खान, दिपक सिरसाठ यांच्यासह महा विकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## श्रीराम सुपर १-एसआर-१४ आणि ३०३ गहू बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना उत्तम परिणाम मिळत आहेत

अहमदनगर : महाराष्ट्रात गहू पिकात श्रीराम फार्म सोल्यूशन्सद्वारे विकसित 'श्रीराम सुपर १-एसआर-१४' आणि 'श्रीराम सुपर ३०३' गहू बियाण्यांनी उल्लेखनीय बदल घडवून आणला आहे. या प्रगत प्रकारांनी शेतकऱ्यांमध्ये उच्च उत्पन्न, रोग प्रतिकारशक्ती आणि विविध हवामान परिस्थितींमध्ये अनुकूलता यांसाठी प्रसिद्धी मिळवली आहे.

श्रीराम फार्म सोल्यूशन्सचे जागतिक कीर्तीचे गहू वैज्ञानिकांनी तयार केलेले गहू प्रकार, श्रीराम सुपर १-एसआर-१४ आणि ३०३, यांची अनुकूलता क्षमता आणि उत्कृष्ट उत्पादकतेमुळे शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. याचे दाणे मोठे, कठीण आणि चमकदार आहेत, तसेच याच्या गव्हापासून बनलेली पोळी उच्च गुणवत्तेची असते. आणि सर्वात विशेष बाब म्हणजे बदलत्या नैसर्गिक परिस्थितीत येणाऱ्या नवीन आव्हानांमध्येही या प्रकारांचे परिणाम उत्कृष्ट आहेत. याच वैशिष्ट्यांमुळे हे दोन्ही प्रकार भारताच्या विविध भागांतील शेतकऱ्यांची पहिली पसंती बनले आहेत. पुण्याच्या एका अनुभवी महिला शेतकरी संतोष रुपनार यांनी गेल्या वर्षी आपल्या शेतात श्रीराम सुपर १-एसआर-१४ गहू बियाण्याची पेरणी केली होती. त्यांचे म्हणणे आहे की, इतर प्रकारांच्या तुलनेत श्रीराम सुपर १-एसआर-१४ मध्ये लांब बाली, अधिक काळे आणि प्रति बाली दाण्यांची संख्या जास्त होती, तसेच श्रीराम १-एसआर-१४ ला कमी पाण्याची आवश्यकता भासली.

## 'बजाज फिन्सर्व्ह कंझम्पशन फंड' लाँच केला

मुंबई : बजाज फिन्सर्व्ह एएमसी ने बजाज फिन्सर्व्ह कंझम्प्शन फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे, ही उपभोग थीम अनुसरून एक ओपन एंडेड इक्विटी योजना आहे. फंडाची सदस्यता ८ नोव्हेंबरला सुरू होईल आणि नवीन फंड ऑफर कालावधी २२ नोव्हेंबर २०२४ रोजी समाप्त होईल. बजाज फिन्सर्व्ह कन्झम्पशन फंड हा एक खऱ्या अर्थाने लेबलशी सुसंगत फंड आहे, जो उदयोन्मुख उपभोग मेगाट्रेंड्सशी संलग्न क्षेत्रांमध्ये रणनीतिक गुंतवणूक करेल. हे भारतातील उपभोगाच्या सवयींना आकार देणारे प्रभावी मेगाट्रेंड्स आहेत.

## सर्वात मोठ्या ईव्ही शो चे आयोजन

नाशिक : वाहन निर्मिती आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांचे भारताचे केंद्र असलेल्या पुण्यात 'इंडिया इंटरनॅशनल ईव्ही शो' (आयआयईव्ही) या देशातील सर्वात भव्य ईव्ही प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ६ ते ८ डिसेंबर २०२४ दरम्यान हे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून या तीन दिवसांत नावीन्यपूर्ण संकल्पना, हरित तंत्रज्ञान आणि वाहन निर्मितीतील उत्कृष्टता अनुभवता येणार आहे. 'आयआयईव्ही' प्रदर्शनाचे हे चौथे वर्ष असून पुणे पिंपरी चिंचवड येथील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे हे प्रदर्शन भरणार आहे. यामध्ये अद्ययावत, नावीन्यपूर्ण, पर्यावरणपूरक वाहतूकीसाठी उपाय आणि सातत्याने विकसित होत असलेल्या इलेक्ट्रिक वाहन उद्योगातील दूरदर्शी उपक्रमांचे प्रदर्शन केले जाणार आहे. 'आयआयईव्ही'च्या माध्यमातून उत्पादक, प्रयोगशील आणि नेतृत्वशील उद्योजकांना शाश्वत गतिशीलतेच्या विशाल क्षमतेचा शोध घेण्यासाठी भव्य व्यासपीठ निर्माण होणार आहे.

# सौ. गिताभाभी बाळराजे पवार यांचा शहरात डोअर टू डोअर झंझावाती प्रचार ; गेवराईत आ. पवारांचा ऑटोरिक्षा सुसाट

गेवराई: (रिपोर्टर) गेल्या तीन दशकापासून शहरातील माय बाप जनतेने आमच्या कुटुंबावर विश्वास टाकलेला आहे. हे उपकार आमचे कुटुंब कधीच विसरणार नाही. गेवराई शहर आमचे घर असून येथील जनता ही आमची मायबाप असल्याचे समजून सेवा करत आहोत.

असे प्रतिपादन सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांनी शहरातील प्रचार दौऱ्या प्रसंगी बोलताना केले. त्यांच्या या झंझावाती प्रचार दौऱ्याने आ.लक्ष्मण पवार यांची ऑटोरिक्षा सुसाट असल्याचे दिसत आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रचारार्थ त्यांनी शहरातील डोअर टू डोअर जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, बाळराजे दादा पवार व आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून शहरात केलेल्या दर्जेदार कामा मुळेच ग्रामीण भागातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांना विधानसभेला उभे रहावे असा आग्रह केला होता. त्याच मागणीनुसार गेवराई विधानसभा निवडणूक २०१४ ला गेवराई मतदारसंघातील जनतेने ६० हजार मताच्या फरकाने त्यांना



निवडून दिले, यांची जाणीव ठेवुन आ.लक्ष्मण आण्णांनी प्रमाणिक प्रयत्न करुन मतदारसंघातील प्रत्येक गावा गावात दर्जेदार रस्ते केले आहेत यांची मतदारसंघातील जनता साक्षीदार आसून त्यांना दुसऱ्यांदा ही या मतदार मायबाप जनतेने सेवा करण्याची संधी दिली आन त्यांनी दहा वर्षात या तालुक्याचा कायापालट केला. म्हणून येणाऱ्या २० नोव्हेंबरला १५ क्रमांकाचे ऑटोरिक्षा या चिन्हा समोरील बटन दाबून मतदार आ.लक्ष्मण आण्णा पवार यांना पुन्हा या मतदार संघाची सेवा करण्यांची संधी देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या या झंझावाती प्रचाराने गेवराई शहरासह मतदार संघात आ.लक्ष्मण पवार यांची ऑटोरिक्षा सुसाट धावत असल्याचे दिसून येत आहे.

या प्रचार दौऱ्यात त्यांच्या समवेत आ.लक्ष्मण पवार यांच्या सुविद्य पत्नी भाग्यश्रीताई पवार, रत्नमालाताई मोटे, नगरसेवक राहुल खंडागळे, याहीया खॉन, दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे, आप्पासाहेब कानगुडे, राम पवार, संजय इंगळे, शिनुभाऊ बेद्रे, समाधान मस्के, रजीत खाजेकर, लक्ष्मण चव्हाण, महादेव बेद्रे, राणा कानाडे, पप्पु काबंळे, किशोर काडेकर, लहुराव सावंत, नितीन कांडे, किरण गायकवाड, मुरलीधर सुतार, सुदाम चव्हाण, विठ्ठल धापसे, माऊली सुतार, बाळराजे थोरात, नवनाथ धुरंधरे, अनिल धापसे, हारी पंडीत, इमरान शेख, सादेक चाचु, संतोष सुतार, भुषण जोगदंड, पिंटु साळवे, दिपक अवघड, शिवाजी काळे, शेख शब्बीर, शेख ईर्शाद, शौकत पठाण, दाऊद पठाण, योगेश मोटे, पप्पु बांडे, संकेत पौळे, प्रकाश बर्डे, पिंटु बर्डे, अमोल हादगुले, अनिल खांडेकर, राजेंद्र तापडीया, शेख बाबा, आदि उपस्थित होते.

# येडेश्वरी साखर कारखान्याच्या बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा संपन्न!

केज :- येडेश्वरी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ या वर्षाच्या अकराव्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ बीड जिल्ह्याचे खासदार तथा येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन मा. खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या शुभहस्ते आणि शेतकरी कामगार पक्षाचे राज्य कमिटी सदस्य भाई मोहन गुंड, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. सारिका सोनवणे व सोनवणे परिवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. रामेश्वर उबाळे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सीमा रामेश्वर उबाळे यांच्या शुभ हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.

सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे संचालक प्रा. बाळकृष्ण (बापु) भवर यांनी केले तर बाळासाहेब गलांडे, नारायण आबा शिंदे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते नवाब मामु, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बालासाहेब दादा बोराडे,



कारखान्याच्या जडणघडणीत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे ते शेतकरी आणि कामगार यांचे हित कारखाना होणार असून शेतकऱ्यांच्या ऊसाला एफआरपी पेक्षा जास्त भाव देणार आहे. तसेच कामगार वर्गांना समाधान कारक पगार दिला जाणार आहे.
- खा. बजरंग सोनवणे
चेअरमन येडेश्र्वरी साखर कारखाना

कारखान्याच्या माध्यमातून खा. बजरंग सोनवणे यांनी शेतकरी आणि कामगार वर्गासह तरुणांच्या हाताला काम देवून त्यांचे कल्याण केले आहे.
- भाई मोहन गुंड,
शेकाप नेते

व्हॉईस चेअरमन पिंटू ठोंबरे, दिलिप आबा गुलभिले, रमेश आबा शिंदे, न. प. केजचे गटनेते भाऊसाहेब गुंड, माजी सभापती अशोक तारळकर, नारायण शिंदे, विलास जोगदंड, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षा सौ. संजीवनीताई देशमुख, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, बंडू चौधरी, लाला वायबसे, शितल लांडगे, नर्गिस बागवान, शरिफभाई सय्यद, राहुल खोडसे तसेच सभासद, शेतकरी, ठेकेदार, कामगार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहर भाजपच्या वतीने खा.बालयोगी उमेशनाथ महाराज यांचे स्वागत

नगर - राज्यसभेचे नवनियुक्त भाजपाचे खासदार बालयोगी उमेशनाथ महाराज हे आहिल्यानगरमध्ये आले असता भाजपचे विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे यांनी शहर भाजपच्या वतीने स्वागत केले. यावेळी शहर उपाध्यक्ष बाबासाहेब सानप, सचिव ज्ञानेश्वर काळे, संजय ढोणे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी महेंद्र गंधे म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उज्जैनच्या वाल्मिकीधामचे पीठाधीश राष्ट्रीय संत प.पु.श्री श्री १००८ उमेशनाथ महाराज यांना नुकतेच राज्यसभेचे सभास्तव बहाल केले आहे. अशा महान तपस्वींचा सत्कार करण्याचे व त्याचा आशीर्वाद घेण्याचे भाग्य आज लाभले आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश मोमीनपुरा भागातील अनेक कार्यकर्ते राष्ट्रवादीत



बीड दि.७ (प्रतिनिधी):- ऐन निवडणुकीच्या काळात बीड मतदार संघात आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) मध्ये, इतर पक्षाच्या कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात होत आहेत. बुधवार (दि.६) रोजी बीड शहरातील मोमीनपुरा भागातील तसेच गुरूवारी (दि.७) रोजी नाळवंडी येथील अनेक कार्यकर्त्यांनी आ. क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये प्रवेश केला.

बीड शहरातील मोमीनपुरा भागातील राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) गटाचे कार्यकर्ते असलेले ईशान मोमीन, आरसोलन मोमीन, मोशोरन मोमीन, रिजवान मोमीन, आवेझ मोमीन, शेख रिजवान, शेख नविद यांनी आपल्या समर्थकांसह बुधवार (दि.६) रोजी तसेच बीड तालुक्यातील नाळवंडी येथील ऋषी सोनवणे, जीवन राठोड, कृष्णा घोडके यांनीही आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर व देशाचे नेते खा.शरदचंद्र पवार साहेब यांच्या पुरोगामी विचारांवर विश्वास ठेवून आ. संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 95- Jintur | Meghna Deepak Sakore Bordikar | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1980/2019 Before | U/s. 188 of IPC | Nil | Nil | Nil |
| 2. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1283/2022 | U/s. 188, 269, 270 ofIPC | Nil | Nil | Nil |
| 3. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 730/2022 | U/s. 188, 269, 270 of IPC and other | Nil | Nil | Nil |
| 4. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 339/2021 | U/s. 188, 269, 270 ofIPC. | Nil | Nil | Nil |
| 5. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 713/2021 | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 6. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1220/2020 | U/s. 188, 269, 270 ofIPC | Nil | Nil | Nil |
| 7. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 309/2022 | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 8. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 656/2019 | U/s. 336, 287 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 9. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 106/2022 | U/s. 341, 269 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 10. | | | Hon'ble J.M.F.C Patoda Dist. Beed-1 S.C.C. No. 185/2022 | U/s. 188, 269 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 11. | | | Cri. No. 77/2021 Pending | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 12. | | | Cri. No. 335/2021 Pending | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 95- Jintur**
**Place : Mumbai**
**Date : 07/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# खोतकरांच्या विजयाची फक्त औपचारिकता बाकी; युवकांचा उत्साह आणि जेष्ठांची सोबत ठरणार विजयाचे कारण

## सोमनाथ जळगाव तांडा येथे कॉंग्रेसला खिंडार अनेक युवकांचा शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



जालना विधानसभा मतदारसंघांमध्ये कॉंग्रेस पक्षाला धक्के मागून धक्के बसत असून सोमनाथ तांडा व जळगाव तांडा येथील अनेक युवकांनी अभिजीत राठोड (टायगर) यांच्या नेतृत्वात शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला यावेळी शिवसेना उप–नेते तथा माजी राज्यमंत्री महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनरावजी खोतकर यांनी सर्वांना शिवसेना पक्ष प्रवेश केल्याबद्दल धन्यवाद दिले.

आपण योग्य वेळी प्रवेश केल्यामुळे आपली ताकद आणखी मजबूत झाल्याचे अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले. व प्रवेश कर्त्यांचे शिवसेना पक्षात स्वागत केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन पक्षात योग्य सन्मान केला जाईल असे आश्वासन दिले. याप्रसंगी यावेळी अभिजीत राठोड (टायगर), राजू राठोड, भोपू राठोड, पृथ्वीराज राठोड, आकाश राठोड, ज्ञानेश्वर राठोड, करण राठोड, विकास राठोड, देवानंद चव्हाण, सुनील राठोड, संदीप चव्हाण, उमेश राठोड, अभिजीत चव्हाण, योगीराज राठोड, अक्षय राठोड, केवल राठोड, विराट राठोड, सोन्या राठोड, बाळू राठोड, अभिजीत चव्हाण,पवन राठोड, गजानन चव्हाण, बाळू राठोड, अविनाश सुराशे, स्वप्निल साळवे, विजय हवाले, ज्ञानेश्वर जाधव, आकाश जाधव, आदींनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख भगवानराव आंबोरे युवा सेना तालुकाप्रमुख नागेश डवले कडूबा इंदलकर गावातील अशोक चव्हाण, राम राठोड, परमेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर माऊली पडोळ, विठ्ठल एखंडे, राम एखंडे, सर्जेराव गायकवाड आदींची उपस्थिती होती.

# आकातांच्या स्नेह मिलनात निवडणुकीचे राजकीय फटाके



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी स्वर्गीय बाबासाहेब आकात यांचे राजकीय वारसदार असलेले कपिल भैया अकात व कुणाल दादा आकात यांनी विनायक मंगल कार्यालय येथे दीपावली स्नेह कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमात मतदारसंघातील आकात समर्थकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती सदर कार्यक्रम हा नेमका विधानसभा निवडणुकीच्या पडघमितच आलेला असताना या कार्यक्रमात कॉंग्रेस राष्ट्रवादी व शिवसेनेच्या मोठ मोठ्या नेत्यांची ही हजेरी लागलेली होते यात आमदार राजेश राठोड उभा आठाचे उमेदवार ए जे बोराडे माजी आमदार कै कबीर बापू यांचे चिरंजीव अन्वर बापू देशमुख यांच्यासह नुकतेच भाजपला रामराम ठोकून पुन्हा शरद पवारांचे तुतारी स्वीकारलेल्या विलास भाऊ आकात रोहन भैया माजी नगर अध्यक्ष विनायकराव काळे परतूर शहरातील नगरसेवक आरिफ अली नाना राखे यांच्यासह निम्न दुधना प्रकल्प संघर्ष समितीचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमातच जरांगे पाटील यांनी घेतलेल्या यु टर्न नंतर समाधान व्यक्त करण्यात आले व मराठा क्रांती मोर्चा चे समर्थक एजे पाटील बोराडे यांच्या समर्थनातच काम करतील अशा प्रकारचा आशीर्वाद या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला मराठा क्रांती मोर्चा चे अनेक कार्यकर्तेही आकात कुटुंबाशी असलेल्या स्नेहसंबंधामुळे उपस्थित होते याच कार्यक्रमात पुढील प्रचाराची खलबते ही करण्यात आले व्यासपीठावर उप–स्थित त्यांना मार्गदर्शन करण्यात आले यावरून सदरील स्नेह मिलन कार्यक्रमात दिवाळीचे राजकीय फटाके फोडण्यात आले.

वरद विनायक मंगल कार्यालय,परतुर येथे आकात परिवाराच्या वतीने प्रतिवर्षा प्रमाणे दीपावली सन्हेमिलन कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे आ. राजेश भैय्या राठोड,परतुर–मंठा–नेर–शेवली मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार ए.जे. बोराडे पाटील,अन्वर बापु देशमुख तसेच महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष,कॉग्रेस, शिवसेना(उबाठा)पक्षाचे मतदार संघातील प्रमुख नेते व पदाधिकारी तसेच युवा नेते कपिल भैय्या आकात, विलास भाऊ आकात, कुणाल दादा आकात, रोहन भैय्या आकात व आकात परिवारावर प्रेम करणार्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# संक्षिप्त

## पैसे घेण्याच्या कारणावरून खून; मंठा पोलिसात गुन्हा दाखल, आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहरातील तळणी फाटा येथे पैसे घेण्याच्या कारणावरून डोक्यावर मारहाण करून खून केल्याप्रकरणी मंठा पोलिसात मयताची पत्नी यांच्या फिर्यादीवरून नारायण रामचंद्र राठोड रा. पांगरी यांच्या विरोधात खुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी सविस्तर वृत्त असे की, पोलीस सुत्रांकडून मिळाली माहिती अशी की , मयत विजय बळीराम चव्हाण राहणार कोठा तालुका जिंतूर यांना आरोपीने देवगाव फाटा येथुन मोटरसायकलवर बसून पैसे घेण्याच्या कारणावरून सोबत मंठा येथे घेऊन आले व त्यांच्या डोक्यावर व इतर ठिकाणी मारहाण करून ते बेशुद्ध अवस्थेत पुन्हा नेऊन सोडले. यादरम्यान मयताच्या नातेवाईकांनी विजय चव्हाण यांना उप–चारासाठी दवाखान्यात दाखल केले , परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.या प्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात पैसे घेण्याच्या कारणावरून मयताची पत्नी शोभाबाई विजय चव्हाण यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांनी दोन तासात आरोपीस ताब्यात घेतले असून याप्रकरणी अधिक तपास फौजदार संतोष माळगे करत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## रविवारी शिक्षक पात्रता परीक्षेचे दोन सत्रात आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**


महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून प्राथमिक शिक्षक पदासाठी आवश्यक असलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचे जालना येथे रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे. परीक्षा पेपर–१ साठी सकाळी १०.३० ते १ यावेळेत १० परीक्षा केंद्रावर तर पेपर–२ चे दुपारी २.३० ते ५ या वेळेत ११ परीक्षा केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहे. तरी शिक्षक पात्रता परीक्षेसाठी परीक्षार्थींनी उपस्थित रहावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील शिक्षक पात्रता परीक्षा जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय परीक्षा आयोजन व सनियंत्रण समिती अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हास्तरीय परीक्षा आयोजन व सनियंत्रण समिती उपाध्यक्ष वर्षा मिना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे. शिक्षक पात्रता परीक्षा जालना येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, श्री.सरस्वती भूवन प्रशाला, सी.टी.एम.के. गुजराथी विद्यालय, राष्ट्रीय हिंदी विद्यालय, आर.एच.व्ही. इंग्लिश स्कुल, सेंट मेरीज हायस्कुल, जिल्हा परिषद कन्या प्रशाला, नवयुवक गणेश प्राथमिक विद्यालय, एस.एम.एस. जैन हायस्कुल, रेयॉन इंटरनॅशनल स्कुल आणि जे.ई.एस. महाविद्यालय अशा एकुण ११ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे.

सकाळच्या सत्रात पेपर–१ साठी २ हजार ९३० तर दुप–रच्य सत्रात पेपर–२ साठी ३ हजार २३७ उमेदवार परी–क्षेला बसलेले आहेत. उमेदवारांना सकाळच्या सत्रात ९ ते १०.१० दरम्यान तर दुपारच्या सत्रात १ ते २.१० वाजेपर्यंत कालावधीत प्रवेश देण्यात येणार आहे. सर्व परीक्षा केंद्रातील हॉलमध्ये परिषदेने सीसीटिव्ही कॅमेरे लावलेले आहेत. तसेच जिल्हास्तरावर परीक्षा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून याद्वारे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी आवश्यक जिल्हा परिक्षक म्हणून उपशिक्षणाधिकारी शाम देशमुख यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तरी परिक्षार्थींनी स्वत: जवळ कोणत्याही प्रकारचे ईलेक्ट्रॉनिक साहित्य बाळगू नये. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# बालरंगभूमी परिषदेतर्फे रविवार पासून बालनाट्य शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



अ. भा. नाट्य परिषदेची घटक संस्था असलेल्या बालरंग भूमी परिषद जालना शाखेच्या वतीने बालदिनानिमीत्त शालेय विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. १० ते १४ नोव्हेंबर या कालावधीत नाट्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती परिषदेच्या जिल्हाध्यक्षा वैशाली दाभाडे यांनी दिली.

०६ ते १५ या वयोगटातील बालकांना सदर नाट्य शिबिरात सहभागी होता येणार असून दररोज सकाळी ०९.०० ते दुपारी ०२.०० या वेळेत नाट्य , नृत्य, संगीत, चित्रकला ,मार्शल आर्ट, अशा विविध कला प्रकारांचे तज्ञांमार्फत प्रशिक्षण दिले जाणार आहे, सहभागी कलावंतांना प्रमाणपत्र दिले जाईल. शिबिरात नाव नोंदणीसाठी नागसेन ग्रंथालय,येथे तसेच ९३५६७५०५२९,९८६०७७४९६६,९६३७६५ १३४०,९५८८४३१३३६ या क्रमांकावर संपर्क साधावा. बालकांनी शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाध्यक्षा वैशाली दाभाडे यांनी केले आहे. परिषदेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी सिनेमा, मालिका, नाट्य कलावंत वैशाली दाभाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी इंग्रजी साहित्य , नाट्यशास्त्रामध्ये पदवी (मुंबई विद्यापीठ) पदवी प्राप्त केली असून सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवडा विद्यापीठात वैशाली दाभाडे यांचे संशोधन सुरू आहे. त्यांची कारकीर्द आणि पुरस्कार पुढीलप्रमाणे सिनेमे: तालीम, यशवंतराव चव्हाण बखर एका वादळाची ( दोन्ही सिनेमांत मुख्यभूमिका) चिरगुट , कलम३०२ ,लालचुडा, सोन गावलं गावाला पावलं, रांनपाखरं, रुकमा – राजस्थानी सिनेमा जोधपूर, सिनेमांमध्ये अशोक सराफ, कुलदीप पवार ,उपेंद्र लिमये यांच्यासोबत काम केले आहे. मालिका:–ससुराल गेंदा फुल,ब्रम्हांडनायक, आदिशक्ती, कृपा सिंधू, नाटक: वाडा चिरेबंदी, रायगडाला जेव्हा जाग येते,विच्छा माझी पुरी करा, मिडीया , गोदान्, मै पापण एसी जली, उचल ,अंधार यात्री ,बहादूर कलारिंन, अजिंठा ,हय वदन,खारुताई , असं कुठवर चालायचं?, रुदाद, ऋषिग्रंथ पुरस्कार:– ,उत्कृष्ट अभिनेत्री संबोधी अकादमी परभणी (२००५),उत्कृष्ट अभिनेत्री मालवण( २००७), उत्कृष्टअभिनेत्री महाराष्ट्र शासन,आंतरराष्ट्रीय महिला परिषद (२०१०)सहभाग, राष्ट्रीय युवक महोत्सव चेन्नई येथे महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व, मराठवाडा गौरव पुरस्कार (२०१२),आंतरराष्ट्रीय उत्कृष्टअभिनेत्री महाराष्ट्र शासन (२०१४),महाराष्ट्र गौरव पुरस्कार (२०१५),रमाई गौरव पुरस्कार वनंद (२०१५), उत्कृष्ट अभिनेत्री प्रथम पारितोषिक रौप्य पदक मुंबई महाराष्ट्र शासन २०२४ बहादुर कलारीन

# घुगे परिवाराने प्रारंभीपासूनच आपल्यावर भरभरुन प्रेम केले –अर्जुनराव खोतकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

रक्ताचे नाते असतेच परंतू त्याही पेक्षा खरे नाते जपण्याचे काम कुणी केले असेल तर ते घुगे परिवाराने केले आहे, असे प्रतिपादन अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी केले. श्री. खोतकर हे भाऊसाहेब घुगे यांनी आयोजित केलेल्या दिपावली आणि पाडव्यानिमित्त स्नेहमीलन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्यासह भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू पाचफुले, मेघा चौधरी, सत्संग मुंडे, संतोषराव मोहिते, उद्योजक दिपक अंभोरे, बाजार समितीचे संचालक राकेश पवार, राहुल हिवराळे आदींची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार केल्यानंतर कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. पुढे बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, दिपावली–पाडव्यानिमित्त आपल्याला काही संकल्प करायचे असातात. यानिमित्त मीही आपणा सर्वांना शुभेच्छा देतो, सुयश चिंतीतो! एक गोष्ट खरी की, आपला भारत– हिंदुस्थान हा विविधतेने नटलेला आहे. या विविधतेतूनच एकता ही निर्माण होते.

# अवैध गांजाची शेती करणारा पोलिसांच्या जाळ्यात!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हयात अवैध गांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याचे पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अवैध गांजा विक्री करणारे इसमांची माहिती काढुन त्यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

त्यानुषंगाने दिनांक ०६/११/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणाचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे, यांना त्यांचे गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली होती की, मौजे पत्रा तांडा शिवारामधील गट क्र. ९ कपाशी व तुरीच्या शेतामध्ये इसम नामे बळीराम गेमा जाधव रा. पत्रा तांडा ता. जि. जालना हा त्याचे शेतामध्ये मानवी आरोग्यास हानीकारक असलेला गांजाची शेती करुन स्वत: चे आर्थीक फायद्यासाठी लागवड करुन संवर्धन व जोपासना करीत आहे. त्यांनी सदरची माहिती स्थानिक गुन्हे शाखा जालना यांना दिली सदरच्या बातमीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा जालना व तालुका जालना पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अमंलदार व



स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणा येथील अंमलदार यांनी मौजे पत्रा तांडा येथे इसम नामे बळीराम गेमा जाधव याचे शेतावर छापा मारुन त्याच्या गट क्र.९, पत्रा तांडा शिवारामधील शेतामध्ये पाहणी केली असता इसम नामे बळीराम गेमा जाधव हा त्याचे स्वतःच्या मालकीच्या शेतामध्ये गांजाचे एकुण १२९ झाडांची लागवड करुन संवर्धन व जोपासना करीत असतांना मिळुन आला. त्यामुळे सदर गांजाची १२९ झाडांचे पंचासमक्ष वजन केले असता ते ९८ किलो ९९ ग्रॅम असुन किंमत अंदाजे रु.२४,७४,७५०/– असल्याचे दिसुन आल्याने ते तपासकामी जप्त करण्यात आला असुन इसम नामे बळीराम गेमा जाधव, वय–४० वर्ष, रा. पत्रा तांडा ता.जि. जालना याचेविरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना, येथे एन.डी.पी.एस. कायद्या प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

# विरोधकांच्या दडपशाहीला या निवडणुकीत कायमस्वरूपी हद्दपार करणार –आ.गोरंटयाल

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**





सच्चा व निष्ठावंत शिवसैनिक हा आपल्या सोबत असून त्यांना कितीही आमिष दाखवण्याचा प्रयत्न झाला तरी ते बळी पडणार नाहीत असे स्पष्ट करून त्यांच्या बळावरच जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांचा विजय निश्चित असल्याचा दावा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी येथे बोलतांना केला.

जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी उमेदवार कैलास गोरंटयाल, मुरलीधर शेजुळ, राजेंद्र राख, शिवाजी शेजुळ, बाबूराव पवार, नंदकिशोर जांगडे, बाला परदेशी, प्रमोद रत्नपारखे, किशोर मघाडे, शेख फारुख, मनकर्णाताई डांगे, नंदाताई पवार, मंगलबाई मेटकर, राजेंद्र जाधव, भास्करराव साळवे, वैभव उगले आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना अंबेकर म्हणाले की, वॉर्डातील जनसंपर्क आणि निवडणुकीतील तंत्र कार्यकर्त्यांना चांगल्या प्रकारे कळते त्यामुळे नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांना निवडणूक चांगली कळती. नेत्यांमध्ये विश्वास दांडगा असला की, कार्यकर्तेही उत्साहाने काम करतात. मतदारांची मानसिकता ही कार्यकर्त्यांच्या लक्षात येते असे सांगून पक्षाची कितीही हवा असू द्या, नेता कसाही असू द्या, शेवटी कार्यकर्त्यांच्या बळावरच विजय मिळत असतो आणि खरा व निष्ठावंत शिवसैनिक सोबत असल्याने मविआचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांचा विजय कुणीही रोखू शकत नाही असेही अंबेकर यांनी शेवटी स्पष्ट केले. तत्पूर्वी राजेंद्र राख, शिवाजी शेजुळ, बाबूराव पवार, नंदकिशोर जांगडे, प्रमोद रत्नपारखे, किशोर मघाडे यांनी आपल्या भाषणात मविआचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या विजयासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. संचलन राम सावंत यांनी तर शेवटी आभार बाला परदेशी यांनी मानले. कार्यक्रमास विजय चौधरी, बबनराव खरात, मुरलीधरराव थिटे, जगन्नाथ चव्हाण, सय्यद निजाम, महावीर ढक्का, दुर्गेश काठोठीवाले, घनशाम खाकीवाले, अतीक खान, विजय पवार, राजू सलामपुरे, संदीप नाईकवाडे, सय्यद अजहर, मधुकर घेवंदे, बालाजी परदेशी, आरेफ खान, गणेश घुगे, आशाताई ठाकूर, मंगलताई खांडेभराड, शितलताई तनपूरे, तुळशीराम काळे, किशोर नरवडे, संगीता पाजगें, विजय कांबळे यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी,कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आपल्या विजयासाठी दिवस रात्र झटत असलेल्या कार्यकर्त्यांची निश्चितपणे जाणीव आहे. त्यामुळे मविआतील सर्व सहकारी पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना समान न्याय दिला जाईल अशी ग्वाही उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी यावेळी बोलतांना दिली. प्रचारासाठी मविआतील घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी योग्य पद्धतीने नियोजन करावे. विजय आपलाच होणार असून फक्त किती मताधिक्य मिळणार याची प्रतीक्षा आहे असा ठाम विश्वास व्यक्त करून निवडणुकीच्या सुरुवातीपासून आपल्या प्रतिस्पर्ध्यांनी गुंडागर्दी आणि दडपशाही करण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यांच्या या दडपशाहीला आपण या निवडणुकीत कायमस्वरूपी हद्दपार करणार असल्याचे गोरंटयाल यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

# बीडवासियांच्या झंजावाताचा शुभारंभ; अनिलदादांनी फोडला प्रचाराचा नारळ!

## चारशे गाड्यांचा ताफा घेऊन हजारो कार्यकर्त्यांसह अनिलदादा जगताप बीड मतदार संघातील देवस्थानी नतमस्तक

### अनिलदादा जगताप, प्रा सुरेश नवलेंचे बीड मतदार संघात सर्वत्र जोरदार स्वागत



बीड, प्रतिनिधी- गेल्या चाळीस वर्षांच्या राजकीय प्रवासात निःस्वार्थपणे बीडवासियांची सेवा करत आलेले अनिलदादा जगताप हे केवळ बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार नसून अनिलदादा हा बीडवासियांचा झंजावत आहे आणि याच झंजावाताला प्रारंभ झाला असून अनिलदादा जगताप यांनी माजी राज्यमंत्री प्रा. सुरेशजी नवले आणि आपल्या हजारो सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवाराच्या चारशे गाड्यांचा ताफा घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले व त्यानंतर नवगण राजुरी येथे गणपतीचे दर्शन घेऊन श्री क्षेत्र नारायण गड येथे श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेत त्यांच्या चरणी प्रचाराचा नारळ फोडला आणि आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. यानंतर बीड मतदार संघातील राजुरी सर्कल, लिंबागणेश सर्कल, पाली सर्कल, खोकरमोहा जि प, नळावंडी सर्कलमधील गावागावातील देवस्थानाचे दर्शन घेतले. दरम्यान गावाखेड्यातील प्रत्येकाने अनिलदादा आणि सुरेश नवले यांचे गावात आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करत अनिलदादांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले तर माता-माऊली आणि भगिनींनी अनिलदादा यांचे औक्षण करून त्यांना पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद दिले. यानंतर अनिलदादांनी गौरक्षनाथ टेकडी या देवस्थानी नतमस्तक होऊन महंत नवनाथ महाराजांचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर बीड शहरातील भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, बस्वेश्वर स्वामी, संत गाडगे बाबा महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, महाराणा प्रताप, माता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेशजी नवले यांनी ठिकठिकाणी उपस्थित असलेल्या आपल्या समर्थक कार्यकर्त्यांच्या, ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या व विधानसभा निवडणुकीत आम्हाला मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले.

**क्षीरसागर मुक्त बीड करून विकासाचा कायापालट करण्यासाठी साथ द्या–**



**अनिलदादा जगताप**

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागरांपासून मला बीडची सुटका करायची आहे आणि बीड विकासाचा कायापालाट करायचा आहे. यासाठी माझ्यावर एकदा विश्वास ठेऊन मला साथ द्या. आपल्या अपेक्षेप्रमाणे मी बीडचा विकास करून दाखवेल. आपण मला मतदानरुपी आशीर्वाद दिला तर घरणेशाहीचे मक्तेदारी संपुष्टात येईल आणि सामान्य घरात सत्ता स्थापित होऊन सामान्यांचे मूलभूत प्रश्न सुटतील. असे आवाहन बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील जनतेला केले.

# एक्सपैंडिंग हॉरिज़ोन्स फॉर प्रोफेशनल्स' या ५२ व्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

मुंबई - भारतीय कंपनी सचिवांची संस्था (आयसीएसआय) आपल्या ५२ व्या राष्ट्रीय परिषदेची तयारी करत आहे, ज्याचे उद्घाटन सेबी च्या अध्यक्षा श्रीमती माधबी पुरी बुच यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम ८ ते १० नोव्हेंबर २०२४ दरम्यान हॉटेल सहारा स्टार, मुंबई येथे होणार आहे. या महत्त्वाच्या कार्यक्रमापूर्वी, आयसीएसआय अध्यक्ष सीएस बी नारायणन यांनी एका पत्रकार परिषदेला संबोधित केले, ज्यामध्ये त्यांनी परिषदेच्या थीमबद्दल माहिती दिली इंडिया२०२४: एक्सपैंडिंग हॉरिज़ोन्स फॉर प्रोफेशनल्स'.

सीएस बी नरसिम्हन म्हणाले, आमच्या अधिवेशनाचा उद्देश भारताचे भविष्य घडवण्यास मदत करणाऱ्या सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करणे हा आहे. या वर्षीची थीम आहे इंडिया२०२४: एक्सपैंडिंग हॉरिज़ोन्स फॉर प्रोफेशनल्स' आम्ही कॉर्पोरेट गव्हर्नन्स, शाश्वतता आणि आर्थिक वाढीमध्ये कंपनी सचिवांची भूमिका यावर सखोल चर्चा करू.

आयसीएसआय ने अलीकडच्या काही वर्षांत कॉर्पोरेट गव्हर्नन्स, शाश्वत वाढ आणि व्यावसायिक उत्कृष्टता या क्षेत्रात अनेक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

आयसीएसआय मार्गदर्शक तत्त्वे स्टुअर्डशिप (आयजीपीएस) संस्थात्मक गुंतवणूकदारांना जागतिक ईएसजीमानकांच्या अनुषंगाने शाश्वत आणि नैतिक गुंतवणुकीसाठी मार्गदर्शक तत्त्वे प्रदान करतात. आयसीएसआय ने कामाच्या ठिकाणी सर्वसमावेशकतेला चालना देण्यासाठी लैंगिक छळ प्रतिबंध, प्रतिबंध आणि निवारण यावर एक मानक देखील विकसित केले आहे, जे तक्रार व्यवस्थापन, तपास प्रक्रिया आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण सुनिश्चित करते.

न्यायालयीन भार कमी करण्यासाठी, आयसीएसआयइंटरनॅशनल एडीआर सेंटर एक व्यासपीठ प्रदान करते जे विवादांचे त्वरीत निराकरण करण्यात मदत करेल. सामाजिक जबाबदारीच्या क्षेत्रात, आयसीएसआय इन्स्टिट्यूट ऑफ सोशल ऑडिटर्स (आयएसए) ने सामाजिक प्रभाव मूल्यांकन मजबूत केले आहे आणि नवीन सामाजिक लेखापरीक्षण मानके सादर केली आहेत.

आयसीएसआय स्टार्टअप आणि एमएसएमई उत्प्रेरक उपक्रमांतर्गत, लहान व्यवसायांना वित्त, अनुपालन आणि नोंदणीमध्ये सर्वसमावेशक सहाय्य प्रदान केले जाते. आयसीएसआयने नॅशनल कॉर्पोरेट गव्हर्नन्स एक्सलन्स अवॉर्ड्सचीही स्थापना केली आहे आणि युनिक डॉक्युमेंट आयडेंटिफिकेशन नंबर आणि कंपनी सेक्रेटरी आयडेंटिफिकेशन नंबर यांसारख्या प्रणालींद्वारे रोजगारामध्ये प्रमाणपत्र आणि पारदर्शकतेला प्रोत्साहन देते.

५२ वे राष्ट्रीय अधिवेशन कॉर्पोरेट गव्हर्नन्समध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि भारतीय व्यवसायांच्या भविष्याला आकार देण्यासाठी आयसीएसआय ची वचनबद्धता दर्शवेल.

# संविधानाचा वारंवार अपमान करणाऱ्या काँग्रेसला जनता माफ करणार नाही

### संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

संविधानाची अनेकदा मोडतोड करणाऱ्या आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायम अवमान करणाऱ्या काँग्रेसला जनता यावेळी माफ करणार नाही, असे सांगत आतापर्यंत केलेल्या संविधानाच्या अवमानाबद्दल आधी काँग्रेसने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केली. भाजपा मिडिया सेंटर मध्ये झालेल्या पत्रकार परीषदेत श्री.रीजीजू बोलत होते.यावेळी भाजपा केंद्रीय माध्यम समन्वयक के.के.उपाध्याय ,राष्ट्रीय प्रवक्ते प्रेम शुक्ला,डॉ.सय्यद जफर इस्लाम,भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, आदी उपस्थित होते. देशाची अर्थव्यवस्था जागतिक स्तरावर अधिक मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र आणि आर्थिक राजधानी मुंबईचे योगदान महत्वाचे आहे.महायुती सरकारच्या काळात अधिक वेगाने विकासकामे होत असून,या कामाची पोचपावती मतदार देतील हा विश्वास ही व्यक्त केला.




मागास वर्गातून आलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीवर पंतप्रधानांनी आतापर्यंत मोठी जबाबदारी सोपवल्याने मी जबाबदारीने सांगू शकतो की जी व्यक्ती संविधानाचा सन्मान करत नाही त्याच्या हातात संविधानाची प्रत आणि त्याच्या तोंडून संविधान शब्द निघणे हे निषेधार्ह आहे. निळ्या रंगाऐवजी लाल रंगाचे मुखपृष्ठ घालून आत कोरे कागद असलेल्या नकली संविधानाची प्रत राहुल गांधी यांनी नागपुरात नाचवली. त्यांच्या या कृत्याने डॉ. आंबडेकरांच्या आत्म्याला वेदना झाल्या असतील, असे सांगून रिजिजू म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पहिल्या केंद्रीय मंत्रिमंडळात घेतले जाऊ नये यासाठी जवाहरलाल नेहरू यांनी त्यांचे नाव यादीतून वगळले होते. महात्मा गांधी आणि इतर काहींनी हे पहिले सरकार निवडणुकीद्वारे होत नसल्याचे त्यांच्या लक्षात आणून दिले तेव्हा कुठे त्यांना देशाचे पहिले कायदा मंत्रीपद देण्यात आले. तेव्हापासून नेहरू यांनी डॉ.आंबेडकर यांचा कायम अपमान केला. अखेरीस डॉ. आंबेडकर यांना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जिथे जिथे जाऊन निवडणुका लढवल्या तिथे तिथे काँग्रेसने प्रयत्नपूर्वक त्यांचा पराभव केला. २०१५ पर्यंत काँग्रेसने संविधान दिन का साजरा केला नाही, असा सवालही रिजिजू यांनी उपस्थित केला.आणीबाणी लादून तर काँग्रेसने लोकशाहीचा गळा घोटला होता.काँग्रेसने आधी संविधानावर त्यांनी वारंवार केलेल्या हल्ल्यांबाबत उत्तर द्यावे. तेव्हाच हातात संविधान धरावे आणि डॉ.आंबेडकर यांचे नाव घ्यावे. संविधान आणि डॉ. आंबेडकर यांचे नाव घेण्याचा काँग्रेसला काहीही अधिकार नाही. नेहरू यांनीच सर्वप्रथम आरक्षणाला विरोध केला, याची नोंद संसदेच्या रेकॉर्डमध्ये आहे. काँग्रेसने डॉ. आंबेडकरांना भारतरत्न नाकारले होते मात्र जवाहरलाल नेहरू यांना देण्यात आले होते हेही लक्षात घेतले पाहिजे, असे ते म्हणाले.

मुस्लिमांचा कायमच वोट बँक म्हणून वापर करत काँग्रेसने त्यांचे सर्वात मोठे नुकसानच केले. त्यामुळे मुस्लिम कायम गरीबच राहिले आणि फायदा मात्र काँग्रेसचा झाला. त्या पार्श्वभूमीवर भाजपा समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन चालत आहे आणि त्यांचा विकास साधत आहे. काँग्रेसचा हा खोटारडेपणा आता उघड झाला असून अल्पसंख्यांकांची मते महायुतीच्याच पारड्यात पडतील,असा ठाम विश्वासश्री. रिजिजू यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणूक प्रचारावेळी काँग्रेसने दिशाभूल करणारी माहिती,फेक नरेटिव्ह पसरवले होते मात्र आता काँग्रेसचा हा प्रयत्न अयशस्वी झाला आहे. खरे काय आणि खोटे काय हे महाराष्ट्रातील सूज्ञ जनतेने ओळखले असून ते म्हणाले कि,

संसदेत ३७० कलम हटवण्यात आले आहे ते पुन्हा लागू होणार नाही .भारत हा एकसंधच राहील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# सीएसएमएसएस वैद्यकीय रुग्णालयात मोफत महाआरोग्य तपासणी शिबीर

### तपासण्यांसह अल्पदरात उपचार

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी - दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी तसेच खिशात काही पैसे नाहीत म्हणून अनेक गंभीर आजार अंगावरच काढणारे अनेक रुग्ण आहेत. अशा लोकांसाठी अजित सीड्स प्रायव्हेट लिमिटेड संचलित प्रस्तावित सीएसएमएसएस वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाने अशा रुग्णांसाठी मोफत योजना सुरू केली आहे. मोफल तपासणीसह अल्प दरात विविध उपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

'निरोगी महाराष्ट्र' चा संकल्प साध्य करण्यासाठी राज्यात विविध रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांसाठी उपचार पद्धत राबविण्यात येत आहे. नागरिकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि आपल्या घराजवळ सहज साध्य आरोग्य सेवा पुरवण्यासाठी पायाभूत सुविधांचा दर्जा सुधारण्यावर सीएसएमएसएस रुग्णालय प्रयत्नशील आहे.

रुग्णालयाने ६०५ बेडचे सुसज्ज रुग्णालय सुरू केले आहे. रुग्णालयाने १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत महाआरोग्य शिबीर सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते ४ या कालावधीत राबवण्यात येत आहे. यात रुग्णांची मोफत तपासणी करण्यात येत असून, यामध्ये रक्त, लघवी, आरोग्य तपासणी, एक्सरे, ईसीजी, डोळयांचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया, तिरळेपणाची शस्त्रक्रिया, गर्भवती महिलांसाठी सोनोग्राफी, गर्भधारणा बंदी, नसबंदी, बाळंतपण, लसीकरण, कॉंट्रासेप्टिव डिव्हाईसेस, लोअर सेगमेंट सिझेरियन डिलिव्हरी मोफत केल्या जाणार आहेत. या अत्याधुनिक रुग्णालयामध्ये आधुनिक तंत्रज्ञानयुक्त ९ शस्त्रक्रियागार असून आय. सीयु, आयसीसी, युएनआय, सी. यु, सीटी स्कॅन, सोनोग्राफी, २-डी इको आदी सर्व सोयी उपलब्ध असून, सीटी स्कॅन, सोनोग्राफी, २-डी इको हे अत्यंत अल्प दरात केले जाईल. रुग्णांनी अजित सीड्स प्रायव्हेट लिमिटेड संचलित प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, लिंबेजळगाव टोलनाक्याच्या बाजूला संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


# बीड वासियांच्या झंजावाताचा शुभारंभ; अनिलदादांनी फोडला प्रचाराचा नारळ!

### अनिलदादा जगताप, प्रा सुरेश नवलेंचे बीड मतदार संघात सर्वत्र जोरदार स्वागत

बीड, प्रतिनिधी- गेल्या चाळीस वर्षांच्या राजकीय प्रवासात निःस्वार्थपणे बीडवासियांची सेवा करत आलेले अनिलदादा जगताप हे केवळ बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार नसून अनिलदादा हा बीडवासियांचा झंजावत आहे आणि याच झंजावाताला प्रारंभ झाला असून अनिलदादा जगताप यांनी माजी राज्यमंत्री प्रा. सुरेशजी नवले आणि आपल्या हजारो सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवाराच्या चारशे गाड्यांचा ताफा घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले व त्यानंतर नवगण राजुरी येथे गणपतीचे दर्शन घेऊन श्री क्षेत्र नारायण गड येथे श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेत त्यांच्या चरणी प्रचाराचा नारळ फोडला आणि आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला.

यानंतर बीड मतदार संघातील राजुरी सर्कल, लिंबागणेश सर्कल, पाली सर्कल, खोकरमोहा जि प, नळावंडी सर्कलमधील गावागावातील देवस्थानाचे दर्शन घेतले. दरम्यान गावाखेड्यातील प्रत्येकाने अनिलदादा आणि सुरेश नवले यांचे गावात आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करत अनिलदादांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले तर माता-माऊली आणि भगिनींनी अनिलदादा यांचे औक्षण करून त्यांना पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद दिले. यानंतर अनिलदादांनी गौरक्षनाथ टेकडी या देवस्थानी नतमस्तक होऊन महंत नवनाथ महाराजांचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर बीड शहरातील भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, बस्वेश्वर स्वामी, संत गाडगे बाबा महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, महाराणा प्रताप, माता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेशजी नवले यांनी ठिकठिकाणी उपस्थित असलेल्या आपल्या समर्थक कार्यकर्त्यांच्या, ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या व विधानसभा निवडणुकीत आम्हाला मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले.

क्षीरसागर मुक्त बीड करून विकासाचा कायापालट करण्यासाठी साथ द्या–अनिलदादा जगताप

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागरांपासून मला बीडची सुटका करायची आहे आणि बीड विकासाचा कायापालाट करायचा आहे. यासाठी माझ्यावर एकदा विश्वास ठेऊन मला साथ द्या. आपल्या अपेक्षेप्रमाणे मी बीडचा विकास करून दाखवेल. आपण मला मतदानरुपी आशीर्वाद दिला तर घरणेशाहीचे मक्तेदारी संपुष्टात येईल आणि सामान्य घरात सत्ता स्थापित होऊन सामान्यांचे मूलभूत प्रश्न सुटतील. असे आवाहन बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील जनतेला केले.



**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 83 - Kinwat | BHIMRAO RAMJI KERAM | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble JMFC Court, Yewatmal. CC No. 4456/2017 Pending. | U/s. 341, 143, 188, of IPC, u/s. 135 Maharastra Police Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 83-Kinwat**
**Place : Mumbai**
**Date : 07/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**



**Format C-1**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate: Pramod sakharam kute, M. Po. Mangalwara bazar, Hingoli, Tq. Zilla Hingoli.**
**Name of political party : Maharastra Navnirman Sena.**
(Independent candidates should write "Independent" here)
**Name of Election : Maharashtra Legislative Assembly-2024**
**Name of Constituency: Hingoli 94**

I **Pramod sakharam kute** (name of candidate), a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending criminal cases**

| Sl. No. Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|
| १. मा. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग हिंगोली. | एसएससी ८३५/२०२४ | हजेरी | कलम ४४७, ४२७, ६०४, ३४ भा.द.वी |
| २. मा. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग हिंगोली. | आर.सी.सी. २६७/२०२१ | हजेरी | कलम ३२४, ३४१, ३२३ भा.द.वी. |
| ३. मा. जिल्हा व सत्र न्यायालय हिंगोली. | एसटी ३२/२०२२ | हजेरीसाठी | कलम ३५३, १४३, १४७ भा.द.वी. |
| ४. मा. जिल्हा व सत्र न्यायालय हिंगोली. | एसटी नं. १५/२०१७ | उलट तपासासाठी | कलम ३९५, १४७, १४९, Armsact. & B.P.Act. |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl.no. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Imposed Punishment |
|---|---|---|---|
| | Nill | Nill | Nill |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

दि. 07/11/2024

उमेदवाराची सही/-
नाव. प्रमोद सखाराम कुटे

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

जा.क्र. सरफेसी/०९/७००२-९९/११६/२०२४-२५ दिनांक ०६.११.२०२४

## नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,
१. श्री गणपत (गणेश) संग्रामआप्पा कवठे
पत्ता:- श्रीनगर, अश्वमेघ हॉटेलच्या मागे, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातुर-४१३ ५१२
२. श्री. चंद्रकांत मुरलीधरराव इगवे
पत्ता:- फ्लॅट नं. १, एम. आय. डी. सी. रोड, हनुमान मंदीरजवळ, भास्कर नगर, लातूर ता. जि. लातुर ४१३ ५१२
३. श्री. मंगेश तुळशीदास बोधे
पत्ता:- विवेकानंद पुरम, लातूर, ता. जि. लातुर ४१३ ५१२
(कायद्याच्या २(१) (ष) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)
सिक्युरिटायझेशनच्या १३ (२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२
महोदय,
विषय:- नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- लातुर
सुचना:- U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.
१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. पासुन तुमचे कर्जखाते दिनांक २६.१०.२०२४ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे. ३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील / गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. मुदती कर्ज - ९९ रू.५,००,०००/- | अर्जदार यांच्या मालकीची श्रीनगर, अश्वमेघ हॉटेलच्या मागे, बार्शी रोड, लातूर जि. लातुर येथील प्लॉट नं. ३१, क्षेत्र. २००० स्वे. फु., सर्वे नं. २३४/३, मनपा घर क्र. जुना आर-२/१६६६/२-के, नवीन ए-५/१५० जागा असुन ज्याच्या चतु: सिमा खालीलप्रमाणे:- पुर्व:- प्लॉट नं. ३८ एकतारे यांचा पश्चिम:- रस्ता २० फुट दक्षिण:- प्लॉट नं. ३० देशमुख यांचा उत्तर:- प्लॉट मल्लिकार्जुन माधवराव अंबुलगे (वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत) | मुद्दल + व्याज एकुण रु. ४,०२,५१३/- अधिक दिनांक ३१.१०.२०२४ रोजी पुढील व्याज @ १४.००% दिनांक ०१.११.२०२४ पासून |

*वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
* अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक २४.०१.२०२०
ब.. गहाणखत नोंदणी दिनांक २४.०१.२०२० (गहाणखत नोंदणी क्र.७२३/२०२०)
५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.
६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपूर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल+व्याज एकुण रु. ४,०२,५१३/- दिनांक ३१.१०.२०२४ अधिक दिनांक ०१.११.२०२४ पासून पुढील व्याज @१४.००% आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक ०७.०१.२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पूर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणाऱ्या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:
अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणाऱ्याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.
७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.
**ठिकाण:- अंबाजोगाई**

**श्री. अनंत गोपाळराव देशपांडे**
**अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर) दीनदयाळ नागरी सह. बँक म. अंबाजोगाई मुख्यालय-अंबाजोगाई मो. ७६६६५७७९००**

---

जा.क्र. सरफेसी/०३/टीएल-३२३/११०२०२४-२५ दिनांक ०६.११.२०२४

## नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,
१. मे. क्लब फाईव्ह फिटनेस प्रोप्रा. रोहित शिवाजीराव लाटे (कर्जदार)
पत्ता:- शिवज्योत, संमता कॉलनी, माजलगाव, जि. बीड ४३१ १३१
२. श्री. शिवाजी जिजाभाऊ लाटे (सह-कर्जदार)
पत्ता:- शिवज्योत, संमता कॉलनी, माजलगाव, जि. बीड ४३१ १३१
३. श्री. भालचंद्र व्यंकट शेंडगे
पत्ता:- संभाजी चौक, मु. शेळापुरी पो. ता. माजलगांव, जि.बीड ४३१ १३१
४. श्री. चंद्रकांत सुरेशराव लाटे
पत्ता:- मु.पो. बाभुळगाव, पो. दिंद्रुड ता. माजलगांव, जि. बीड ४३१ १३१
५. श्री. विलास मदनराव कुरे
पत्ता:-१०/८४, कुरे निवास, समर्थ नगर, जुना मोढा, माजलगाव, जि. बीड ४३१ १३१
(कायद्याच्या २(१)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)
सिक्युरिटायझेशनच्या १३ (२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२
महोदय,
विषय:- नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- माजलगाव
सुचना:- U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.
१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. पासुन तुमचे कर्जखाते दिनांक १६.०४.२०२४ पासुन एन.पी.ए. (NPA)झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील / गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. टीएल-३२३ रु.३०,००,०००/- | (मालमत्ता धारकाचे नाव: शिवाजीराव जिजाभाऊ लाटे) मौजे माजलगाव, जि.बीड येथील नगर परिषद हद्दीतील सव्व्हे नं.३८५ मधील घर क्र.२६/९२२ ज्यांची लांबी पुर्व पश्चिम-१५ मी आणि रुंदी दक्षिण-उत्तर १२ मी. एकुण १८० स्वे.मी. क्षेत्रफळ ज्याचे चतु: सिमा खालीलप्रमाणे:- पूर्व: सर्व्हे नं.३८६ मधील प्लॉट पश्चिम: सरकारी रस्ता उत्तर:- बापराव महादु कदम दक्षिण: निवृती लांबुड आता नायबळ (वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत | मुद्दल+व्याज एकुण रु.३१३२५५२/- दिनांक ३१.१०.२०२४ रोजी पुढील व्याज @ ११.८५% दिनांक ०१.११.२०२४ पासुन |

*वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
* अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक १७.०३.२०२१
ब.. गहाणखत नोंदणी दिनांक ०२.०५.२०१९ (गहाणखत नोंदणी क्र.१५०५/२०१९)
५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPAम्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही. ६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपूर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल+व्याज एकुण रु. ३१,३२,५५२/- दिनांक ३१.१०.२०२४ रोजी $ दिनांक ०१.११.२०२४ पासून पुढील व्याज @११.८५% दिनांक ०१.११.२०२४ पासून आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक ०६.०१.२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पूर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणाऱ्या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे: अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार. ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे. क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणाऱ्याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे. ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते. ७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

**श्री. अनंत गोपाळराव देशपांडे**
**अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)**

---

जा.क्र. सरफेसी/१६/टीएल-१८०/१०८/२०२४-२५ दिनांक ०६.११.२०२४

## नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,
१. मे. सुनिल ड्रेसेस प्रोप्रा सुनिल भालचंद्र बुलबुले
पत्ता:- मेन रोड, फुले नगर, अहमदपुर, जि. लातुर-४१३ ५१५
२. श्री. रवि गणपतराव मद्रेवार
पत्ता:- महात्मा गांधी कॉलेज जवळ, मारोती मंदीर, अहमदपुर, जि. लातुर ४१३ ५१५
३. श्री. प्रकाश शामचंद्र बुलबुले पत्ता:- गणेश मंदीर जवळ, फुले नगर, अहमदपुर, जि. लातुर ४१३ ५१५
४. श्री. शशिकांत भालचंद्र बुलबुले
पत्ता:- मेन रोड, फुले नगर, अहमदपुर, जि. लातुर ४१३ ५१५
(कायद्याच्या २(१) (f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)
सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२
महोदय,
विषय: नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढून टाकण्याची मागणी आमची शाखा: अहमदपुर सुचना:- U/S १३ (२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितोकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी, १. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत. २. पासून तुमचे कर्जखाते दिनांक ०४.०५.२०२४ पासून एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील / गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र.मुदती कर्ज -१८० रू.४०,००,०००/- | (मालमत्ता धारकाचे नाव: सुनिल भालचंद्र बुलबुले) मौजे अहमदपुर जि. लातुर येथील व्यावसायीक मालमत्ता क्षेत्रफळ ६२५ चौ.मी. ज्याचा नगर परिषद क्र. डी-६६/१२३२ असुन ज्याच्या चतु:सिमा (सुनिल भालचंद्र बुलबुले यांनी दिलेल्या स्वयं घोषणापत्रानुसार मालमत्तेच्या चतु:सिमा) खालीलप्रमाणे:- पुर्व :-रस्ता पश्चिम: दयासागर शेटे यांचे दुकान दक्षिण:- रस्ता, उत्तर:- माधव चिंगळे यांचे घर (वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत) | मुद्दल + व्याज एकुण रु. ६,७२,३४०/- अधिक दिनांक ३१.१०.२०२४ रोजी पुढील व्याज @ १०.५०% दिनांक ०१.११.२०२४ पासून |

*वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
* अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक ०४.११.२०२३
ब.. गहाणखत नोंदणी दिनांक ०२.११.२०२३ (गहाणखत नोंदणी क्र.३०७९/२०२३)
५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.
६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपूर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल + व्याज एकुण रु.४२,०९,३११/- दिनांक ३१.१०.२०२४ अधिक दिनांक ०१.११.२०२४ पासून पुढील व्याज @१२.००% आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक ०६.०१.२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पूर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणाऱ्या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:
अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणाऱ्याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.
७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.
**ठिकाण:- अंबाजोगाई**

**श्री. अनंत गोपाळराव देशपांडे**
**अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर) दीनदयाळ नागरी सह. बँक म. अंबाजोगाई मुख्यालय-अंबाजोगाई मो. ७६६६५७७९००**

---

जा.क्र. सरफेसी/०९/७०३८-०७/११३/२०२४-२५ दिनांक ०६.११.२०२४

## नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,
१. श्री गणपत (गणेश) संग्रामआप्पा कवठे पत्ता:- श्रीनगर, अश्वमेघ हॉटेलच्या मागे, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातुर-४१३ ५१२
२. श्री. चंद्रकांत मुरलीधरराव इगवे पत्ता: फ्लॅट नं. १, एम. आय. डी. सी. रोड, हनुमान मंदीरजवळ, भास्कर नगर, लातूर ता. जि. लातुर ४१३ ५१२
३. श्री. मंगेश तुळशीदास बोधे पत्ता:- विवेकानंद पुरम, लातूर, ता. जि. लातुर ४१३ ५१२
**(कायद्याच्या २(१) (f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)**
सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२
महोदय,
प्रति,
खाते क्र. मुदती कर्ज घर बांधकाम ०७ रु. १०,००,०००/-
विषय: नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- लातुर सुचना:- ण/ड १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.
१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. पासुन तुमचे कर्जखाते दिनांक २६.१०.२०२४ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील / गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. मुदती कर्ज घर बांधकाम ०७ रु. १०,००,०००/ | अर्जदार यांच्या मालकीची श्रीनगर, अश्वमेघ हॉटेलच्या मागे, बार्शी रोड, लातूर जि. लातुर येथील प्लॉट नं. ३१, क्षेत्र. २००० स्वे. फु., सर्वे नं. २३४/३, मनपा घर क्र. जुना आर-२/१६६६/२-के, नवीन ए-५/१५० जागा असुन ज्याच्या चतु: सिमा खालीलप्रमाणे:- पुर्व:- प्लॉट नं. ३८ एकतारे यांचा पश्चिम:- रस्ता २० फुट दक्षिण:- प्लॉट नं. ३० देशमुख यांचा उत्तर:- प्लॉट मल्लिकार्जुन माधवराव अंबुलगे (वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत) | मुद्दल + व्याज एकुण रु. ६,७२,३४०/- अधिक दिनांक ३१.१०.२०२४ रोजी पुढील व्याज @ १०.५०% दिनांक ०१.११.२०२४ पासून |

*वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
* अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक २४.०१.२०२०
ब.. गहाणखत नोंदणी दिनांक २४.०१.२०२० (गहाणखत नोंदणी क्र.७२१/२०२०)
५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.
६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपूर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल+व्याज एकुण रु. ६,७२,३४०/- दिनांक ३१.१०.२०२४ अधिक दिनांक ०१.११.२०२४ पासून पुढील व्याज @१०.५०% आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक ०७.०१.२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पूर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणाऱ्या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:
अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणाऱ्याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.
७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.
**ठिकाण:- अंबाजोगाई**


**श्री. अनंत गोपाळराव देशपांडे**
**अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर) दीनदयाळ नागरी सह. बँक म. अंबाजोगाई मुख्यालय-अंबाजोगाई मो. ७६६६५७७९००**

---
























सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## पीएफ विभागाकडून रिकव्हरी मोहीम

छत्रपती संभाजीनगर : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन प्रादेशिक कार्यालयाद्वारे नोव्हेंबर-डिसेंबर २०२४ आणि जानेवारी-२०२५ महिन्यांसाठी एक विशेष पुनर्प्राप्ती (रिकव्हरी) मोहीम सुरू करण्यात आली आहे. या देय रकमांमध्ये पीएफ योगदान आणि दंडात्मक नुकसान आणि उशीरा केलेल्या पेमेंटवरील व्याजाचा समावेश आहे. वसुली अधिकारी, ईपीएफओ यांना ईपीएफ आणि एमपी कायदा, १९५२ च्या कलम ८ बी ते ८ जी अंतर्गत आणि प्राप्तिकर कायदा १९६१ च्या द्वितीय अनुसूचीसह वाचलेल्या आयटीसीपी नियम-१९६२ मधील तरतुदींचा वापर करण्याचा अधिकार आहे.

त्यानुसार थकबाकीदार प्रकरणांमध्ये सर्व थकबाकीदारांना आधीच नोटिसा बजावण्यात आल्या आहेत आणि आता प्रभावी वसुलीसाठी विविध जबर उपाय (चल/अचल मालमत्ता आणि लिलाव, अटक आणि ताब्यात घेणे, बँक खाते संलग्न करणे, प्राप्तकर्त्याची नियुक्ती इत्यादी) चा अवलंब केला जाण्याची शक्यता आहे. या आस्थापनांमधील नियोक्त्यांना याबाबत आधीच सावध केले आहे. थकबाकीदार आस्थापनांना पुन्हा एकदा ताबडतोब थकबाकी भरण्याची आणि ईपीएफओ प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांना कळवण्याची ताकीद देण्यात येत आहे, जेणेकरून त्यांच्यावर अप्रिय कारवाई होऊ नये, असे पीएफ क्षेत्रीय कार्यालयाचे प्रमुख कौशल सिंह यांनी कळविले आहे.

## वीजचोराची हर्सुल तुरुंगात रवानगी

छत्रपती संभाजीनगर : ८ वर्षांपूर्वीच्या वीजचोरी प्रकरणात पोलिसांनी आरोपीस अटक केली. न्यायालयासमोर हजर केले असता आरोपीस २० नोव्हेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. न्यायालयाच्या आदेशाने आरोपीची हर्सुल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. २०१६ मध्ये वाळूज महानगर येथील रहिवासी सुरेश पुंजाराम साबळे याने घरगुती वापरासाठी वीजचोरी केली होती. त्यास महावितरणने २५ हजार ९६८ रुपयांचे वीजचोरीचे निर्धारित बिल दिले होते. मात्र आरोपी साबळेने हे बिल भरण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे महावितरणच्या तत्कालिन सहायक अभियंत्याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय विद्युत कायद्याच्या कलम १३५ अन्वये सुरेश साबळेवर गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल केल्यानंतरही आरोपी हजर राहत नसल्याने न्यायालयाने साबळेविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट काढले. ६ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी आरोपीस अटक करून न्यायालयापुढे हजर केले असता जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.के. कऱ्हाळे यांनी आरोपी सुरेश साबळे यास २० नोव्हेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

## बाळासाहेब पठाडे शहराध्यक्ष पदाचे दावेदार



पैठण ०७ :- पैठण शहर व्यापारी महासंघाच्या कार्यकारिणीची निवड लवकरच होणार असून शहराध्यक्ष पदासाठी विलास बापू भुमरे यांचे खंदे समर्थक बाळासाहेब पठाडे हे प्रमुख दावेदार असल्याचे बोलले जात आहे. पैठण शहर व्यापारी महासंघाच्या मागील कार्यकारिणीचा कार्यकाळ संपत आला असून, पैठण शहर व्यापारी महासंघाचा शहरअध्यक्ष नव्याने निवड करण्याची मागणी काही राजकीय व्यापारी वर्गातील मंडळींनी केली होती. त्यामुळे अनेकांनी पैठण शहरातून शहरअध्यक्ष पदासाठी इच्छुक असल्याचे मत व्यक्त केले होते. त्यामुळे अनेक व्यापारी वर्गातील मित्र परिवारातुन बाळासाहेब पाटील पठाडे शहरअध्यक्ष पदासाठी इच्छुक असल्याचे बोलले जात आहे.

# मतदान केंद्रांवर आरोग्य सुविधांचे नियोजन करा- जिल्हाधिकारी स्वामी



छत्रपती संभाजीनगर, दि.७(जिमाका):- जिल्ह्यात विधानसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम राबविला जात आहे. त्याअनुषंगाने निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार मतदान केंद्रांवर प्राथमिक आरोग्य सुविधा देण्याचे नियोजन करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी अज आरोग्य यंत्रणांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज आरोग्य यंत्रणांचा आढावा घेण्यात आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतिपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा तसेच सर्व आरोग्य यंत्रणा प्रमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके उपस्थित होते.

मतदान केंद्रांवर द्यावयाच्या वैद्यकीय सुविधांबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशांची माहिती उपस्थितांना करुन देण्यात आली. त्यात प्रामुख्याने द्यावयाचे मेडिकल किट ज्यात प्राथमिक उपचारासाठीचे साहित्य व औषधींचा समावेश आहे. तसेच अचानक उद्भवणाऱ्या आजारांबाबत प्राथमिक औषधांचा समावेश आहे. तसेच प्रत्येक क्षेत्र अधिकाऱ्यांच्या पथकात एक आरोग्य कर्मचारी असावा,असेही निर्देश असल्याचे सांगण्यात आले. त्यादृष्टीने जिल्ह्यातील ९ मतदारसंघांमध्ये आरोग्य सुविधा देण्याबाबत मतदान केंद्रनिहाय तसेच मतदान कर्मचारी यांचे साहित्य वितरण ठिकाण तसेच मतमोजणीच्या ठिकाणी वैद्यकीय कक्ष तयार करण्याबाबत निर्देश देण्यात आले. यासोबतच जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अन्य रुग्णालयांमध्ये आयसीयु बेड सहित उपचार सुविधांसाठी सज्जता ठेवण्यात यावी जेणेकरुन निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यास काही वैद्यकीय समस्या उद्भवल्यास तात्काळ उपचार सुविधा उपलब्ध व्हावी. यादृष्टिने नियोजन करण्यात यावे,असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी निर्देश दिले. त्यासाठी अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांच्याकडे नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी देण्याबाबतही त्यांनी निर्देशित केले.

# विद्यापीठाच्या नाट्यगृहात २१ पासून 'तृतीय पद्म फेस्टिव्हल'

### राज्यपाल हरिभाऊ बागडे उद्घाटक

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

ज्ञानयज्ञ फाउंडेशनच्या वतीने बहुचर्चित 'तृतीय पद्म फेस्टिव्हल' २१ ते २३ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेल्या 'पद्म' पुरस्कारप्राप्त १३ मान्यवरांना ऐकण्याची संधी यानिमित्ताने मिळणार आहे. यामध्ये पंडित हरिप्रसाद चौरसिया, संत साहित्यिक डॉ. यु. म. पठाण, भारतीय पुरातत्त्वशास्त्रज्ञ के. के. मोहम्मद, डॉ. रवींद्र व डॉ. स्मिता कोल्हे आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात महोत्सवाचे आयाजन करण्यात आल्याची माहिती संयोजकांनी दिली. कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ २१ नोव्हेंबरला सकाळी १०.३० ला राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते होईल. दुपारी बारापासून संवाद सत्रास सुरवात होईल. पहिल्या दिवशी उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक, डॉ. सुभाष पाळेकर (अमरावती), महिला उद्योजिका डॉ. कल्पना सरोज (मुंबई) व पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्याशी संवाद होईल. रात्री आठला पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या यांच्याशी संवाद होईल. रात्री आठ वा. पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या उपस्थितीत पंडितजी यांच्या शिष्यांचे बासरीवादन होईल. यामध्ये विवेक सोनार, वैष्णवी जोशी यांचे बासरीवादन व तबल्यावर ओजस अढिया असतील.

झाडीपट्टी रंगभूमीवर चर्चा

२२ नोव्हेंबरला सकाळी साडेनऊला सत्रांना सुरवात होईल. या दिवशी वैज्ञानिक डॉ. बी. एन. सुरेश, जल पुनर्भरणावर काम करणारे उमाशंकर पांडे (बांदा, उत्तर प्रदेश), भारतीय पुरातत्त्वशास्त्रज्ञ के. के. मुहम्मद, नेत्ररोगतज्ज्ञ विकास महात्मे (नागपूर) आणि गडचिरोली (झाडीपट्टी रंगभूमी) येथील डॉ. परशुराम खुणे यांचे सत्र होईल. सांस्कृतिक सादरीकरणामध्ये रात्री आठला झाडीपट्टी रंगभूमीच्या वतीने 'लावणी भुलली अभंगाला' कार्यक्रम होईल. २३ नोव्हेंबरला सकाळी साडेनऊला सत्रांना सुरवात होईल. या दिवशी धावपटू सुनीता रानी (पंजाब), क्रिकेट समालोचक सुशील दोशी (इंदौर), रवींद्र व डॉ. स्मिता कोल्हे, डॉ. यु. म. पठाण यांचे सत्र होईल. दरम्यान, फेस्टिव्हलचा समारोप कार्यक्रम सकाळी ११.४५ ला भारतीय नौदलाचे व्हाईस अडमिरल आर. स्वामीनाथन यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तिन्ही दिवसांमध्ये प्रत्येक पद्म पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे स्वतंत्र दोन तासांचे सत्र असतील. यात मुलाखत, चर्चा व श्रोत्यांसोबत संवाद होईल. कार्यक्रम निःशुल्क असून, ७० टक्के जागा विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असतील. पद्म फेस्टिव्हलला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पैठणला निवडणूक पथकाची ठिकठिकाणी पाहणी

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०७ :- विधानसभा निवडणूक आदर्श आचार संहितेचे तंतोतंत पालनासाठी नोडल अधिकारी तथा नगर परिषदेचे मुख्याधिकारी प्रशासक श्री संतोष आगळे यांच्या पथकाकडून ठिकठिकाणी चेक पॉईंटवर कसून तपासणी करण्यात येत आहे.

पैठण ११० विधानसभा मतदार संघ एस.एस.टी पथक २ सी मुरमा फाटा चेक पोस्ट या ठिकाणी श्रीमती मनोरमा गायकवाड गट विकास अधिकारी तथा नोडल अधिकारी, श्री संतोष आगळे नोडल अधिकारी किशोर निकम प्रशासन अधिकारी राजेंद्र कांबळे सहाय्यक गट विकास



अधिकारी,एपीआय रोडगे यांनी भेट दिली. यावेळी उपस्थितीत पथक प्रमुख आर.पी. सांगळे पथक सहाय्यक अधिकारी आर. बी.जाधव पोलिस , सदाफुले फोटोग्राफर सदावर्ते यांना वाहन तपासणी बद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

## धर्मतीर्थ क्षेत्रावर आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव ससंघाचा पिच्छी परिवर्तन व वर्षायोग कलश निष्ठापना महोत्सवाचे आयोजन

### शहराच्या विविध भागातुन मोफत बसेसची व्यवस्था

छत्रपती संभाजीनगर प्रतीनीधी - प.पु. गणाधिपती गणधराचार्य कुंथुसागरजी महाराज यांच्या उपवनातील सुगंधीत पुष्प प्रज्ञायोगी दिगंबर जैनाचार्य गुप्तीनंदी गुरैदेव ससंघ सानिध्यात दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी धर्मतिर्थ क्षेत्रावर आचार्य गुप्तीनंदी गुरैदेव ससंघ सानिध्यात वर्षायोग कलश निष्ठापना व पिच्छी परिवर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व प्रथम सकाळी भगवंताचा पंचामृत अभिषेक, आहारर्या होणार आहे. यावेळी जैनेश्वरी दीक्षाथी ब्रह्मचारी निर्मल भैया अनुपम भैया अलका दीदी जनक दीदी यांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे तसेच सार्वजनिक अभिनंदन व गौदभराई करण्यात येणार आहेत दुपारी २ वाजता पिच्छी परिवर्तन महोत्सव व कलश निष्ठापना व आचार्यश्रींचे विशेष प्रवचन होणार आहे. यावेळी आचार्यश्रींना मुख्य पिच्छी भेट करण्याचे सौभाग्य श्रीमती.प्रेमलता,नमिता,दर्पक,हार्दिक,मिनाश्री,प्रमिला,नविता,सिमा,ज्योती,कटारिया परिवार राजस्थान यांच्या वतीने देण्यात येणार आहे. तसेच यावेळी उपस्थित भाविकांना छत्रपती संभाजीनगर येथील शकुंतला, नंदलाल ठोले, सन्मती राजेंद्र ठोले, अमृता निलेश ठोले, शर्मिला अल्केश बडजाते, रितीका,नयना,आस्था, वंश,आर्नव ठोले परिवार विटावाला आस्था केटर्स यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील पारसकुमार,प्रतिक,निरज,प्रसिध्द, निष्कर्ष पांडे परिवार देवगांव रंगारीवाला यांच्या वतीने शहराच्या विविध भागातुन मोफत बसेस ठेवण्यात आले आहे. या बसेस दुपारी १२.३० वाजता निघणार आहे. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन नागपुर येथील नितीन नखाते हे करणार आहेत. तसेच आचार्यश्रीच्या सानिध्यात दिनांक ८ नोव्हेबर ते १५ नोव्हेबर पर्यत अरुणकुमार, अजयकुमार पाटणी परिवार हिराखानवाले यांच्या वतीने सिध्दचव्रै महामंडळ विधानाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी समाज बांधवांनी वरील कार्यकमास मोठया संख्येने उपस्थित रहावे अे आवाहन अध्यक्ष चंद्रशेखर पाटणी, वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पापडीवाल, उपाध्यक्ष राजेंद्र पाटणी, महामंत्री पवन पापडीवाल, सहमंत्री सतिश लोहाडे, कोषाध्यक्ष गुलाबचंद कासलीवाल व धर्मतिर्थ क्षेत्राच्या वतीने करण्यात आले आहे.

## मंदगतीने होतेय गुलाबी थंडीचे आगमन, रात्रीचा झोंबतो गारवा; तापमानात घट

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

पावसाळा संपून ऑक्टोबर हिटही सरली. आता तापमानात घट सुरू झाली आहे. वातावरणातील उष्णता हळूहळू कमी होत असून, सायंकाळी व रात्री गारवा वाढू लागला आहे. येत्या काही दिवसात थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून तापमानात घट होत आहे. यंदा पावसाळ्यात मुबलक प्रमाणात पर्जन्यमान झाल्याने यंदा लवकर थंडीचे आगमन झाले आहे. ऑक्टोबर संपून अवघे सात दिवस झाले असताना वातावरणात गुलाबी थंडी हळूहळू आगमन करत आहे. मागील आठ दिवसांपासून कमाल तापमानात घट होत असल्याची नोंद होत आहे. गेल्या काही दिवसात आकाशात सूर्याची उपस्थिती असली तरी वातावरण तितकेसे उष्ण जाणवत नसून, दिवसाही हवेत किंचित गारवा जाणवत



आहे. तर सायंकाळी सातनंतर यात वाढ होऊन रात्री व पहाटे पारा खाली येत आहे.

गुरुवार, ७ रोजी चिकलठाणा वेधशाळेने कमाल तापमान ३२ तर किमान तापमान १६.५ अंश सेल्शियसची नोंद घेतली आहे. ही गुलाबी थंडीची चाहूल आहे. हवामान अभ्यासकांच्या मते नोव्हेंबरच्या अखेरपर्यंत राज्यासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता आहे.

उबदार कपडे बाहेर

दरम्यान, थंडीची चाहूल लागताच कपाटात ठेवलेल्या उबदार कपड्यांचा हळूहळू वापर सुरू झाला आहे. लहान मुले तसेच ज्येष्ठ मंडळी स्वेटर, मफलर वापरताना दिसत आहेत. तर हवामान बदलाचा परिणाम म्हणून सर्दी, खोकलासारखे व्हायरल आजारही सुरू झाले आहेत.

पहाटे धुक्याची चादर

दरम्यान, शहरात अनेक ठिकाणी भल्या पहाटे धुके पडत आहेत. झाडांवर दवबिंदूही पडलेले दिसत आहेत. सूर्य उगवताच वातावरणातील गारवा काहीसा कमी होत आहे. यामुळे पहाटे फिरणारे नागरिक मफलर, स्वेटर घालूनच 'वॉक' करताना दिसत आहे.

## जवखेडा बु दहावीच्या गेट-टुगेदर कार्यक्रम साजरा

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि.७. नोव्हेंबर- कन्नड तालुक्यातील घासीबाबा माध्यमिक विद्यालय जवखेडा बु . येथील सन २००७ मधील दहावीच्या गेट टुगेदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला.

तब्बल सतरा वर्षानी जवखेडा बु.,सारोळा येथील घासीबाबा माध्यमिक विद्यालयाचे सन २००७ मधील दहावीच्या विद्यार्थाचा सोशल मिडीयाच्या माध्यमातून संपर्क झाल्यानंतर गेट टुगेदर घेण्याचा निर्णय झाला. त्यानंतर उपस्थित शिक्षकांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गुरुजनांनी तुम्ही शिकलात म्हणून आम्ही शकवू शकलो.



आज अनेक विद्यार्थी इंजिनियर, शिक्षक, व्यापारी, उद्योजक, अधिकारी, झाले आहेत. हे विद्यार्थी समोर आल्यानंतर आजही आभार मानत असल्याने शिक्षक व विद्यार्थ्यांचे नाते कसे असावे हे दिसून येते. परंतु आज परिस्थिती वेगळी झाली आहे. पूर्वी विद्यार्थ्याला शिक्षकाने मारल्याची तक्रार पालकाकडे केल्यास पालकच विद्यार्थ्याला दोन देत असे. आज उलट झाले आहे विद्यार्थ्याला मारले तर पालक तक्रार करून गुन्हा दाखल करतात अशी खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष यांनी गेट-टुगेदर साठी शाळा उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने आभार मानले. यावेळी सर्व वर्गमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांची विजय संकल्प पदयात्रा; भारतनगरमध्ये अतुल सावे यांचा भव्य प्रचार

छत्रपती संभाजीनगर : आगामी निवडणुकांसाठी मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू असून, छत्रपती संभाजीनगर पूर्व मतदारसंघातील भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-आरपीआय (आ)-मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार ना. अतुल मोरेश्वर सावे यांच्या प्रचारार्थ बुधवारी भारतनगरमध्ये भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि कार्यकर्त्यांचा जल्लोष यांची भरभरून साथ मिळाली.

मेहरसिंग नाईक विद्यालय येथून सुरू झालेली ही पदयात्रा वार्ड क्रमांक ११३ भारतनगरातील विविध भागातून पार पडली. पदयात्रेच्या मार्गात ना. सावे यांनी मतदारांशी संवाद साधत आपल्या भागातील प्रगतीचे वचन दिले आणि जनतेला विश्वास दिला की, महायुतीच्या माध्यमातून विकासाची गती अजून वाढवली जाईल. या वेळी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यात महायुतीच्या इतर घटक पक्षांच्या




नेत्यांनीही सहकार्य देत एकात्मतेचा संदेश दिला आणि समर्थकांनी मतदारांमध्ये उत्साह निर्माण केला. महायुतीची ही ताकद पाहता या निवडणुकीत अतुल सावे यांना प्रचंड मतांनी विजय मिळणार अशी अपेक्षा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

या प्रसंगी राजेंद्र जंजाळ, शिवाजी दांडगे, लक्ष्मीकांत थेठे, जालिंदर शेंडगे, नागेश भालेराव, विशाल पुंड, विवेक राठोड, महेश माळवतकर, ताराचंद गायकवाड, वामनराव शिंदे, सागर राऊत, सागर प्रसाद, पियूष साळवे, शिल्पा भोसले, अंजली वडजे, माधुरी साळुंके, ऋषिकेश पाटील, राम पंडित,बालाजी मुंडे, रामेश्वर दसपुते, सुधीर केंद्रे, श्रीकांत घुले, महेश राऊत, यांच्या सह मोठ्या प्रमाणावर महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

## गंगापूर येथे शिवचैतन्य जागरण यात्रा. हिंदू बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.७ नोव्हेंबर :



हिदू समाजाच्या एकजुटीसाठी आणि समाज जागृतीच्या निमित्ताने गुरुवार दिनांक ९ नोव्हेंबर २०२४ रोजी शिवचैतन्य जागरणयात्रेचे आगमन होणार असून शिवचैतन्य जागरण यात्रेनिमित्त परमपूज्य गोविंद देवगिरी महाराज, कोषाध्यक्ष श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास आयोध्या आणि श्रीकृष्ण जन्मभूमी तीर्थक्षेत्र मथुरा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. दिनांक ९ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ८ वाजता येथील माहेश्वरी मंगल कार्यालय येथे हिंदू समाजाच्या एकजुटीसाठी शिवचैतन्य जागरण यात्रेचे आयोजन सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. माहेश्वरी मंगल कार्यालय गंगापूर येथे आयोजित शिवचैतन्य जागरण यात्रे निमित्त आयोजित कार्यक्रमासाठी संत संदेश प्रवचनाचा लाभ घेण्यासाठी सहकुटुंब सहपरिवार हिंदू बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## महिलेला जीवे मारण्याची धमकी

छत्रपती संभाजीनगर : मारहाण करीत महिलेचा विनयभंग केल्याची घटना शिवनेरी कॉलनी सिडको येथे घडली. याप्रकरणी एका तरुणावर सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समाधान कडूबा राऊत रा. शिवनेरी कॉलनी सिडको असे आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी महिलेच्या फिर्यादीनुसार आरोपी जून महिन्यापासून महिलेचा पाठलाग करीत होता. त्याने दारू पिऊन महिलेला मारहाण केली. आपले अफेअर असेच चालू ठेव, नाहीतर तुला जीवे मारून टाकेल, अशी धमकी दिल्याने तरुणाच्या त्रासाला कंटाळून महिलेने फिर्याद दिली.



# शिवसेना विरुद्ध शिवसेना भिडणार

**धाराशिव जिल्ह्यात वर्चस्व असलेल्या शिवसेनेमध्ये दोन गट निर्माण झाल्यानंतर यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये लक्षवेधी लढती होणार आहेत. त्यातही सध्या तरी तीन ठिकाणी थेट धनुष्यबाण विरूद्ध मशाल असाच सामना आहे. यातील परांडा विधानसभा मतदारसंघामधील महाविकास आघाडीच्या उमेदवारीचा गुंता सुटल्यानंतर परिस्थिती अधिक स्पष्ट होणार आहे.**

१९९५ पासून धाराशिव जिल्ह्यामध्ये शिवसेनेचे प्राबल्य आहे. त्यात एखाद दुसरा अपवाद वगळला तर या पक्षाचे किमान एक ते दोन आमदार सातत्याने राहिले आहेत. त्यातही कळंब मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला होता. पुर्नरचनेत २००९ पासून तो उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात विलीन झाला. या मतदारसंघाचे नेतृत्व कल्पना नरहिरे (१९९५, १९९९) दयानंद गायकवाड (२००४) यांनी केले, तर २००९ मध्ये नव्याने अस्तित्वात आलेल्या उस्मानाबाद मतदारसंघातू५ ओमप्रकाश राजेनिंबाळकर विजयी झाले. अपवाद २०१४ चा राहिला. आमदार राणा जगजितसिंह पाटील राष्ट्रवादीकडून विजयी झाले. २०१९ मध्ये पुन्हा शिवसेनेचे आमदार कैलास पाटील विजयी झाले. परांडा मतदारसंघामध्येही ज्ञानेश्वर पाटील यांनी दोन वेळा विजय मिळवित शिवसेनेची ताकद वाढवली. २००४ मध्ये मात्र राहुल मोटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढत शिवसेनेची हॅट्ट्रीक रोखली. त्यानंतर मोटे यांनी येथून तीन वेळा विजय मिळविला. २०१९ मध्ये मात्र तानाजी सावंत यांनी पुन्हा एकदा येथून शिवसेनेचा भगवा फडकवला. उमरगा मतदारसंघामध्येही १९९९ आणि २००४ चा अपवाद वगळला तर १९९५ पासून सातत्याने शिवसेनेने बाजी मारली आहे. येथून शिवसेनेकडून सुरुवातीला प्रा. रवींद्र गायकवाड यांनी नेतृत्व केले. त्यानंतर काँग्रेसकडून बसवराज पाटील यांनी दोन वेळा तर पुन्हा शिवसेनेकडून ज्ञानराज चौगुले यांनी हॅट्ट्रीक साधली. आता सुरू असलेल्या रणधुमाळीत शिंदे शिवसेना विरूद्ध ठाकरे शिवसेना अशाच लढती होणार आहेत. ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख असलेले आमदार कैलास पाटील हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रडारवर आहेत. तसाच त्यांना भाजपचे आमदार पाटील यांचाही विरोध आहे. त्यामुळे आमदार पाटील यांना घेरण्यासाठी दोन्ही पक्षांनी ताकद पणाला लावली आहे. त्यातूनच कळंबचे माजी नगराध्यक्ष शिवाजी कापसे, धाराशिव शहरातील ज्येष्ठ नेते सुधीर पाटील यांना शिवसेनेत घेतले. या नेत्यांनी त्यांना उमेदवारीचा शब्द दिला. त्यांनीही लढण्याची तयारी केली. प्रत्यक्षात ऐनवेळी भाजपचे तालुकाध्यक्ष तथा आमदार पाटील यांचे विश्वासू कार्यकर्ते अजित पिंगळे यांना रातोरात शिंदे सेनेत दाखल करून त्यांची उमेदवारी जाहीर केली. या प्रकाराने शिंदे सेनेचे कार्यकर्ते बुचकळ्यात पडले आहेत.

उमरगा विधानसभेतही रंगतदार लढत होणार असून चौथ्यांदा रिंगणात असलेल्या आमदार चौगुले यांना प्रवीण स्वामी हे सामान्य शिवसैनिक ठाकरे सेनेकडून लढत देणार आहेत. परांडा मतदारसंघामध्ये मात्र महाविकास आघाडीत गोंधळाची स्थिती असून रणजीत ज्ञानेश्वर पाटील (ठाकरे शिवसेना) आणि राहुल मोटे (शरद पवार राष्ट्रवादी) रिंगणात आहेत. तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचा तिढा सुटला असून काँग्रेस पक्षाचे विद्यमान जिल्हाध्यक्ष तथा धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अॅड. धीरज पाटील कदम यांना विधानसभेची लॉटरी लागली आहे. माजी मंत्री मधुकर चव्हाण यांना काँग्रेस पक्षाने डावलले असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मतदारसंघातील राजकारण कोणते वळण घेणार याकडे लक्ष लागले आहे. चव्हाण यांनी तुळजापूर मतदारसंघावर दावा सांगितला होता. अॅड. धीरज कदम पाटील हे सुद्धा इच्छुक होते. मुळातच तुळजापूर विधानसभा मतदारसंघावरून महाविकास आघाडीमध्ये चर्चा सुरूच होती; पण निर्णय होत नव्हता. अखेर हा मतदारसंघ आता काँग्रेसच्या पारड्यात पडल्याने तिढा सुटल्याचे स्पष्ट झाले आहे. काँग्रेस पक्षाकडून धीरज कदम पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. तुळजापूर मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. दिवंगत आमदार साहेबराव हंगरगेकर यांच्यानंतर मधुकर चव्हाण हे सलग पाच वेळा याच मतदारसंघातून विजयी झाले होते. त्यानंतर भाजपने ही जागा खेचून आणली होती. आपला बालेकिल्ला पुन्हा काबीज करण्यासाठी अॅड. कदम पाटील हे पहिल्यांदाच येथून आपले नशीब आजमावणार आहेत. महायुतीतील



भाजपचे विद्यमान आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्याशी अॅड. कदम पाटील यांचा मुकाबला होणार आहे. त्यामुळे यंदा तुळजापूरमध्ये अटीतटीचा सामना रंगणार आहे. अॅड. कदम पाटील यांनी मागील सहा महिन्यांपासून तुळजापूर मतदारसंघातील प्रत्येक गावात, खेड्यात, तांडा, वस्तीमध्ये जाऊन मतदारांशी संपर्क वाढवला होता, तर बैठकांचा सपाटाही लावला होता. मध्यंतरीच्या काळात त्यांनी कार्यकर्ता मेळावेसुद्धा घेतले होते. अॅड. कदम पाटील हे २०१२ ते २०२२ दरम्यान धाराशिव जिल्हा परिषदेचे सदस्य होते. तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ या गटातून ते सलग दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य झाले होते. तसेच २०१४ ते २०१७ दरम्यान ते जिल्हा परिषदेचे सदस्य होते. त्यांचा या मतदारसंघात तगडा जनसंपर्क आहे.

## रण तापले

उमेदवार ठरल्यानंतर आघाडी आणि महायुतीमधील नाराजी उफाळून आली आहे. त्यामुळे चारही मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली आहे. धाराशिवचे पालकमंत्री तानाजी सावंत यांच्यामुळेच आपल्यावर अन्याय झाला असल्याची भावना व्यक्त करत शिवसेना जिल्हाप्रमुख सूरज साळुंखे आक्रमक झाले आहेत. महायुतीकडून उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघ शिवसेना शिंदे गटाच्या वाट्याला आला होता. त्यामध्ये शिवसेनेकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांना उमेदवारी न देता अचानक भाजप सोडून शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या अजित पिंगळे यांना उमेदवारी दिली गेली आहे. त्यामुळे नाराज शिवसेना पदाधिकाऱ्यांनी बंडाची भूमिका घेतली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख सूरज साळुंखे यांच्यासह शिवाजी कापसे आणि सुधीर पाटील या शिवसेना शिंदे गटाच्या प्रमुख उमेदवारांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यासोबतच ही मंडळी उमेदवारीवर ठाम आहेत. त्यामुळे या सर्वांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. सावंत यांच्या विरोधात साळुंखे आक्रमक झाले आहेत. तानाजी सावंत यांना गद्दार, खेकडा, खोकेवाला म्हटल्यावर पहिल्यांदा आपण धावून गेलो होतो; पण आपल्यावर अन्याय झाला, अशी भावना साळुंखे यांनी व्यक्त केली. त्यामुळे आता सावंत यांच्याशी संवाद संपला असल्याची भूमिका साळुंखे यांनी घेतली आहे. त्यामुळे आता या शिवसेना नेत्याची नाराजी पालकमंत्री सावंत कशी दूर करणार याकडे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांपैकी परांडा आणि तुळजापूर मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीने महायुतीच्या उमेदवारांविरुद्ध दोन-दोन उमेदवार रिंगणात उतरवून लढाईत चुरस निर्माण केली आहे. या लढतीमुळे जिल्ह्यामध्ये राजकीय वातावरण तापले असून मतदारांच्या प्रतिक्रिया कशा असतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. परांडा मतदारसंघामध्ये महायुतीकडून सावंत मैदानात आहेत. त्यांच्यासमोर महाविकास आघाडीने दोन उमेदवार उतरवले आहेत. शिवसेने (उद्धव ठाकरे गट) चे रणजित पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी आमदार राहुल मोटे. महाविकास आघाडीच्या रणनीतीनुसार, शिवसेनेच्या मतांमध्ये विभागणी घडवून राष्ट्रवादीचे राहुल मोटे यांना विजयी करून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. रणजीत पाटील यांनीदेखील जोरदार प्रचार सुरू केला आहे, त्यामुळे सावंत यांच्यासाठी ही निवडणूक आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. सावंत हे परांडा मतदारसंघात मजबूत पकड असणारे नेते मानले जातात. त्यांचा दुसऱ्यांदा विजय होत असेल, तर त्यांना आणखी एक कार्यकाल मिळू शकतो. तथापि, रणजीत पाटील आणि राहुल मोटे यांच्या उपस्थितीमुळे मतांची विभागणी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविकास आघाडीची ही योजना यशस्वी होते का, हे येत्या निवडणुकीत स्पष्ट होईल.

तुळजापूर मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांना पुन्हा एकदा उमेदवारी मिळाली आहे. त्यांच्यासमोर महाविकास आघाडीने काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अॅड. धीरज पाटील आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जीवनराव गोरे यांना मैदानात उतरवले आहे. तुळजापूर मतदारसंघात धाराशिव तालुक्यातील ७२ गावे आहेत आणि येथे राणा यांना नेहमी चांगले मताधिक्य मिळाले आहे. यंदा हे मताधिक्य कमी करण्यासाठी महाविकास आघाडीने गोरे यांना मैदानात उतरवले आहे. यामुळे येथे लढतीला आणखी रंग चढला आहे. धीरज पाटील यांना तुळजापूर मतदारसंघातील काही भागात मजबूत समर्थन आहे. तसेच गोरे यांची भूमिकादेखील अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. महाविकास आघाडीची ही रणनीती राणा यांना अडचणीत आणते का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. ■■■




# १०० कोटींची वसुली की योग्य उमेदवार?

**महाविकास आघाडीतील गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर झालेले आरोप त्यानंतर त्यांना झालेली अटक यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ माजली होती. या प्रकरणी देशमुख यांच्यावर अनेक आरोप-प्रत्यारोप झा होते. त्यानंतर त्यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला आणि मोठा काळ तुरुंगात राहावे लागले. आता त्यांच्या पुस्तकाने खळबळ उडवून दिली आहे. हा मतदारसंघ अजित पवार गटाऐवजी भाजपच्या वाट्याला आला आहे. त्यातच महाविकास आघाडीतच बिघाडी झाली आहे. श्रीकांत जिचकार यांच्या मुलाने तिथे बंड केले आहे.**

विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने अनिल देशमुख सुरुवातीला विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरवले होते. पक्षाने अनिल देशमुख यांना उमेदवारीही जाहीर केली; पण अचानक अर्ज भरण्याच्या दिवशी अनिल देशमुख यांनी माघार घेतली आणि मुलगा सलील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपने इथून चरणसिंग ठाकूर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे सलील देशमुख विरुद्ध चरणसिंग ठाकूर अशी लढत होत असून त्यात काँग्रेसच्या जिचकार यांचे बंड कुणाच्या पथ्यावर पडते, ते पाहायचे. काटोल विधानसभा मतदारसंघ हा रामटेक लोकसभा मतदारसंघात येतो. या मतदारसंघामध्ये नागपूर जिल्ह्यातील काटोल, नरखेड तालुका आणि नागपूर ग्रामीणमधल्या नागपूर-अमरावती महामार्गावरील वाडीपासून शिवा, बाजारगावपर्यंतच्या गावांचा समावेश होतो. काटोल तालुक्यात संत्र्यांचे उत्पादन जास्त होते. यासोबतच कापूस, सोयाबीनचेही उत्पादन घेतले जाते. या मतदारसंघात कुणबी आणि तेली समाजाचे प्राबल्य आहे. त्यानंतर बौद्ध आणि मागासवर्गीय मतेही आहेत. याच मतांचा देशमुख यांना फायदा होत आहे. काटोल विधानसभा मतदारसंघ हा आधीपासूनच काँग्रेसचा गड होता. इथून काँग्रेसकडून त्या काळचे सर्वात तरुण आमदार श्रीकांत जिचकार १९८० पासून निवडून गेले होते. त्यानंतर काँग्रेसच्या सुनील शिंदे यांनी हा गड राखला; पण १९९५ मध्ये अनिल देशमुख अपक्ष उभे राहिले आणि निवडूनही आले. त्यांनी त्या वेळच्या भाजप-शिवसेना महायुती सरकारमध्ये राज्यमंत्री म्हणून काम केले होते. त्यानंतर १९९९ मध्ये शरद पवार यांनी राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली आणि अनिल देशमुख पवार यांच्यासोबत राष्ट्रवादी पक्षामध्ये गेले. पुढे त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अनेक मंत्रिपदावर काम केले. देशमुख १९९९, २००४, २००९ असे सलग चारवेळा विजयी झाले; पण २०१४ ला त्यांचेच पुतणे असलेल्या आशिष देशमुख यांनी अनिल देशमुखांची ही विजयी घोडदौड थांबवली. आशिष यांनी पहिल्यांदाच या मतदारसंघात भाजपला यश मिळवून दिले; पण २०१९ च्या निवडणुकीत अनिल देशमुख यांनी हा बालेकिल्ला पुन्हा खेचून आणला. यानंतर शरद पवार यांनी त्यांच्यावर गृहमंत्रिपदाची जबाबदारी दिली; पण या पदावर ते जास्त दिवस राहू शकले नाहीत. त्यांच्यावर १०० कोटी वसुलीचे आरोप झाले. 'ईडी', 'सीबीआय'ची चौकशी मागे लागली अ५गि देशमुखांना गृहमंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागले.

सलील हे जिल्हा परिषदेच्या राजकारणात सक्रिय होते. अनिल देशमुख तुरुंगात गेले, तेव्हा सलील देशमुख मतदारसंघातला कारभार बघत होते. त्यामुळे त्यांची यंदाची विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा होती. देशमुख यांनीही मुलासाठी तिकीट मागितले होते अशी माहिती आहे; पण पक्षाने अनिल देशमुखांनाच उमेदवारी जाहीर केली होती. घरात पुत्रप्रेमापोटी त्यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याची चर्चा होती. यावर देशमुख यांनी स्पष्टीकरण दिले. 'मी उमेदवारी अर्ज भरला असता, तर सत्ताधाऱ्यांनी काहीही करून माझा अर्ज रद्द केला असता. त्यासाठी त्यांनी तसे नियोजन आखले होते.' या मतदारसंघात भाजप आशिष देशमुख किंवा चरणसिंग ठाकूर यांना उमेदवारी देईल, अशी चर्चा होती. इथून आपणच लढणार अशी भूमिका घेत आशिष देशमुखांनी प्रचारदेखील सुरू केला होता; पण भाजपने त्यांना ऐनवेळी सावनेरला पाठवले आणि काटोलमधून चरणसिंग ठाकूर यांना पुन्हा एकदा संधी दिली. चरणसिंग ठाकूर यांनी २०१९ ला अनिल देशमुखांना चांगली टक्कर दिली होती. त्यांच्याऐवजी त्यांचा मुलगा सलील देशमुख निवडणूक लढवत आहे. सलील देशमुख विधानसभेच्या दृष्टीने तयारी करत होते. त्यांनी कोविड काळात काम केले. अनिल देशमुख तुरुंगात होते; त्या वेळी त्यांनी मतदारसंघ सांभाळला. शिवाय जिल्हा परिषदेच्या राजकारणाच्या माध्यमातून सलील यांचे नेटवर्क आहे. त्यामुळे ही लढाई त्यांच्यासाठी इतकी अवघड असेल असे वाटत नाही; पण त्यांच्यासमोर चरणसिंग ठाकूर यांचे आव्हान आहे. कारण त्यांनी २०१९ मध्ये पराभव झाल्यानंतर मतदारसंघ नव्याने बांधायला सुरुवात केली. त्यामुळे ही लढत चुरशीची होऊ शकते. शिवाय काँग्रेसच्या जिचकार यांचे बंड कुणाला भोवणार, हे २३ तारखेला समजणार आहे.



सलील देशमुख

चरणसिंग ठाकूर

गेल्या पाच वर्षांमध्ये मतदारसंघातील संपर्क कमी झाला. त्यामुळे अनिल देशमुख लढले असते, तर अँटी इन्कम्बन्सीचा फटका त्यांना बसला असता. याउलट सलील देशमुख लोकांच्या संपर्कात होते. मतदारसंघात २४ तास उपलब्ध राहणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. त्यामुळे अनिल देशमुख प्रत्यक्ष निवडणुकीत नसल्याचा काही परिणाम होईल, असे वाटत नाही. शेतकऱ्यांची नाराजी ही सत्ताधारी पक्षावर आहे. कारण, सोयाबीन, कापसाचे भाव वाढवणे त्यांच्या हातात आहे. शिवाय इथले भाजपचे उमेदवार चरणसिंग ठाकूर हे बाजार समितीत आहेत. त्यांच्याच बाजार समितीत शेतकऱ्यांना भाव मिळत नाही. त्यामुळे या नाराजीचा फटका त्यांना बसू शकतो. देशमुख यांना तुरुंगवास झाला, त्या वेळी त्यांच्या मतदारसंघात सहानुभूतीचे वातावरण होते. त्या सहानुभूतीच्या वातावरणाचा सलील यांना काही प्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे. मतदारसंघाचा धोरणात्मक विकास झाला नाही. त्यामुळे देशमुख यांच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात रोजगार येऊ शकला नाही. त्यासाठी आपण काय करणार आहोत, हे मतदारांना पटवून देणे हे सलील यांच्यासमोरचे आव्हान असणार आहे. ठाकूर यांच्यासमोर आशिष देशमुख यांच्याशी जुळवून घेत त्यांचा मतदार आपल्या बाजूने वळवण्याचे आव्हान असेल. कारण आशिष देशमुख आणि चरणसिंह ठाकूर यांच्यात सुप्त संघर्ष आहे. युवक काँग्रेसचे नेते याज्ञवल्क्य जिचकार यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केल्याने ते सध्या चांगलेच चर्चेत आहे. काँग्रेसचे दिवंगत नेते श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र याज्ञवल्क्य यांनी काँग्रेसकडे काटोल मतदारसंघातून उमेदवारी मागितली होती आणि त्यांनी काम सुरू केले होते; मात्र काटोल-नरखेड विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे असल्याने व तेथून या पक्षाने सलील देशमुख यांना अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केले. त्यामुळे याज्ञवल्क्यने अपक्ष म्हणून काटोल मतदारसंघातून निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे.

## लक्षवेधी लढत

# कल्याण ग्रामीणमध्ये आगरी अस्मिता महत्त्वाची

**ठाणे, नवी मुंबई आणि डोंबिवली या तीन शहरांच्या वेशीवर असलेल्या कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात यंदा पुन्हा एकदा आगरी समाजाच्या अस्मितेचा मुद्दा रंगतदार ठरू लागला आहे.**

कल्याण ग्रामीण ठाणे, नवी मुंबई आणि कल्याणच्या ग्रामीण भागाचा मिळून तयार झालेला मतदारसंघ आहे. येथील राजकारणात आतापासूनच नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा मुद्दा, याच मतदारसंघातील एका देवळात आगरी समाजातील एका महिलेवर झालेला बलात्कार आणि हत्या, वेगवेगळ्या स्थानिक विकास प्रकल्पात जमिनींचे संपादन होत असताना होणारी दिरंगाई यांसारखे मुद्दे तापत आहेत. २७ गावांची नगरपालिका आणि १४ गावे नवी मुंबईमध्ये समाविष्ट करण्याचा मुद्दा प्रचारात आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राजू पाटील यांचा मतदारसंघ आहे. राज्यात मनसेचा हा एकमेव आमदार आहे. त्यामुळे तीन आगरी समाजातील उमेदवारांमधील येथील लढाई प्रतिष्ठेची बनली आहे. ठाण्याच्या वेशीवरील दिवा-आगासन पट्टा, नवी मुंबईच्या वेशीवरील तळोजा, डोंबिवली जवळील २७ गावे आणि भिवंडी परिसरातील काही गावे हा सगळा ठाणे तालुक्यातील आगरीबहुल समाजाचा चौकटबद्ध पट्टा मानला जातो. या भागातील आगरी समाज संघटितपणे घेत असलेल्या भूमिकेचे राजकीय परिणाम एके काळी संपूर्ण जिल्ह्यामध्ये दिसत असत.

या वेळी कल्याण ग्रामीण विधानसभा निवडणुकीत मनसेकडून राजू प५ील, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून सुभाष भोईर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून राजेश मोरे हे तीन आगरी समाजाचे नेते मैदानात आहेत. नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या पुर्नवसनाचा प्रश्न तसेच डोंबिवलीजवळील २७ गावांमधील विविध प्रकारच्या नागरी प्रश्नांवर आगरी समाजाचे ज्येष्ठ नेते दिवंगत दि. बा. पाटील यांनी स्थानिकांच्या लढ्याचे यापूर्वी नेतृत्व केले आहे. दि. बा. पाटील यांच्या कार्यपद्धतीचा पगडा या समाजातील



घेऊनच या चौकटबद्ध भूभागातील आगरी समाज आपल्या विविध प्रश्नांवर स्थानिक, शासन पातळीवर लढा देताना यापूर्वीही दिसला आहे. बाहेरील सामाजिक, राजकीय वातावरण काय आहे, यापेक्षा आपले नागरी, सामाजिक प्रश्न या विषयांवर हा समाज सर्वपक्षीय भेद विसरून एक होतो, हेही या समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराच्या प्रश्नासह इतर प्रलंबित प्रश्नांविषयी हा समाज पुन्हा एकदा एकवटल्याचे चित्र असून या निवडणुकीतही हे मुद्दे चर्चेत आले आहेत.

## वलयांकित

मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार होत असताना उद्धव ठाकरे यांनी नवी मुंबई विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव

आग्रह धरण्यात सुभाष भोईर यांच्यासारखे नेते त्या वेळी पुढे होते. राज्य सरकारने यासंबंधीचा प्रस्ताव मंजूर करुनही केंद्र सरकारच्या स्तरावर अजूनही यासंबंधीची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. १४ गावांचे हस्तांतरण, तेथील नागरी समस्या, २७ गावातील विकास केंद्र, २७ गावांची नगरपालिका, गावे कल्याण डोंबिवली पालिकेतून वगळणे, संजय गांधी उद्यानातील झोपडपट्टीधारक खोणी जवळील गावरान जमिनीवर आणणे या विषयावर आगरी समाज, नेत्यांनी पक्षभेद, अंतर्गत वैर विसरून एकदिलाने वेळोवेळी लढा दिला आहे. नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त संघटना, २७ गावातील संघर्ष समिती या आगरी समाज संघटनांनी एकदिलाने महत्वाची भूमिका वेळोवेळी बजावली आहे. या निवडणुकीत पुन्हा हे प्रश्न चर्चेत आले असून राज्यातील महायुती सरकारला कोंडीत पकडण्याची खेळी महाविकास आघाडीकडून खेळली जात आहे. नवी मुंबई विमानतळ नामांतराचा प्रश्न रेंगाळत पडला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २७ गावांना दहा वर्षांपूर्वी गावे पालिकेतून वेगळी काढतो, २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका करतो ही आश्वासने दिली होती; परंतु दहा वर्षांनंतरही ही आश्वासने 'जैसे थे' आहेत. २७ गाव परिसरातील बेरोजगारीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी १०८९ हेक्टर क्षेत्रावर तेवढ्याच खर्चाचे विकास केंद्र उभारणीचे आश्वासन दिले होते. या विकास केंद्राचा प्रकल्प अधांतरी आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सिंचनाचा १५ हजार हेक्टर अनुशेष मंजूर केला- तान्हाजी मुटकुळे

## कापडसिंगी, साखरा, बन बरडा गावात मुटकुळेंच्या प्रचारसभा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**
हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष परभणी जिल्ह्यापासून वेगळा करीत तत्कालीन राज्यपाल आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात मंजूर करून आणला. विधानसभा मतदारसंघातून वाहणाऱ्या गावांमधील नद्यांचे रूंदीकरण आणि खोलीकरण करून बंधारे बांधले. त्यामुळे सेनगाव, हिंगोली तालुक्यातील शेकडो हेक्टर शेती पाण्याखाली आली आहे. तसेच विंधन विहीरींची कामे करून शेतकऱ्यांना शेतीसाठी शाश्वत पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले. सिंचनाचा अनुशेष वेगळा करून १५ हजार हेक्टर जमीन ओलीताखाली आणणार असल्याचे वचन भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी साखरा येथील प्रचारसभेवेळी दिले.
साखरा येथील प्रचारसभेप्रसंगी माजी आ. रामराव वडकुते, अ‍ॅड के के शिंदे, तालुकाध्यक्ष हिंमत राठोड, विजय धाकतोडे, अशोक ठेंगल, अप्पासाहेब देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी बोलतांना मुटकुळे म्हणाले माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या काळात हिंगोली विधानसभा मतदारसंघात जलसिंचनाची कामे, जलयुक्त शिवार योजनेची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आली. याचा शेतकऱ्यांना निश्चितच फायदा झाला आहे. साखरा सर्कल विकासापासून कोसो दूर होते. हे गाव दत्तक घेऊन या गावाच्या विकासासाठी स्थानिक निधीतून २५ टक्के निधी देऊन गावातील रस्ते, पाणी तसेच इतर सोयीसुविधा करण्यात आल्या आ-हेत. या गावात सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. बनबरडा हा अतिशय दुर्गम भागापर्यंत रस्त्याची कामे झाल्यामुळे या भागातील नागरिकांना आता दळणवळ-णाची चांगली सोय झाली आहे. या सर्कलमधील प्रसिध्द महादेव मंदिर परिसरात सभामंडपासाठी १ कोटीचा निधी देण्यात आला असून हे काम प्रगतीपथावर आहे.
येणाऱ्या काळातही विधानसभा मतदारसंघातील लोकांच्या विकासाकरीता मी कटीबध्द आहे. हिंगोली विधानसभा मतदारसंघाचा शाश्वत विकास हाच माझा ध्यास असल्याचे यावेळी तान्हाजी मुटकुळे म्हणाले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# हिंगोलीत श्री गुरूचरित्र पारायण सोहळ्याला सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ नोव्हेंबर**
गुरूत्व प्रदीप हिंगोली आयोजित १००८ श्री गुरूचरित्र सारामृत पारायण, श्री गुरूचरित्र कथामृत व श्रीदत्त पंचायतन याग ६ नोव्हेंबर पासून प्रारंभ झाला आहे. या पाराण्यास ८९० भाविक बसले आहेत
हिंगोली शहरातील महावीर भवनमध्ये ६ ते १३ नोव्हेंबर या दरम्यानच्या कालावधीत गुरूत्व प्रदीप हिंगोली आयोजित १००८ श्री गुरूचरित्र सारामृत पारायण, श्री गुरूचरित्र कथामृत व श्रीदत्त पंचायतन याग ६ नोव्हेंबर पासून प्रारंभ झाला आहे या पारायणाला ८९० महिला व पुरुष भाविक बसले आहेत. या निमित्त आज ७ नोव्हेंबरला श्री दत्तात्रय, श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंग सरस्वती स्वामी महाराज सेवा, ८ नोव्हेंबरला दुप-ारी २ वाजता गणेश याग, ९ नोव्हेंबरला शनिवारी सकाळी ११.३० वाजता श्रीदत्त मुर्तीस पुष्पार्चण महा-पूजा, दुपारी २ वाजता श्रीविष्णू याग, १० नोव्हेंबरला रविवारी सकाळी १० वाजता पुष्पांची होळी, दुपारी २ वाजता श्रीदत्त याग, ११ नोव्हेंबर सोमवार रोजी दुपारी २ वाजता श्री रूद्र याग, १२ नोव्हेंबरला मंगळवारी सकाळी ९.३० वाजता श्री यंत्रास कुंकूमार्चन सेवा, दुपारी २ वाजता शतचण्डी याग, १३ नोव्हेंबरला बुधवारी श्रीची पालखी सेवा असे धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.
६ ते १३ नोव्हेंबर दरम्यान घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमात सकाळी ६ ते ७ नित्यपूजा, सकाळी ७.३० ते ९.३० राजोपचार लघूरूद्र महाभिषेक, सकाळी ८ ते ९ दरम्यान प्रथमसेवा सेवानंद संगीत सभा, सकाळी १० ते दुपारी १२ दरम्यान श्रीगुरूचरित्र सारामृत पारायण, दुपारी १२ ते ३ दरम्यान भिक्षा, नैवेद्य, आरती, भोजन प्रसाद, दुपारी १ ते २.३० दरम्यान द्वितीय सत्रात सेवानंद संगीत सभा, दुपारी २ ते ५ दरम्यान श्रीदत्त पंचायतन याग हवन, दुपारी ३ ते ६ दरम्यान श्री गुरूचरित्र कथामृत, आरती व प्रसाद, रात्री ७ ते ८ दरम्यान विष्णू सहस्त्रनाम, राम रक्षा वशांतीपाठ तर रात्री ८ ते ९ दरम्यान श्री दत्त पंचपदी असे धार्मिक कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

# तान्हाजी मुटकुळे यांच्या प्रचार दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**



विधानसभा मतदार संघातून महायुतीचे अधिकृत उमेदव-ार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचाराला वेग आला असून ७ नोव्हेंबरला सेनगाव तालुक्यातील कापडसिंगी बन येथे प्रचारादरम्यान मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.
हिंगोली विधानसभा मतदार संघामध्ये तान्हाजीराव मुटकुळे यांनी केलेल्या विकास कामामुळे पक्षाने पुन्हा निवडणुकीसाठी संधी दिली आहे. मुटकुळे यांची अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यापासून महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते गावोगावी जाऊन प्रचार करीत आहेत. ७ नोव्हेंबरला तान्हाजीराव मुटकुळे यांनी सेनगाव तालुक्यातील कापडसिंगी, बन यासह अन्य काही गावांमध्ये प्रचारानिमित्त भेटी दिल्या. याठिकाणी त्यांचा मतदारांनी सत्कार केला. अनेक गावात मुटकुळे यांची प्रचार फेरी काढण्यात आली. यावेळी मुटकुळे यांनी मतदारांना विकासाची कामे करण्याकरता निवडून देण्याचे आव-ाहन केले. यापूर्वीही मोठ्या प्रमाणात विकासाच्या कामासाठी शासनाकडून निधीआणल्याने अनेक ठिकाणचा कायापालट झाला असल्याचे आमदार मुटकुळे यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले. मतदारांच्या आग्रहास्तव पुन्हा निवडणूक रिंगणात उतरलो असल्याने सर्वांनी महायुतीच्या कमळ चिन्हावर बटन दाबून मोठ्या संख्येने मला विजयी करावे असे आ-वाहन देखील त्यांनी मतदारांना केले.
या प्रचार दौऱ्या दरम्यान माजी आ. रामराव वडकुते, के के शिंदे, अशोक ठेंगल, हिंमत राठोड यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळमनुरी विधानसभा मतदार संघात ७ सहाय्यकारी मतदान केंद्र निश्चित

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**
भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. २९ ऑक्टोबर, २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी यादी भागाची पडताळणी केल्यानंतर मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या १५०० पेक्षा जास्त झालेल्या मतदान केंद्रासाठी ७ सहाय्यकारी मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. त्याचा मतदार केंद्रनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.
१) भटसावंगी तांडा केंद्र क्र. ५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भटसावंगी तांडा खोली क्र. १ येथे महिला ७१९ व पुरुष ८०९ असे एकूण १५२८, २) शेनोडी मतदान केंद्र क्र. ५० जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेनोडी खोली क्र. १ येथे महिला ७१४ व पुरुष ८२८ असे एकूण १५४२, ३) कळमनुरी मतदान केंद्र क्र. ६८ उर्ध्व पेनगंगा प्रकल्प जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कळमनुरी खोली क्र. १ येथे महिला ७६३ व पुरुष ७६८ असे एकूण १५३१, ४) कळमनुरी मतदान केंद्र क्र. ६९ जिल्हा परिषद उर्ध्व पेनगंगा प्राथमिक शाळा, कळमनुरी खोली क्र. २ येथे महिला ७५४, पुरुष ७७६ व तृतीयपंथी ०१ असे एकूण १५३१, ५) कळमनुरी मतदान केंद्र क्र. ७४ गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल खोली क्र. २ कळमनुरी येथे महिला ७६९ व पुरुष ७६८ असे एकूण १५३७, ६) औंढा नागनाथ मतदान केंद्र क्र. १८५ नागनाथ विद्यालय औंढा नागनाथ खोली क्र. १ येथे महिला ६८७ व पुरुष ८२५ असे एकूण १५१२ आणि आखाडा बाळापूर मतदान केंद्र क्र. २६४ राजर्षी शाहू विद्यालय, आखाडा बाळापूर खोली क्र. १ येथे महिला ७४३ व पुरुष ७८७ असे एकूण १५३० याप्रमाणे मतदारांची संख्या आहे.
त्यामुळे वरील मतदान केंद्रासाठी सहाय्यकारी मतदान केंद्र निश्चित करण्यासाठी मॅन्यूअल ऑफ पोलींग स्टेशन-२०२० मधील तरतुदीचे पालन करुन सहाय्यकारी मतदान केंद्र निश्चित करण्यात आले, असल्याची माहिती ९३-कळमनुरी विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## संक्षिप्त वृत्त


**मतदानासाठी २० नोव्हेंबरला सार्वजनिक सुट्टी जाहीर**
हिंगोली- भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सार्वत्रिक-२०२४चा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीचे मतदान दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी होणार आहे. या निवडणुकीमध्ये १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ मधील कलम १३५ (ब) नुसार उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि. २४ ऑक्टोबरच्या शासन परिपत्रकानुसार हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी मतदान करण्यास सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. या दिवशी मोठ्या संख्येने मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

{XA}

**भाजप महिला मोर्चाच्यावतीने घरोघरी प्रचार**



हिंगोली- हिंगोली विधानसभेतील महायुतीचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचारार्थ हिंगोली शहर महिला मोर्चाच्या वतीने चालू असलेल्या प्रचार रॅली दरम्यान गुरूवारी शिवाजीनगर आणि शास्त्रीनगर भागात प्रचार करण्यात आला. यावेळी महिला शहराध्यक्ष सौ अलका लोखंडे, सौ सुनीता अग्रवाल,सौ शितल बांगर,सौ ज्योती अग्रवाल, सविता गुठ्ठे ,गीता मांदळे ,मंदा मांदळे, बेबी श्रावणे, योगिता कांबळे यांच्यासह असंख्य महिला भगिनी उपस्थित होत्या. आज घडीला तरी हिंगोली शहरात भारतीय जनता पक्ष हिंगोली यांच्या महिला आघाडीने प्रचारात आघाडी घेतली आहे.



हिंगोली- येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संत नामदेव मार्केट यार्डमध्ये बुधवारी मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी आणले होते. सोयाबीनला कमी भाव मिळत असल्याने काही शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. छाया- विजय गुंडेकर

# भाजप नेत्या पंकजा मुंडे यांची सेनगाव येथे जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**
हिंगोली विधानसभेचे भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचारार्थ दि ८ नोव्हेंबर शुक्रवारी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांची सेनगाव येथे सकाळी १० वाजता जाहीर सभा होणार आहे.
विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा सध्या सर्वत्र उडत असून विविध राजकीय पक्षांचे नेते प्रचारासाठी येत आहेत. भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचारार्थ भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा आ. पंकजा मुंडे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. यानिमित्त भाजपकडून गावोगावी जोरदार प्रचार करण्यात येत असून जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या सभेची जय्यत तयारी करण्यात आली असून या सभेला मोठ्या संख्येने भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील महिला, पुरूष तसेच युवक-युवती उपस्थित राहणार आहेत. या सभेला भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे, प्रदेश उपाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, अ‍ॅड के के शिंदे, नारायण खेडकर, शहराध्यक्ष केलाशचंद्र काबरा, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, युवा नेते शिवाजीराव मुटकुळे, मोतीराम इंगोले, उपाध्यक्ष संतोष टेकाळे, तालुकाध्यक्ष हिंमत राठोड, माणिक लोडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष बांगर, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, भाजपचे सरचिटणीस उमेश नागरे, उद्य-ोग आघाडीचे मिलींद यंबल, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा उज्वला तांभाळे, क्रिष्णा रूहीटीया, ओबीसी मोर्चाच्या रजनी पाटील, शहराध्यक्षा लोखंडे आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



**हिंगोली- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअरची जिल्हा प्रशासनाच्यावतीने व्यवस्था करण्यात आली आहे. गुरूवारी येथील नगर परिषद कार्यालयात मोठ्या प्रमाणात व्हीलचेअर आणल्या असून लवकरच विविध मतदान केंद्रावर या व्हीलचेअर दिव्यांगांसाठी मतदान करण्यासाठी रवाना करण्यात येणार आहेत. छाया- विजय गुंडेकर**

# मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करा- वंदना राव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**
महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच निवडणूक प्रक्रियेत सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी योग्य समन्वय राखावा. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांवर सर्व मूलभूत सोयी-सुविधा उप-लब्ध असल्याची खात्री करून घेण्याचे निर्देश निवडणूक निरीक्षक सामान्य श्रीमती वंदना राव यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिले.



छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित भारत निवडणूक आयोगाचे उपनिवडणूक आयुक्त हिर्देशकुमार यांनी निवडणूक यंत्रणेची आढावा बैठक घेतली. या बैठकीला हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे श्रीमती वंदना राव, निवडणूक निरीक्षक खर्च अर्जुन प्रधान, निवडणूक निरीक्षक पोलीस डॉ. राकेश कुमार बन्सल, ९२- वसमतचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विकास माने, ९३-कळमनुरीच्या श्रीमती प्रतिक्षा भुते आणि ९४-हिंगोली समाधान घुटुकडे आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे उपस्थित होते.
उमेदवारांनी निवडणूक कालावधीत दैनंदिन येणारा खर्च अभिरुप नोंदवहीत लिहावा. वेळोवेळी खर्च तपासणी करून घ्यावी. मतदान केंद्रांवर पुरेशा प्रमाणात मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करावी. प्रकाशझोत असावा. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीन, मतदार संख्या आणि होणाऱ्या मतदानाच्या टक्केवारीबाबत तात्काळ अद्ययावत माहिती अपलोड करावी. मतदारांसाठी प्रतीक्षालय कक्ष, टोकन सिस्टम सुरू करणे, दिव्यांगांसाठी व्हिलचेअर, रॅम्प सुविधा, सक्षम पच्या माध्यमातून तात्काळ सुविधा, पाणी/स्वच्छतागृहाची सोय यांची खात्री करावी. पोलींग पार्टीच्या राहण्या-खाण्याची सोय असल्याची खात्री करावी. गृह मतदानाची (होम वोटींग) सुविधा उपलब्ध करून देण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.
विधानसभा मतदार संघातील ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवाचे गृह भेटीद्वारे दोन टप्यात मतदान घेण्यात येणार आहे. याकामी नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करावे. स्ट्राँगरूममध्ये नियुक्त सुरक्षा जवानांच्या राहण्या-खाण्याची पुरेशी व्यवस्था असल्याची खात्री करून घेण्याचे निर्देश दिले. सी-व्हिजील अँपवर येणाऱ्या तक्रारी तात्काळ निकाली काढाव्यात. समाज माध्यमांवरील पोस्टवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवावे, अशा सूचना केल्या.
यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी छत्रपती संभाजीनगर येथील बैठकीत जिल्ह्यातील तिनही विधानसभा मतदारसंघातील पूर्वतयारीबाबत उपनिवडणूक आयुक्तांना माहिती दिली. येथील मतदान केंद्र, प्रत्येक मतदान केंद्रासाठी लागणारे बॅलेट युनिट, ईव्हीएम मशीनची पुरवणी सरमिसळीकरण झाले असल्याबाबत माहिती दिली. जिल्ह्यातील तिन्ही मतदार संघातील निवडणुकीची तयारी झाली असून जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. तसेच जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता पथकाच्या कार्यवाहीत जप्त करण्यात आलेल्या बाबींची माहिती दिली.



## इति-उवाच...



मराठा आरक्षण होणार नाही, हे सगळ्यांना माहिती आहे. जे तुम्हाला येऊन सांगताहेत की आरक्षण देतो, त्यांना विचारा कसे? तुमच्या हातात तरी आहे का ते?

**राज ठाकरे,** मनसे प्रमुख



ज्यांनी आमचा पक्ष फोडला, घर फोडले, चिन्ह हिसकावून घेतले, त्यांना ही जनता आणि माझे कुटुंब कधीच माफ करणार नाही. आमची लढाई दिल्लीच्या शक्तीविरोधात आहे. कोणत्याही परिस्थितीत दिल्लीच्या तख्तासमोर झुकणार नाही.

**सुप्रिया सुळे,** राकाँशप खासदार



शरद पवारांनी बँका हाणल्या, कारखाना हाणला, पण येवढे हाणले तरी शरद पवार भाषणात म्हणतात, मला चेहरा बदलायचा आहे... मला महाराष्ट्राचा चेहरा बदलायचा आहे. अरे कसला चेहरा... महाराष्ट्र तुमच्या चेहऱ्यासारखा करणार का?

**सदाभाऊ खोत,** रयत क्रांती संघटन



निजामशाहीच्या पाठिराख्यांनी लक्षात ठेवावे देशात आता लांगूलचालन करणाऱ्यांचे सरकार नसून, बहुसंख्यांचे हितरक्षण करणारे सरकार आहे. नितेश राणे आणि हिंदू विरोधात गरळ ओकणाऱ्यांचे पाय विधान भवनाकडे वळण्याआधीच कलम केले जातील.

**नारायण राणे,** भाजपा खासदार



लाडकी बहीण योजनेच्या १५०० रुपयात काय होते, असे विचारणाऱ्यांना घराबाहेर न पडल्याने काहीही माहिती नाही. या निवडणुकीत आता जनताच त्यांना घरी बसवणार आहे.

**डॉ. श्रीकांत शिंदे,** शिवसेना खासदार

# राकाँचे ५० मतदारसंघांसाठी ५० स्वतंत्र जाहीरनामे

**शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन**

◆ **पुणे, ७ नोव्हेंबर**

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाचा स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. इतकेच नाही, तर राज्यातील ५० विधानसभा मतदारसंघांसाठी ५० जाहीरनामे पक्षाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आले आहेत. अशी कल्पना पक्षाच्या वतीने पहिल्यांदाच अंमलात आणली गेली आहे.

अजित पवार यांच्या राकाँने विधानसभा निवडणुकीसंदर्भात जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. ज्यामध्ये राज्यासाठी अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. कालही महायुतीच्या वतीने जाहीरनामा प्रतिद्ध करण्यात आला होता. त्या व्यतिरिक्त पक्षाच्या वतीने हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. अजित पवार यांनी बारामतीसाठी आपला स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे.



### अजित पवारांची आश्वासने काय?

लाडकी बहीण योजनेची रक्कम २१०० रुपये आणि २५ हजार महिलांना पोलिस दलात भरती करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. याशिवाय शेतकऱ्यांची १५ हजार रुपयांची कर्जमाफी आणि किसान सन्मान योजना, सर्वांना अन्न व निवारा, वृद्ध पेन्शनधारकांना २१०० रुपयांची मदत, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवणार, २५ लाख नोकऱ्या देणार, असे वचन देण्यात आले. राज्यातील युवक, ग्रामीण भाग आदी भागांमध्ये जोड रस्ते जोडण्याचे आश्वासन, अंगणवाडी सेविका व आशा सेविकांना १५ हजार रुपये मानधन देणार, वीज बिल ३० टक्के कमी करणार, व्हिजन महाराष्ट्र-२०२९ सादर करणार तसेच १०० दिवसांत कामे करण्याचे आश्वासन अजित पवार यांच्या वतीने देण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

## मविआचे दोन खासदार एकमेकांविरोधात

◆ **पंढरपूर, ७ नोव्हेंबर**

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांनी मोठे शक्ती प्रदर्शन करीत माचनूर येथील महादेव मंदिरात आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून या विराट सभेची सुरुवात झाली. विशेष म्हणजे, कालच संध्याकाळी महाविकास आघाडीतील शरद पवार गटाचे अनिल सावंत यांच्या प्रचाराचा शुभारंभ माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते याच ठिकाणी झाला होता.

मंगळवेढा तालुक्यातील अतिशय पुरातन असणाऱ्या माचनूर येथील महादेव मंदिरात सर्व प्रमुख उमेदवारांनी प्रचाराचा नारळ फोडल्याने माचनुरचा महादेव कोणाला पावणार? याचीही चर्चा मतदारसंघात रंगू लागली आहे. याच ठिकाणी भाजपाचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांनी दोन दिवसांपूर्वी प्रचाराचा शुभारंभ केला होता. मंगळवारी शरद पवार गटाच्या अनिल सावंत यांचा शुभारंभ झाला होता. आता याच ठिकाणी काँग्रेसचे भगीरथ भालके यांनी विराट शक्ती प्रदर्शन करीत आपल्या प्रचाराचा नारळ फोडला.

**महाविकास आघाडीत झालेली बिघाडी कोणाला फायदेशीर?**

तिन्ही उमेदवारांनी केलेल्या शक्ती प्रदर्शनामुळे पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची निवडणूक रंगतदार होणार आहे. महाविकास आघाडीतील लोकसभेला एकत्र असलेले माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील हे अनिल सावंत यांच्या प्रचारासाठी. तर सोलापूर लोकसभेच्या खासदार प्रणिती शिंदे या भगीरथ भालके यांच्या प्रचाराला आल्याने जिल्ह्यातील दोन्ही खासदार विधानसभेला एकमेकांच्या विरोधात असल्याचे चित्र तयार झाले आहे. (वृत्तसंस्था)

## शरद पवारांना पंतप्रधानपदाची नेहमीच हुलकावणी

**श्यामकांत जहागीरदार**



◆ **नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

१९९१ च्या लोकसभा निवडणुकीत मुख्यमंत्री शरद पवार यांच्या नेतृत्वात काँग्रेसने राज्यातील ४८ पैकी ३८ जागा जिंकल्या, याच निवडणुकीच्या प्रचारादरम्यान माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाली होती.



**काँग्रेसचे अध्यक्षपदही मिळाले नाही**

काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर पंतप्रधानपदासाठी पी. व्ही. नरसिंहराव यांच्यासोबत अर्जुनसिंह आणि शरद पवार यांच्या नावाचीही चर्चा झाली. पण, अर्जुनसिंह आणि पवारांना मागे टाकत नरसिंहराव पंतप्रधान झाले. नरसिंहरावांनी शरद पवार यांचा संरक्षण मंत्री म्हणून आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. त्यांच्या जागेवर सुधाकरराव नाईक यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाली.



यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर शरद पवार देशाचे संरक्षण मंत्री झाले. पण, ते फार दिवस या पदावर राहू शकले नाही. महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय परिस्थितीत सुधाकरराव नाईकांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. देशाचे संरक्षणमंत्री असलेल्या पवारांना मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात परत जावे लागले. चव्हाण मुख्यमंत्री पद सोडून देशाचे संरक्षणमंत्री झाले, तर पवार देशाचे संरक्षणमंत्री पद सोडत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री.

यावेळी पवार यांनी चौथ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पवारांची मुख्यमंत्री म्हणून चौथी कारकीर्द वादग्रस्त ठरली. पवार मुख्यमंत्री झाल्यानंतर काही दिवसातच मुंबईत बॉम्बस्फोट झाले. त्यानंतर लातूरला भीषण भूकंपाचा धक्का बसला. याच काळात पवारांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. मुंबई महापालिकेचे उपायुक्त गो. रा. खैरनार यांनी पवारांच्या भ्रष्टाचाराविरुध्द आवाज उठवला. हे सगळे कमी होते की काय म्हणून नागपूरला हिवाळी अधिवेशनाच्या काळात गोवारींच्या मोर्चात चेंगराचेंगरी होऊन मोठ्या संख्येत आदिवासींचा मृत्यू झाला. पवारांची जनमानसातील प्रतिमा डागाळली. भ्रष्टाचारी नेता म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली. जनमानसातील लोकप्रियता खालावली.

पहिल्या तीन मुख्यमंत्रिपदाच्या काळात पवारांनी जे कमावले, ते चौथ्या वेळी गमावले. १९९५ मध्ये राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत पवारांच्या नेतृत्वात काँग्रेसचा पराभव झाला. राज्यात शिवसेना भाजपा युतीचा विजय झाला आणि मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. त्यानंतर जवळपास वर्षभर पवार महाराष्ट्राच्या राजकारणात राहिले.

१९९६ ची लोकसभा निवडणूक जिंकत त्यांनी राष्ट्रीय राजकारणात दुसऱ्यांदा प्रवेश केला. त्यानंतर पवार महाराष्ट्राच्या राजकारणात परतलेच नाही. १९९७ मध्ये पवारांनी सीताराम केसरी यांच्याविरुद्ध काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढवली, पण त्यात त्यांचा पराभव झाला. १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वात काँग्रेसने महाराष्ट्रातील ४८ पैकी ३७ जागा जिंकल्या. लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून पवार यांची निवड झाली.

१९९९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी सोनिया गांधी यांच्या विदेशी नागरिकत्वाच्या मुद्यावरून पवारांनी बंड केले. इटलीत जन्मलेल्या सोनिया गांधी यांच्या ऐवजी अन्य कोणत्याही भारतीय नेत्याला काँग्रेसने पंतप्रधानपदाचे उमेदवार जाहीर करावे, अशी मागणी पवार यांनी केली. या मागणीची दखल न घेतल्यामुळे पवार यांनी पी.ए. संगमा आणि तारिक अन्वर यांच्या सोबत काँग्रेसमधून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. त्याला आता २५ वर्ष होत आहे. पवारांच्या काँग्रेस सोडण्याच्या तसेच राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना करण्याचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष म्हटले पाहिजे. ■

# राज ठाकरे पुतण्याचा खेळ बिघडवणार का?

◆ **मुंबई, ७ नोव्हेंबर**

उंच इमारतींमधील चाळी आणि झोपडपट्ट्यांसह दक्षिण मुंबईतील हायप्रोफाईल वरळीतील जागा आहे. २०२४ ची विधानसभा निवडणूक आदित्य ठाकरे आणि मिलिंद देवरा यांच्यात आहे. ते दोघेही मुंबईतील दोन मोठ्या राजकीय घराण्यांचे वारसदार आहेत. ही जागा बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. आता पक्षाची शिंदे गट आणि उद्धव गट अशा दोन गटात विभागणी झाली आहे. उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे हे वरळीचे विद्यमान आमदार आहेत. त्यांना यावेळीही उमेदवारी देण्यात आली. आदित्य यांच्या विरोधात मुंबई काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुरली देवरा यांचा मुलगा मिलिंद देवरा निवडणूक लढवत आहे. मिलिंद यांनी काही



महिन्यांपूर्वीच काँग्रेस सोडली आणि शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला. यावेळी राज ठाकरेंच्या मनसेनेही उमेदवार उभा केला आहे.

तज्ज्ञांच्या मते, वरळीची लढत ही आदित्य ठाकरे विरुद्ध मिलिंद देवरा यांच्यातील लढत नसून, महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांचे ज्वलंत उदाहरण आहे. २०१९ मध्ये आदित्य ठाकरेंसाठी विजयाचा मार्ग सोपा होता. शिवसेनेने आपल्या सर्व प्रमुख प्रतिस्पर्ध्यांचा पक्षात समावेश केला होता. राज ठाकरेंच्या मनसेनेही उमेदवार दिला नाही. यावेळी समीकरण वेगळे आहे. यावेळी शिंदे गटाची शिवसेना, उद्धव गटाची शिवसेना आणि राज ठाकरे यांची मनसे रिंगणात आहेत. काका यावेळी आपल्या पुतण्यासाठी ही जागा सोडण्याच्या मानसिकतेत नाहीत. त्यामुळे राज ठाकरे यांच्यावर आदित्य ठाकरेंच्या विजयाची मदार राहणार आहे. (वृत्तसंस्था)

# आम्ही अब्दुल सत्तारांचा प्रचार करणार नाही

### स्थानिक भाजपा नेत्यांनी पक्षनेतृत्वाला कळवले

◆ **छ. संभाजीनगर, ७ नोव्हेंबर**



छत्रपती संभाजीनगरमधील सिल्लोड मतदारसंघातील शिवसेना मित्रपक्षाचे उमेदवार अब्दुल सत्तार यांचा प्रचार आपण करणार नाही, असे स्थानिक भाजपा नेत्यांनी राज्याच्या पक्षनेतृत्वाला कळवले आहे.

राज्याचे अल्पसंख्यक विकास मंत्री सत्तार हे सिल्लोडमधील भाजपा संपवण्याबद्दल बोलत आहेत आणि कार्यकर्त्यांना धमकावत असल्याचा दावा शहर भाजपाचे अध्यक्ष कमलेश कटारिया यांनी मंगळवारी वृत्तसंस्थेशी बोलताना केला. आम्ही सत्तार यांचा सिल्लोड विधानसभा मतदारसंघात प्रचार करणार नाही. सत्तार हे महायुतीचे उमेदवार असले, तरी ते सिल्लोडमधून भाजपाला संपवण्याची भाषा करतात. ते भाजपा कार्यकर्त्यांना धमकावतात आणि त्यांच्याविरोधात खोट्या तक्रारी करतात, असा आरोप कटारिया यांनी केला.

सत्तार यांनी उघडपणे काळे यांचा प्रचार केला आणि जालना लोकसभा मतदारसंघात दानवे यांना विजयी करण्यासाठी काम केले नाही. राष्ट्रहित हे भाजपाचे पहिले प्राधान्य असून, या संदर्भात सत्तार हे योग्य उमेदवार नाहीत, असेही कटारिया म्हणाले. मी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून सत्तार यांचा प्रचार करणार नसल्याचे कळवले आहे, असे कटारिया पुढे म्हणाले. (वृत्तसंस्था)

### सत्तारांची राजकीय कारकीर्द

सत्तार यांनी यापूर्वी २००९ आणि २०१४ मध्ये काँग्रेसच्या तिकिटावर सिल्लोड विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवला होता. नंतर त्यांनी तत्कालीन अविभाजित शिवसेनेत प्रवेश केला आणि २०१९ ची निवडणूक त्यांच्या तिकिटावर लढवली आणि विजयी झाले. पक्ष फुटल्यानंतर सत्तार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आणि महायुती सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री बनले. सिल्लोडमध्ये सत्तार यांचा सामना उबाठाचे सुरेश बनकर यांच्याशी आहे. ■



झारखंडच्या रांचीतील सिल्ली विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार अमित महतो यांचा बुधवारी प्रचार करताना झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेत्या कल्पना सोरेन

# ...तर कुणीही आमच्याशिवाय सत्ता बनवू शकणार नाही!

### दहा वर्षांनी महाराष्ट्रात आलेल्या अकबरुद्दीन ओवैसींचा इशारा

◆ **छत्रपती संभाजीनगर, ७ नोव्हेंबर**

महाराष्ट्राच्या राजकारणात इम्तियाज जलील यांच्यासह अकबरुद्दीनही खांद्याला खांदा लावून उभा राहणार. औरंगाबाद, नांदेड, उस्मानाबाद, सोलापूर असो वा मुंबई हा अकबरुद्दीन ओवैसी कायम इथे येत राहणार. जीवनात मी मत मागितले नाही पण यंदाच्या निवडणुकीत तुम्ही तुमचे मत माझ्या सहकाऱ्यांना द्या. तुमच्या प्रत्येक समस्येत मी तुमच्यासोबत राहील. जर आपले दहा आमदार निवडून आले, तर ना ठाकरे ना शिंदे, ना गांधी, ना पवार आमच्याशिवाय कुणी सत्ता बनवू शकत नाही. ही सुवर्णसंधी आहे, असे सांगत एमआयएम नेते अकबरुद्दीन ओवैसी यांनी महायुती आणि महाविकास आघाडीवर जोरदार निशाणा साधला आहे.



छत्रपती संभाजीनगर याठिकाणी अकबरुद्दीन ओवैसी यांची जाहीर सभा झाली. त्यावेळी ते म्हणाले की, दहा वर्षांनी मी पुन्हा महाराष्ट्रात आलो आहे. जेव्हा मी १० वर्षांआधी महाराष्ट्रात आलो तेव्हा इम्तियाज जलील नव्हते, वारिस पठाण नव्हते, आमचे मालेगाव, धुळे इथले आमदार नव्हते. जेव्हा हे लोक निवडून आले जबाबदारीने एमआयएमचे नेतृत्व पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. आज दहा वर्षांनी मी आलोय् ते या लोकांच्या पाठीमागे मजबुतीने उभा राहून एमआयएमचा झेंडा सांभाळण्यासाठी. मला कधी कुठल्याही लालसेची गरज नाही. नेतृत्व येईल आणि जाईल, जमात महत्त्वाची आहे. आज परीक्षेची वेळ आहे. जवळपास ४ हजार उमेदवार त्यांचे नशीब अजमावत आहेत. (वृत्तसंस्था)

### उद्धव ठाकरे गांधींना हिंदुत्वाचा धडा देण्यात यशस्वी झाले का?

दहा वर्षापूर्वी भाजपा-शिवसेना होती आणि राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस, समाजवादी पक्ष होता. मात्र, आज काँग्रेस आहे, दोन राष्ट्रवादी काँग्रेस आहेत, दोन शिवसेना आहेत, शिंदे सेना, ठाकरेसेना...हिंदुत्व बोलणारी शिवसेना-भाजपा आता हिंदुत्व विचारधारेच्या शिवसेनेचे दोन तुकडे झाले. आता काँग्रेस आणि शरद पवारांनी उद्धव ठाकरेंना जवळ केले. तीन पक्षांची आघाडी झाली. उद्धव ठाकरे हिंदुत्वाचा धडा राहुल गांधी आणि प्रियांका वढेरागांधी शिकवण्यात यशस्वी झाले की नाही... राहुल गांधी प्रियांका वढेरा हे पुरोगामित्वाचे धडे उद्धव ठाकरेंना देण्यात यशस्वी झाले की नाही? हा माझा प्रश्न आहे, असे अकबरूद्दीन ओवैसी यांनी म्हटले. ■

# सत्ता न मिळाल्यास कुत्रेही विचारणार नाही

### जयंत पाटील यांचे वक्तव्य


◆ **सांगली, ७ नोव्हेंबर**

महाविकास आघाडीतील सर्व पक्षांनी ताकद लावली, तरच महाराष्ट्रात मविआचे सरकार येईल. सरकार आल्यानंतर तुम्हाला पाहिजे त्याला मुख्यमंत्री करा, आताच कुणाला घाई नाही. आता सत्ता आली नाही, तर कुत्रेही विचारणार नाही, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे.



पलूस तालुक्यातील औदुंबरमध्ये काँग्रेसचे उमेदवार विश्वजित कदम यांच्या प्रचार सभेत जयंत पाटील बोलत होते. पलूस कडेगाव मतदारसंघात विकास भरपूर झाला आहे. तरी देखील आणखी काही विकास कामे असतील तर सांगा, असे आमदार कदम म्हणत असतात. त्यामुळे कर्णाचा दुसरा अवतार म्हणजे विश्वजित कदम आहेत, असे म्हणत जयंत पाटील यांनी महाविकास आघाडी म्हणून काँग्रेस, शरद पवार गट आणि शिवसेनेचे उमेदवार महाराष्ट्रात निवडून आणण्यासाठी सगळ्यांनी प्रयत्न करावे, असे कार्यकर्त्यांना आवाहन केले.

राजकारण थोडस बाजूला ठेवा. लढायला, भांडायला भरपूर आयुष्य आहे. आता मात्र थोडे मोठे मन ठेवा, भांड्याला भांडे लागत असेल, तर ते थोडे बाजूला ठेवा. कुठल्याही परिस्थितीत अधिकृत उमेदवारांसाठी आपण सर्वांनी ताकद लावली पाहिजे. आज सत्ता येण्यासाठी एकेक आमदार महत्त्वाचा आहे. जर सत्ता आली नाही तर कुत्रे पण विचारणार नाही, असे म्हणत जयंत पाटील यांनी बंडखोरी करणाऱ्यांना एकप्रकारे इशारा दिला आहे. बंडखोरी करण्यासाठी आज जी लोक मोठ्याने बोलत आहेत, ती माणसे परत आवाज काढणार नाहीत. निवांत घरात जाऊन बसतील, रिटायर्ड होतील, त्यामुळे छोट्या-छोट्या गोष्टीत मन अडकवू नका. आता सरकार येण्यासाठी सगळ्यांनी प्रयत्न करा, असेही जयंत पाटील म्हणाले. (वृत्तसंस्था)



### पुण्याचा गड काबीज करण्यासाठी
# भाजपाचे महत्त्वाचे नेते 'वॉर फूट'वर

◆ **पुणे, ७ नोव्हेंबर**

पक्ष आपल्या स्टार प्रचारकांना प्रचाराच्या मैदानात उतवरत आहेत. भाजपानेही विधानसभेसाठी कंबर कसली आहे. पुण्याचा गड काबीज करण्यासाठी भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाच्या वरिष्ठ नेत्यांची सभा पुण्यात पार पडणार आहे.

त्यापैकी ८ नोव्हेंबरला गृहमंत्री अमित शाह, १० नोव्हेंबरला भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, ११ नोव्हेंबरला संरक्षण मंत्री राजनाथसिंह, तर सगळ्यात शेवटी १२ नोव्हेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुण्यात जाहीर सभा होणार आहे. लोकसभेसारखा फटका बसू नये म्हणून भाजपा प्रचारात कोणतीही कसर बाकी ठेवताना दिसत नाही. त्यामुळे पुणे शहरासह २१ मतदारसंघासाठी वरिष्ठ नेते जाहीर सभा घेणार आहेत. सभेचे ठिकाण आणि वेळ निश्चित करण्यासाठी शहर भाजपाकडून तयारी सुरू झाली आहे. (वृत्तसंस्था)

# मविआला छोट्या पक्षांची गरज नाही

### अबू आझमी यांचा काँग्रेसवर हल्लाबोल

◆ **मुंबई, ७ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाला केवळ दोन जागा देऊन बोळवण केल्याने नाराज झालेले सपाचे प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांनी बुधवारी काँग्रेसवर हल्लाबोल चढवत हरयाणातील पराभवातून त्यांनी कोणताही धडा घेतल्याचे नसल्याचे म्हटले आहे.

विरोधी महाविकास आघाडीने संयुक्त आघाडी म्हणून निवडणुका लढवायला हव्या होत्या, परंतु त्यांनी सपा नेत्यांना चर्चेसाठी बोलावले नाही, असे आझमी यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

स्वबळावर निवडणुका जिंकता येतील असे त्यांना वाटते आणि आमची त्यांना गरज नाही. २० नोव्हेंबरला होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी सपाने आठ उमेदवार उभे केले आहेत आणि गुरुवार, ७ नोव्हेंबर रोजी आपला जाहीरनामा प्रसिद्ध करेल, असे ते म्हणाले.

आमच्या पक्षाचे कार्यकर्ते इतर जागांवर भाजपाचा पराभव करण्यासाठी मविआला मदत करतील, यावर आझमी यांनी जोर दिला.

काँग्रेसने हरयाणात सपासोबत आघाडी केली नाही आणि त्यांना पराभव पत्करावा लागला. आम्हाला वाटले होते की ते यापासून धडा घेतील, पण तसे झाले नाही, असा आरोप आझमी यांनी केला.

समाजवादी पक्ष हरयाणामध्ये काँग्रेससोबत जाऊ इच्छित होता, परंतु राज्य नेतृत्वाकडून त्याला विरोध होत असल्याने तसे झाले नाही.

अबू आझमी यांनी महाराष्ट्र काँग्रेस नेत्यांवरही टीका केली होती. काँग्रेसचे राज्यनेतृत्व स्वतःहून काम करू शकत नाही आणि प्रत्येक वेळी निर्णय घेण्यासाठी दिल्लीला धाव घ्यावी लागते, असा दावा त्यांनी केला.

शरद पवार यांच्या पक्षाचे जयंत पाटील यांनी मला बोलावले. त्यांनी मला चहा दिला आणि समाजवादी पक्षासोबत बैठक होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर कोणतीही बैठक झाली नाही, असे आझमी यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)